# “प.पू.स्वामी चिन्मयानंद यांच्या शैक्षणिक विचारांचा नवीन अभ्यासक्रमाच्या दृष्टिकोनातून विश्लेषणात्मक अभ्यास”

विद्यापीठ अनुदान आयोगद्वारा अनुदानित लघु संशोधन
प्रकल्प योजने अंतर्गत सादर करावयाचा
लघुशोध प्रबंध


मार्गदर्शक
प.पू.स्वामी पुरुषोत्तमानंद सरस्वती
प्रमुख आचार्य,
चिन्मय सेवा ट्रस्ट,
महाराष्ट्र, गोवा

संशोधिका
डॉ. सौ. वसुधा विनोद देव
अधिव्याख्याता,
शासकीय अध्यापक महाविद्यालय,
अकोला


सन २००७-०९

# प्रतिज्ञापत्र

विद्यापीठ अनुदान आयोग द्वारा अनुदानित लघुसंशोधन प्रकल्प योजने अंतर्गत **''प. पू. स्वामी चिन्मयानंद यांच्या शैक्षणिक विचारांचा नवीन अभ्यासक्रमाच्या दृष्टिकोनातून विश्लेषणात्मक अभ्यास''** या विषयावरील सादर केलेला संशोधन अहवालासाठीचे संशोधन कार्य मी स्वत: केले आहे. हे संशोधन कार्य इतरत्र कोणत्याही पदवीसाठी सादर केले नाही, ह्याची मी हमी देते. संशोधनासाठी वापरण्यात आलेल्या संदर्भांचा निर्देश केलेला आहे.

प्रस्तुत संशोधन अहवाल हा भाग-१ व भाग-२ अश्या दोन भागात सादर करण्यांत येत आहे.

अकोला

दिनांक : ३ जानेवारी, २००९

**डॉ. वसुधा विनोद देव**

अधिव्याख्याता,

शासकीय अध्यापक महाविद्यालय,

अकोला.

# मार्गदर्शकाचे प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यांत येते की, विद्यापीठ अनुदान आयोग द्वारा अनुदानित लघुसंशोधन प्रकल्प योजने अंतर्गत **डॉ. वसुधा विनोद देव** (अधिव्याख्याता, शासकीय अध्यापक महाविद्यालय, अकोला) यांनी सन २००७-२००९ ह्या वर्षात विषय **''प. पू. स्वामी चिन्मयानंद यांच्या शैक्षणिक विचारांचा नवीन अभ्यासक्रमाच्या दृष्टिकोनातून विश्लेषणात्मक अभ्यास''** ह्या विषयावरील संशोधन कार्य समाधानकारकपणे पूर्ण केले आहे. त्यासाठी त्यांनी अनिवार्य असलेले वैयक्तिक मार्गदर्शनही घेतले आहे. त्यांनी केलेले काम हे त्यांचे स्वत:चे असून त्यांनी त्यासाठी वापरलेल्या योग्य संदर्भ स्त्रोतांचा निर्देश ह्या अहवालात केला आहे.

अकोला

दिनांक : ३ जानेवारी, २००९

**स्वामी पुरुषोत्तमानंद सरस्वती**

प्रमुख आचार्य,

चिन्मय सेवा ट्रस्ट, महाराष्ट्र, गोवा

# अग्रेषण प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यांत येते की, विद्यापीठ अनुदान आयोग द्वारा अनुदानित लघुसंशोधन प्रकल्प योजने अंतर्गत **डॉ. वसुधा विनोद देव** (अधिव्याख्याता, शासकीय अध्यापक महाविद्यालय, अकोला) यांनी सन २००७-२००९ ह्या वर्षात विषय **"प. पू. स्वामी चिन्मयानंद यांच्या शैक्षणिक विचारांचा नवीन अभ्यासक्रमाच्या दृष्टिकोनातून विश्लेषणात्मक अभ्यास"** ह्या विषयावरील संशोधन कार्य समाधानकारकपणे पूर्ण केले आहे. त्यांनी केलेले काम हे त्यांचे स्वत:चे असून त्यांनी त्यासाठी वापरलेल्या योग्य संदर्भ स्त्रोतांचा निर्देश ह्या अहवालात केला आहे.

प्रस्तुत संशोधन अहवाल हा भाग-१ व भाग-२ अशा दोन प्रतीत सादर करण्यांत येत आहे.

अकोला

दिनांक : ३ जानेवारी, २००९

**डॉ. शांताराम बुटे**

प्राचार्य,

शासकीय अध्यापक महाविद्यालय,

अकोला

# ऋणनिर्देश

ओम् सर्वाधारं सर्व बुध्दिप्रकाशं। सर्वाकार चिन्मय प्रेमस्वरूपम्
नित्यंम् शुध्दम् निश्चलं निर्विकल्पम् । पूर्णात्मानं सद्गुरु तं नमामी ।।

विद्यापीठ अनुदान आयोग द्वारा अनुदानित लघुसंशोधन प्रकल्प योजने अंतर्गत **"प. पू. स्वामी चिन्मयानंद यांच्या शैक्षणिक विचारांचा नविन अभ्यासक्रमाच्या दृष्टिकोनातून विश्लेषणात्मक अभ्यास"** ह्या विषयावरील संशोधन अहवाल सादर करतांना मला अतिशय आनंद होत आहे. प. पू. स्वामी चिन्मयानंद ही एक प्रेरक शक्ती आहे आणि जीवनाला कलाटणी देण्याची क्षमता ह्या शक्तीत आहे. अशा विचारापासून आजही शिक्षण क्षेत्र खूप दूर आहे. ही मनाची अस्वस्थता व त्यातून साकारलेला हा प्रकल्प म्हणजे केवळ गुरुदेवांच्या कार्याची अभिव्यक्ती आहे. मी केवळ एक माध्यम आहे. ह्या प्रकल्पातील प्रत्येक वाक्य. ही गुरुदेवांचीच देणगी आणि म्हणून हा प्रकल्प मी सर्वप्रथम प.पू. गुरुदेवांच्या चरणी अर्पण करते. आज ह्या प्रकल्प पूर्णतिचा आनंद म्हणजे जीवनध्येय पूर्ततेचा आनंद आहे आणि येथून ही ज्ञानगंगा शिक्षण क्षेत्रात नेण्याची अभिवचन आहे. !

प्रस्तुत संशोधन प्रकल्पास विद्यापीठ अनुदान आयोगाने मान्यता दिली त्याबद्दल सर्वप्रथम मी विद्यापीठ अनुदान आयोगाचे ऋण व्यक्त करते.

चिन्मय मिशनचे विश्वगुरु व अतिशय प्रेमळ असे व्यक्तिमत्व म्हणजे प.पू. स्वामी तेजोमयानंद. ह्यांनी दिलेल्या शुभाशीर्वादानेच ह्या कार्याला चालना मिळाली. मी त्यांच्या प्रति ऋण व्यक्त करते.

हा प्रकल्प साकारण्यात आपल्या प्रेमळ आशीर्वादाचे बळ देणारे सद्गुरु प.पू. स्वामी पुरुषोत्तमानंद सरस्वती जे ह्या प्रकल्पाचे मार्गदर्शक आहेत. मी त्यांच्या ऋणातच राहु ईच्छिते.

मी ऋण व्यक्त करते मा. संचालक उच्च शिक्षण पुणे ह्यांचे तसेच माझ्या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शांताराम बुटे ह्यांच्या प्रती. मा. प्राचार्यांच्या प्रोत्साहनाने हे कार्य मी करु शकले.

प्रस्तुत प्रकल्पास प्रतिसाद देणाऱ्या महाराष्ट्रातील सर्व चिन्मय मिशनच्या आचार्यांच्या प्रती ज्यांनी आपले सर्वस्व गुरुचरणी समर्पित केले आहे. अशा सर्व आचार्यांच्या प्रती मी ऋण व्यक्त करते.

महाराष्ट्रातील सर्व चिन्मय साधक व शिक्षण तज्ज्ञ व प्रशासकीय अधिकारी ज्यांनी ह्या प्रकल्पात अत्यंत महत्वाची भूमिका बजावली आहे. त्यांच्या प्रती मी ऋण व्यक्त करते.

चिन्मय मिशन अकोला येथील सर्व चिन्मय परिवार सदस्यांच्या प्रती मी ऋण व्यक्त करते. त्यांच्या सहकार्याशिवाय हा प्रकल्प पूर्ण होणे शक्य नव्हते.

तसेच मी ऋण व्यक्त करते माझ्या सर्व सहकारी अधिव्याख्यात्यांचे, कार्यालयीन कर्मचाऱ्यांचे तसेच ह्या प्रकल्पात अतयंत मौलाचे सहकार्य देणाऱ्या माझ्या विद्यार्थी वर्गाप्रती.

माझ्या संपूर्ण वाटचालीत मला सतत प्रोत्साहित करणारे व माझ्या प्रगती करीता धडपडणारे माझे पती श्री. विनोद देव ह्यांच्या प्रती मी ऋण व्यक्त करते. तसेच माझे कुंटुबीय सदस्य यांच्या प्रती मी ऋण व्यक्त करते. मी ऋणात राहू इच्छिते माझा छकुला व माझ्या जीवन ध्येयाची जाणीव करुन देणाऱ्या माझ्या चिन्मयच्या.

माझ्या आईवडिलांचे अत्यंत मोलाचे मार्गदर्शन मला नेहमीच लाभते. कारण ते माझे संदर्भ ग्रंथ आहेत. मी ऋण व्यक्त करते ॲड. वसंतराव जलतारे व सौ. सुहासिनी जलतारे यांच्या प्रती.

प्रस्तुत प्रकल्पाचे मुद्रण अत्यंत आनंदाने करणारे अजय कॉम्प्युटर्स ॲन्ड प्रिंटर्सचे श्री. अजय व अनय घोटीकर ह्यांच्या प्रती मी ऋण व्यक्त करते. तसेच प्रस्तुत संशोधन प्रकल्पाकरीता ज्यांनी मला प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष मदत केली आहे त्या सर्वांचे आभार मानणे माझे आद्य कर्तव्य असुन मी त्यांचे आभार मानते.

।। हरी ओम ।।

अकोला

दिनांक : ३ जानेवारी, २००९

**डॉ. वसुधा विनोद देव**
अधिव्याख्याता,
शासकीय अध्यापक महाविद्यालय,
अकोला.

# अनुक्रमणिका

## विभाग पहिला - प्राथमिक विभाग


| | | |
|---|---|---|
| १. | मुखपृष्ठ | I |
| २. | प्रतिज्ञापत्र | II |
| ३. | मार्गदर्शकाचे प्रमाणपत्र | III |
| ४. | अग्रेषण प्रमाणपत्र | IV |
| ५. | ऋणनिर्देश | V |
| ६. | अनुक्रमणिका | VI |


## विभाग दुसरा - मुख्य विभाग


| प्र.क्र. | तपशिल | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| **प्रकरण 1** | **प्रस्तावना** | १ - १०१ |
| १.१ | प्रास्ताविक | १ |
| १.२ | शिक्षणाचा अर्थ | २ |
| १.३ | शिक्षणाच्या परिभाषा | ६ |
| १.४ | शिक्षणाचा व्युत्पर्थ | ८ |
| १.५ | शिक्षणाबाबत गैरसमज | ९ |
| १.६ | शिक्षणाचा व्यापक अर्थ | ११ |
| १.७ | शिक्षणाची कार्ये | १२ |
| १.८ | शिक्षणाबाबतचा दृष्टिकोन | १५ |
| १.९ | संशोधनाची गरज आणि महत्व | २१ |
| १.१० | समस्या विधान | २५ |
| १.११ | कार्यात्मक परिभाषा | **२५** |

| प्र.क्र. | तपशिल | पृष्ठ क्रमांक |
| --- | --- | --- |
| १.१२ | संशोधनाची उद्दिष्टे | २६ |
| १.१३ | चले | २७ |
| १.१४ | गृहितके | **२७** |
| १.१५ | परिकल्पना | २७ |
| १.१६ | व्याप्ती व मर्यादा | **२८** |
| १.१७ | स्वामी चिन्मयानंद - व्यक्ती आणि कार्य | २८ |
| **प्रकरण 2** | **संशोधित व संबंधित साहित्याचे सिंहावलोकन** | १०२ - १२६ |
| **२.१** | **साहित्य समालोचनाची उद्दिष्ट्ये** | **१०२** |
| २.२ | संशोधित साहित्य | १०३ |
| २.३ | संशोधनाशी संबंधित साहित्य | ११४ |
| **प्रकरण 3** | **संशोधन पध्दती** | १२७ - १४५ |
| ३.१ | शैक्षणिक संशोधनाचे प्रकार | १२७ |
| ३.२ | सर्वेक्षण पध्दत | १२९ |
| ३.३ | संशोधन पध्दतीच्या पायऱ्या | १३१ |
| **३.४** | **संशोधनासाठी जनसंख्या व नमुना निवड** | **१३२** |
| ३.५ | नमुना निवड पध्दती | १३३ |
| ३.६ | संशोधनाची साधने | १३४ |
| ३.७ | माहितीचे तथ्य संकलन | १३७ |
| ३.८ | पथदर्शी अभ्यास | १३९ |
| ३.९ | पथदर्शी अभ्यासाचे संकलन व अर्थनिर्वचन | १४२ |

| प्र.क्र. | तपशिल | पृष्ठ क्रमांक |
| --- | --- | --- |
| **प्रकरण 4** | **संकलीत माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन** | १४६ - ५९५ |
| ४.१) | प.पू. स्वामी चिन्मयानंद यांच्या ग्रंथाच्या माध्यमातून अभिव्यक्त होणारी शैक्षणिक तत्वे | १४७ |
| ४.२) | स्वामी चिन्मयानंद व मूल्यशिक्षण | ३६१ |
| ४.३) | व्यक्तिमत्व विकास | ३८५ |
| **४.४)** | **स्वामी चिन्मयानंद यांच्या विचारांचा आधुनिक शिक्षण पध्दतीवरील प्रभाव** | ४१४ |
| ४.५) | स्वामी चिन्मयानंद ह्यांच्या तत्वांची सामाजिक उपयोगीता सिध्द करणे | ५३६ |
| **४.६)** | **नवनवीन संकल्पना** | **५८४** |
| **प्रकरण 5** | **सारांश, निष्कर्ष शिफारशी व उपाययोजना** | ५९६ - ७५९ |
| ५.१ | प्रकरण १ ले | ५९६ |
| ५.२ | प्रकरण २ रे | ६०७ |
| ५.३ | प्रकरण ३ रे | ६०८ |
| ५.५ | प्रकरण ४ थे | ६०९ |
| ५.६ | निष्कर्ष | ६११ |
| ५.७ | स्वामी चिन्मयानंद ह्यांची शिक्षण विषयक दृष्टि | ६४८ |
| | १. गुणवत्तेचा संदर्भ | ६५३ |
| | २. सामाजिक संदर्भ | ६५३ |
| | ३. शिक्षण | ६५४ |
| | ४. शिक्षणाची उद्दिष्ट्ये | ६५८ |
| | ५. शाश्वत विकासाकरीता शिक्षण-विविध उपागम | ६७१ |

| प्र.क्र. | तपशिल | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | विभाग तीसरा - अंतिम विभाग | |
| | **संदर्भग्रंथसूची** | ७६० - ७७१ |
| | **परिशिष्ट्ये** | |
| | १. चिन्मय विद्यालयांची यादी | |
| | २. चिन्मय व्हिजन प्रोग्राम प्रारूप | |
| | ३. शिक्षण तज्ज्ञांकरीता मतावली | |
| | ४. चिन्मय साधकांकरीता मतावली | |
| | ५. आचार्यांच्या मुलाखतीचे प्रारूप | |
| | ६. आचार्यांची व चिन्मय मिशनची यादी | |

# आकृतीसूची



| प्र.क्र. | तपशिल | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| ४.१) | व्यक्तिमत्व | १५१ |
| ४.२) | ध्येय प्राप्तीची रचना | १९९ |
| ४.३) | मानवी शक्ती संचय | ३३५ |
| ४.४) | मानवी शक्ती क्षय | ३३५ |
| ४.५) | **Hararchy of Large Profit** | **353** |
| ४.६) | **True Education** | **375** |
| ४.७) | व्यक्तिमत्वाचे स्वरूप | ३९३ |
| ४.८) | मानवी बुध्दिची क्षमता | ४०० |
| ४.९) | व्यक्तिमत्वाची गुणवत्ता निर्धारीत करणारे घटक | ४०७ |
| ५.१) | योग्य वर्तन | ६३७ |
| ५.२) | मूल्याचरण (नैतिक गुण संवर्धन) | ६३८ |
| ५.३) | सहसंबंध | ६४० |
| ५.४) | मानवी बुध्दिमत्ता | ६४० |
| ५.५) | **Chinmayas Window** | **744** |
| ५.६) | विकासाचा आकृतीबंध | 749 |
| ५.७) | सहसंबंधाचा आकृतीबंध | ७५० |
| ५.८) | राष्ट्रीय शिक्षणाचा आकृतीबंध | ७५१ |
| ५.९) | धार्मिक शिक्षणाचा आकृतीबंध | ७५२ |
| ५.१०) | वयोगटाचा आकृतीबंध | ७५३ |
| ५.११) | व्यवसाय शिक्षणाचा आकृतीबंध | ७५४ |

# कोष्टकसूची



| कोष्टक क्रमांक | तपशिल | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | **शिक्षण तज्ज्ञांना देण्यांत आलेल्या मतावलीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन** | |
| **क्रमांक १** | **शिक्षण** | **४५३** |
| **क्रमांक २** | शिक्षणाची ध्येय | ४५५ |
| क्रमांक ३ | व्यक्तिमत्व विकास | ४५७ |
| क्रमांक ४ | जीवनाची ध्येय | ४६० |
| क्रमांक ५ | शिस्त स्वातंत्र्य | ४६३ |
| क्रमांक ६ | मानव व मन | ४६४ |
| क्रमांक ७ | अध्ययन व अध्यापन | ४६६ |
| क्रमांक ८ | राष्ट्र संकल्पना | ४७० |
| क्रमांक ९ | गुरु शिष्य संबंध | ४७२ |
| क्रमांक १० | संस्कृती आणि धर्म | ४७५ |
| क्रमांक ११ | अभ्यासक्रम | ४७७ |
| | चिन्मय साधकांना देण्यांत आलेल्या मतावलीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन | |
| क्रमांक १ | सद्यस्थिती | ४७८ |
| क्रमांक २ | शिक्षणाची ध्येय | ४७९ |
| क्रमांक ३ | शिक्षण संकल्पना | ४८२ |
| क्रमांक ४ | राष्ट्र संकल्पना | ४८४ |

| कोष्टक क्रमांक | तपशिल | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| **क्रमांक ५** | शिक्षक विद्यार्थी सहसंबंध | ४८५ |
| क्रमांक ६ | अध्ययन-अध्यापन पध्दती | ४८६ |
| क्रमांक ७ | मानव | ४८८ |
| क्रमांक ८ | अभ्यासक्रम | ४९० |
| क्रमांक ९ | शिस्त | ४९२ |
| क्रमांक १० | संस्कृती | ४९३ |
| | चिन्मय साधकांना व शिक्षण तज्ज्ञांना देण्यांत आलेल्या मतावलीचा सहसंबंध | |
| क्रमांक १ | शिक्षण | ४९४ |
| क्रमांक २ | शिक्षणाची ध्येय | ४९५ |
| क्रमांक ३ | राष्ट्र | ४९५ |
| क्रमांक ४ | शिक्षक विद्यार्थी सहसंबंध | ४९६ |
| क्रमांक ५ | अध्ययन अध्यापन | ४९६ |
| क्रमांक ६ | मानव | ४९७ |
| क्रमांक ७ | अभ्यासक्रम | ४९७ |
| क्रमांक ८ | शिस्त | ४९८ |
| क्रमांक ९ | संस्कृती | ४९८ |

# समर्पण

Dedicated to that glory of the Master

Which made us his own for ever.



As a teacher I have given you all you need.

Now it is for you to apply it all in life and learn to

live accepting everything, rejecting nothing.

Reflecting all, yet, keeping nothing.

# प्रेरणास्थान

स्वामी तेजोमयानंद सरस्वती



गुरुब्रह्मा गुरुर्विष्णु: गुरुर्देवो महेश्वर: ।
गुरुरेव परं ब्रह्म तस्मै श्री गुरवे नम: ।।

# प्रेरणास्थान

स्वामी पुरूषोत्तमानंद सरस्वती



गुरु: शिवो गुरुदेवो गुरुर्बंधु: शरीरिणाम् ।

गुरुशत्वा गुरुर्जीवो गुरुरन्यन्न विद्यते ।।

Guru is Shiva

Guru is God

Guru is the relative of all embodied beings

Guru is the Atman

Guru is Jiva

There is nothing other than the Guru

- गुरुगीता

प्रकरण १ ले

# प्रस्तावना



***All religious idols are mystic symbols. To learn the art of interpreting them is to experience a harmony in our devoted contemplations heard without ears, seen without eyes !***

।। श्री गणेषाय नमः ।।

# प्रस्तावना

## १.१ प्रास्ताविक :-

"ज्ञान देव तु कैवल्यम" मानवाच्या जन्म मरणादी दु:ख रूप संसार बंधनाचे मुख्य कारण आत्मस्वरूपाचे अज्ञान कारण आत्मस्वरूपाचे अज्ञान हे अज्ञान बंधनात आत्मज्ञानानेच दूर होऊ शकते.

– स्वामी पुरूषोत्तमानंद सरस्वती

शिक्षण ही व्यक्ती व समाजाला मार्गदर्शन करणारी एक शक्ती आहे. मानवाचे जीवन सुसंस्कारीत करणारी व सामाजिक विकास घडवून आणणारी एक प्रक्रिया आहे. शिक्षणाचा अर्थ पहावयाचा असेल तर सर्वप्रथम मानवी जीवनाचा क्रमविकास कसा झाला हे पहावे लागेल. मानवाचे प्रारंभिक जीवन अतिशय व्यवहारिक पातळीवरचे होते, केवळ जीवन विषयक मुलभूत गरजा भागविणे एवढाच प्रारंभिक अवस्थेत मानवाचा उद्देश होता. परंतु सृष्टिचक्रातील बदलाचा, नैसर्गिक सृष्टिक्रमाचा, सृष्टिचक्राचा परिणाम मानवी मनावर झाला व ह्यातूनच मानवाचा निसर्गाशी असणारा मानवी संबंध शोधण्याचा प्रयत्न केला व संस्कृतीच्या निर्मितीच्या प्रक्रियेला प्रारंभ झाला. मानवाची रानटी अवस्था संपून एका नव्या अवस्थेला प्रारंभ झाला व माणूस आपल्या जीवनाचा खरा अर्थ शोधु लागला. या शोधातून धर्म, कला, तत्वज्ञान उदयास आले. मूल्यसंकल्पना उदयाला आल्या व मानवी जीवनाला उदात्त अधिष्ठान प्राप्त झाले. एक तात्विक, वैचारिक संघर्षाला प्रारंभ झाला. प्राचीन काळापासून हा वैचारिक संघर्ष आजतागायत सुरू आहे. मानवाची संस्कृती परंपरा मूल्य नैतिकता ह्या सर्वांचे संस्कार प्रत्येक पिढीवर करण्याची आवश्यकता मानवाला भासू लागली व ह्यातून शिक्षण संकल्पनेचा उदय झाला, शिक्षणाचा आशय, उद्दिष्ट्ये पध्दती, कालमानारूप बदलली. समग्र मानवी जीवनात अमुलाग्र परिवर्तन घडत गेले, पण या सर्वांचे श्रेय शिक्षणाकडे जाते.

व्यक्ति व समाज यांना मार्गदर्शन करणारी शिक्षण ही एक शक्ति आहे. मानवाचे जीवन विकसीत करणारी व समान जीवन नियंत्रीत करणारी शिक्षण ही एक प्रणाली आहे.

## १.२ शिक्षणाचा अर्थ :-

भारतीय तत्वज्ञानाच्या दृष्टिकोनातून शिक्षणाचा विचार केल्यास प्राचीन काळी शिक्षण प्रक्रिया ही ''ज्ञानप्राप्ती'' या संकल्पनेशी निगडीत होती. ज्ञानप्राप्ती हे पवित्र कर्म समजण्यात येत असे, ''न हि ज्ञानेन सदृशं पवित्रम् इह विद्यते'' हे ज्ञान स्वरुप ज्ञानाशी निगडीत होते. ''सा विद्याया विमुक्तये'' जे भौतिक व पार्थीव बंधनातून मुक्त करते तेच खरे शिक्षण, ''ऋतं ज्ञानात न मुक्ती'' मानवाला मुक्तीचा मार्ग दाखविते ते खरे शिक्षण. आध्यात्मिक ज्ञान प्राप्ती म्हणजे शिक्षण, ही संकल्पना प्राचीन काळी रूढ होती. ज्ञान म्हणजे मुक्ती, महाभारतात विद्येचे महत्व ''नास्ती विद्यासमं चक्षु:'' असे विद्येचे वर्णन आढळते. ज्ञानचक्षु माणसाला जीवनाचे साफल्य शिकवितो व सार्थक जीवन जगण्याकरिता मदत करतो. विवेकानंद म्हणतात, ''जे शिक्षण जीवन संघर्षात माणसाला टिकवून ठेवण्याचे सामर्थ्य प्राप्त करते तेच खरे शिक्षण'' स्वामी विवेकानंदांनी प्राचीन आध्यात्मिक तत्वज्ञानाला व्यवहारिकतेची जोड दिली.

थोर भारतीय तत्वज्ञ साहित्यिक रविंद्रनाथ टागोर ज्यांच्या विचार सरणीत आदर्शवाद, निसर्गवाद, वास्तववाद, प्रयोगवाद, लोकतंत्रवाद, मानवतावाद, विश्ववाद आढळतो. त्याचा शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन व्यापक आहे. ''संपूर्ण मनुष्यत्वाचा विकास'' (Development of complete manhood) ह्या भुमिकेतून ते शिक्षणाकडे पाहतात व ''व्यावहारिक दृष्टिकोनातून सर्व प्रकारच्या दास्यातून मुक्ती म्हणजे शिक्षण'' अशी शिक्षणाची परिभाषा करतात (Liberation from all types of slavery). सर्व प्रकारच्या दास्यतेत त्यांना शारीरिक, मानसिक, आर्थिक, सामाजिक व राजकीय दास्यता अभिप्रेत होती.

महात्मा गांधीच्या तत्वज्ञानातही आदर्शवाद, निसर्गवाद, कार्यवाद व वास्तववाद यांचे मिश्रण आढळते. माणसातील उत्कृष्टतेचा अविष्कार म्हणजे शिक्षण, ह्या दृष्टिकोनातून ते शिक्षणाकडे बघतात. "Literacy is not all end of education not even the begining by education I mean drawing out of the best in mans body, mind and spirit". महात्मा गांधी यांचा शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन आध्यात्मवादी तर आहेच पण व्यवहारिकही आहे. शैक्षणिक विचाराच्या माध्यमातून त्यांनी सार्वभौमिक व शाश्वत मूल्यांचे

प्रतिपादन केले आहे.

पंडीत मदनमोहन मालवीय यांच्या मते ''शिक्षण ही केवळ प्रक्रिया नाही तर वस्तुंचे वास्तविक ज्ञान प्राप्त करणे म्हणजे शिक्षण'' "Education is not a process, but the real knowledge of subject" व्यक्तिच्या व्यक्तिमत्वाच्या वेगवेगळ्या घटकांचा योग्य विकास करणे म्हणजे शिक्षण.

स्वामी विवेकानंद शिक्षणाकडे आधात्मवादी भूमिकेतून अर्थात सर्वांगीण विकासाच्या दृष्टिकोनातून बघतात. शिक्षणाची परिभाषा करतांना ते म्हणतात ''व्यक्तिमधील पूर्णत्वाची अभिव्यक्ती म्हणजे शिक्षण'' "Education is the manifestation of perfections already present in man". मानवाचे रूप पूर्ण स्वरूप आहे, पण केवळ अज्ञानामुळे त्याला आपल्या स्वरूपाची जाणीव नसते. ही जाणीव शिक्षणामुळे त्याच्यात निर्माण होते, म्हणून ''आत्म्याला अनावृत्त करणे म्हणजे शिक्षण''.

योगी अरविंद यांनी आपल्या शैक्षणिक विचारात आध्यात्मिक विकास व चारित्र्यसंवर्धन याला प्राधान्य दिले आहे. परिपूर्ण मानव या संदर्भात मानवाचा विकास घडवून आणणे व महामानव या भुमिकेत त्याचा सर्वांगीण विकास करणे हा क्रमविकासाचा दृष्टिकोन त्यांनी माडला.

स्वामी दयानंद सरस्वती यांनी शिक्षणाचा सदगुणांचा विकास, सदगुणांची प्राप्ती, चारित्र्य संवर्धन या दृष्टिकोनातून विचार केला आहे. ते म्हणतात न विद्या विना सौख्यं। नारायणां जायते धृवम्। अतो धर्मार्थ मोक्षभ्यो। विद्यासमं समाचरित्रं। (व्यवहार भानू) अर्थात विद्येशिवाय मनुष्याच्या जीवनात दु:ख निर्माण होते. धर्म व मोक्ष प्राप्तीकरीता विद्याभ्यास अतिशय आवश्यक आहे. म्हणून शिक्षणाची परिभाषा करतांना तें म्हणतात, "Education is the attainment of virtue".

राजा राममोहन राय ज्यांचे तत्वज्ञान तत्कालिक समाजिक कुप्रथा धार्मिक अंधश्रध्दा यांची प्रतिक्रिया म्हणून विकसित झाले होते. शिक्षणाबद्दल ते म्हणतात, ''शिक्षण म्हणजे आत्मोन्नतीचे साधन'' "Education is as agency of self development"

शिक्षण हे एक असे साधन आहे, ज्याच्या माध्यमातून अज्ञानाच्या अंधविश्वासाच्या दलदलीत फसलेल्या मानव समाजाचे उन्नयन होऊ शकेल. जर भारतीय नैतिकता, आध्यात्मिकता व मूल्यांचे संरक्षण करायचे असेल तर समाजात शिक्षणाचा प्रचार, प्रसार व विकास करावा लागेल.

शिक्षणाची संकल्पना मांडतांना आचार्य विनोबा भावे म्हणतात, ''मूल मुलत: पूर्ण असते, आत्मशक्तिच त्याच्यात बीजरूपाने अस्तित्वात असते तिला पूर्णपणे विकसित करणे म्हणजे शिक्षण''.

डॉ. राधाकृष्णन म्हणतात, शिक्षण म्हणजे व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण विकास करणारी प्रक्रिया किंवा शक्ति, खऱ्या अर्थाने मनुष्य तोच आहे, त्याचा बौध्दिक, आत्मिक, आध्यात्मिक, नैतिक आणि शारिरीक विकास झाला आहे''.

जे. कृष्णमूर्ती म्हणतात, ''शिक्षण म्हणजे केवळ माहिती गोळा करणे असा समज झाला आहे, त्यामुळे मन क्रियाहीन होते व शिकण्याची कुवत नष्ट होते. व्यक्तीच्या ठिकाणी गोळा झालेले ज्ञानाचे भांडार दिसायला खूप मोठे दिसत असले तरी अनुभवाला मर्यादा घालते, त्याउलट खरे शिक्षण अमर्याद असते'' यथार्थ शिक्षणाची संकल्पना जे कृष्णमुर्ती यांनी मांडली आहे.

लोकमान्य टिळकांनी वेळोवेळी शिक्षणाचा अर्थ काय ? शिक्षणाचे कार्य कोणते? अभ्यासक्रम कोणता असावा ? इ. शैक्षणिक विषयांवर आपले भाष्य केले आहे. त्यांनी राष्ट्रीय शिक्षणाची संकल्पना मांडली, राष्ट्रीय शिक्षणाची व्याख्या करतांना ते म्हणतात ''राष्ट्र पुरूषांची उन्नती करणारे राष्ट्रीयत्वाची ओळख करून देणारे तेच खरे राष्ट्रीय शिक्षण होय''.

रामगीते मध्ये ''विद्या विमोक्षाय विभती केवला'' म्हणजे जीवनातील अक्षय सुख प्राप्त करून देण्याचे सामर्थ्य फक्त विद्येतच आहे असा उल्लेख आहे. महाभारतात असे नमूद करण्यांत आले आहे, ''नास्ती विद्यासमचक्षु'' म्हणजेच शिक्षणासारखे यथार्थ व निर्दोष ज्ञान देणारे दुसरे साधन नाही.

शिक्षणाबाबत प्राचीन संकल्पना वेगळी होती, सामान्यपणे लेखन, वाचन, पाठांतर, धार्मिक, सांस्कृतिक रितीरिवाज इ. चे शिक्षण मुलांना घरीच मिळे. उपजीविकेकरिता

आवश्यक किमान कौशल्यही कुटुंबातच मिळे, गुरुच्या आश्रमात विशेषप्रतिचे उच्च प्रतिचे शिक्षण दिले जाई. हे शिक्षण विशेषकरून आत्मोन्नतीचे शिक्षण असे.

**तात्पर्य :-**

शिक्षणाकडे पाहण्याचा भारतीय दृष्टिकोन हा अधिकतम आध्यात्मिक आहे, परिस्थितीनुसार शिक्षण हे व्यवहारवादी, निसर्गवादी बनले, पण त्याचा मूलाधार आध्यात्माचं आहे. कारण आध्यात्मिकता हे भारताचे अंतरंग आहे.

पाश्चात्य दृष्टिकोनातून शिक्षण ही सामाजिक त्याच प्रमाणे वैयक्तिक विकासाशी निगडीत प्रक्रिया आहे. शिक्षणाच्या माध्यमातून व्यक्तिचा मानसिक विकास घडून येतो. शिक्षण हे अंतिम सत्य प्राप्त करून घेण्याचे साधन मानले गेले आहे. इ.स.पू. ४०० च्या सुमारास प्लेटोने अध्यात्मिक व आदर्शवादी भूमिकेतून शिक्षणाचा अर्थ लावला. आत्मसाक्षात्कार हे शिक्षणाचे प्रमुख ध्येय मानले, परंतु हे ध्येय समजण्यास कठीण शिवाय अमूर्त म्हणून ही बाब अनाकलनीय, ही प्रवृत्ती वाढु लागली. प्लेटो शिक्षणाला नैतिक प्रशिक्षण मानतो व शिक्षणाकडे नैतिक विकास ह्या दृष्टिकोनातून बघतो. (Education as the process of moral training and moral developments)

ॲरिस्टॉटल शिक्षणाला अशी शक्ती समजतो की जिच्या माध्यमातून व्यक्तिचे मानसिक उन्नयन होऊन व्यक्ती जीवन मूल्यांची प्राप्ती करून घेऊ शकतो.

रूसो शिक्षणाला नैसर्गिक प्रक्रिया मानतो (Natural process) शिक्षण ही कृत्रिम प्रक्रिया नसून स्वाभाविक व नैसर्गिक प्रक्रिया आहे. रूसोने शिक्षणाचा संबंधी केवळ बुध्दिस पुष्ट करण्यापुरता न जऊन मानवी मनाचा व आत्म्याचा मानवाच्या शरीराचा व इंद्रियांचा नैसर्गिकरित्या व मुक्तपणे विकास करण्याशी जोडून शिक्षणाला संपूर्ण जिवनाशी जोडले. त्याचे उद्दिष्ट व्यक्तिच्या शील संवर्धनाशी, भावनांच्या पोषणाशी व मुक्त अविष्काराशी व आत्म्याच्या सुप्त शक्तीच्या अभिव्यक्तीशी जोडून शिक्षणाला जीवंत नैसर्गिक व आनंदमय बनवणे असे त्याचे वर्णन करता येईल'' ब्राऊन शिक्षणाकडे व्यक्तिवर्तनाच्या परिवर्तनातून सामाजिक परिवर्तन या भूमिकेतून बघतो. व्यक्तिमध्ये परिवर्तन झाल्यास समाजात व त्याच्या

अवतीभोवती असलेल्या वातावरणात परिवर्तन होतात. जॉन ड्युई शिक्षणाला सामाजिक प्रक्रिया मानतो. लोकशाही समाजनिर्मितीकरीता शिक्षणाचे महत्व प्रतिपादन करतो. कोमेनिअसने मात्र शिक्षणाला ईश्वरप्राप्तीचे साधन मानले असून आध्यात्मिक सुख व शांतीचे साधन मानले आहे. शिक्षण ही आध्यात्मिक प्रक्रिया मानली आहे. फ्रोबेल शिक्षणाला विकासाची प्रक्रिया मानतो.

मॉण्टेसरी व पेस्टालॉजी हे शिक्षणाकडे समविकासाच्या दृष्टिकोनातून बघतात. स्पेन्सर मात्र शिक्षणाला आदर्शवादी दृष्टिकोनातून बघत नाही, तर शिक्षणाला वास्तव प्रक्रिया मानतो. व्यक्ती आपले जीवन सुखमय बनविण्याकरिता जीवनात सफलता प्राप्त करतो. जीवनाचे ते दोन पैलु मानतात. १) व्यक्तिमत्व जीवन, २) सामाजिक जीवन, व्यक्तिच्या शारीरिक, मानसिक, भावनिक, सामाजिक व नैतिक विकासावर स्पेन्सर भर देतो. ज्या योगे व्यक्ति आपले व समाजाचे आयुष्य प्रगतीशील बनवू शकेल. हर्बाट शिक्षणाकडे नैतिकता व सदगुणांचा विकास ह्या दृष्टिकोनातून पाहतो. वास्तविक व उपयुक्त ज्ञान संपादन करण्याची शिक्षण ही एक प्रणाली आहे असे तो मानतो.

## १.३ शिक्षणाच्या परिभाषा :-

### १) प्लेटो (खि.पू. ४२७-३४७) :-

मनुष्याचे शरीर आणि आत्मा ह्यांना त्यांच्या नैतिक पात्रतेनुसार पूर्णत्वास नेणे यातच शिक्षण समावले आहे. जीवनाची अंतिम मूल्ये सत्यम्, शिवम्, सुंदरम् समजण्यासाठी त्याचा अनुभव घेण्याची पात्रता आणून देणारे जे शिक्षण तेच खरे शिक्षण होय.

### २) जॉन ड्यूई (१८५९ ते १९५२) :-

''शिक्षण म्हणजे भावी जीवनाची तयारी नव्हे तर मुलांचे प्रत्यक्ष अनुभवजन्य जीवनच होय. शिक्षण म्हणजे भोवतालच्या नैसर्गिक सामाजिक वातावरणाशी समरस होण्याची पात्रता व सामाजिक कार्यक्षमता मनुष्याच्या अंगी आणून देणे होय'' शिक्षण ही अनुभवाच्या पुन:संयोजनाच्या माध्यमातून घडणारी जीवनप्रक्रिया आहे. त्याचप्रमाणे अशा सर्व शक्तींचा विकास आहे, ज्याच्या माध्यमातून व्यक्ती आपल्या वातावरणाला नियंत्रित ठेवण्यास त्याचप्रमाणे आपल्या संभावना पूर्ण करण्यास योग्य बनेल.

३)  Dictionary of Education मध्ये शिक्षणाची परिभाषा पुढील प्रमाणे करण्यांत आली आहे. "Education is the aggregate of all processes by which a person develops ability, attitude and forms of behaviour of practical value in the society in which he lives the social process by which people are subjected to the influence of a selected and controlled environment, so that they may obtain social competence and optimum individual development".

**4 ) सॉक्रेटीस :-**

प्रत्येक माणसाच्या मनात अद्यायावत व वैश्विक विश्वासाकरीता असलेल्या कल्पना अभिव्यक्त करणे.

**5 ) फ्रोबेल :-**

प्रत्येक व्यक्तितील दैवी मूलतत्वांना उघड करणे, बाहेर काढणे, जाणीवावस्थेत आणणे, दैव ही मूल तत्वाबाबत मुक्त जाणीवयुक्त सेवकभाव निर्माण करणे, या तत्वाचे त्याच्या जीवनात मुक्त प्रतिनिधित्व होणे म्हणजे शिक्षण होय.

**६) स्वामी विवेकानंद :-**

सर्व ज्ञान, सुप्त शक्ति अंत:स्थित असतात, ज्याला आपण बल, शक्ति, प्राकृतीची गूढे म्हणतो ती सारी अंत:स्थितच असतात. सारे ज्ञान मानवात्म्यातूनच उदभूत होत असते. चीरकाल स्वत: निहित असलेलया ज्ञानाचीच अभिव्यक्ति व त्याचे अनावरण व्यक्ती करीत असते.

**७) भुर्तहारी :-**

विद्या नाम नरस्य रूपमधि कंप्रच्छन्न गुप्तधन
विद्या भोगकरिवश: सुखकरि विद्यागुरु ।
विद्या बन्धुजनो विदेशगमने, विद्या परमं दैवतंम्
विद्या राजसो पुजितात्नु धनं विद्या विहीन: पशु।।

मा. जस्टीस रामा जॉईस यांनी वरील श्लोकाचे भाषांतर पुढील प्रमाणे केले आहे.

"Education is the special manifestation of man. Education is the treasure which can be preserved without the fear of loss. Education secures material pleasure, happiness and fame. Education is the teacher of the teacher. Education is the friend, when one goes abroad. Education is the God incarnate. Education secures honour attachment of state not money. Man without education is equal to an animal."

८) **मा. जस्टीस रामा जॉईस** ह्यांनी शिक्षणाची परिभाषा पुढील प्रमाणे केली आहे.

Indian culture recognises education as one of the pious obligations of the human society.

## 1.4 शिक्षणाचा व्युत्पर्थ :-

शिक्षण हा शब्द संस्कृत मधील 'शास' या धातूपासून झाला. शास म्हणजे ताब्यात ठेवणे, शिस्त लावणे, शिकवणे, सूचना देणे. यावरून शिक्षण म्हणजे सूचना देण्याची शिकवण्याची प्रक्रिया, शिक्षण या अर्थात येणारे शब्द "विद्या" विद ह्या धातूपासून हा शब्द निर्माण झाला. विद् म्हणजे जाणणे, माहिती होणे, समजणे, संस्कृत उपपत्तीनुसार शिक्षण म्हणजे, गुरुने किंवा श्रेष्ठ व्यक्तिने शिष्यामध्ये व कनिष्ठ व्यक्तिमध्ये बदल घडवून आणण्याची क्रिया म्हणजे शिक्षण.

Education ह्या शब्दाची लॅटीन भाषेतील तीन शब्दापासून उपपत्ती मानली जाते. पाश्चिमात्य विद्वान शिक्षणाचा अर्थ लावतांना E-duco अशी Education शब्दाची व्युत्पत्ती सांगतात. E-out of आणि duco-I lead याप्रमाणे म्हणजे सुप्त असलेले प्रगट करणे. सुप्त शक्तींना जागृत करणे किंवा अप्रगट असणारे प्रगट करणे. लॅटीन भाषेतील शिक्षणाचा अर्थ खालील प्रमाणे आहेत.

1) Educare - To bring up or to nourish संवर्धन करणे, पालन पोषण करणे, वाढविणे.

2) Educere - To lead out, to draw out शिक्षण म्हणजे विकासाला चालना देणे आहे.

शिक्षण ह्या शब्दाच्या संदर्भात आजपर्यंत अनेक विचार प्रवाह प्रचलित आहेत. अनेक विचारवंतांनी आजपर्यंत शिक्षण शब्दाची संकल्पना केली आहे. शिक्षण ह्या शब्दाबाबत आजही काही गैरसमज प्रचलीत असण्याचे महत्वाचे कारण म्हणजे 'शिक्षण' ह्या संकल्पनेवर समाजाने चिंतन केले नाही, समाजाच्या दृष्टीने जेव्हा शिक्षण ह्या संकल्पनेचा विचार होतो तेव्हा या संकल्पनेबाबत काही गैरसमज आढळतात. हे गैरसमज साधारणत: पुढील प्रमाणे आहेत.

## १.५ शिक्षणाबाबत गैरसमज :-

### १) माहिती संपादन करणे :-

''भरपूर माहिती संपादन करणे म्हणजे शिक्षण'' ही शिक्षण विषयक एक प्रचलीत संकल्पना होय. आज आमच्या शाळा महाविद्यालयातून केवळ माहिती व पोपटपंचीवर भर दिला जातो. परीक्षा सुध्दा माहिती केंद्रीत झाल्या आहेत. आमच्या शाळा महाविद्यालय ही केवळ माहितीची केंद्रे बनली आहे. तर विद्यार्थी ग्राहक व शिक्षक हे विक्रेते बनले आहे. पण केवळ माहिती देणे म्हणजे शिक्षण नाही. ह्या माहितीच्या संपादनाने व्यक्तिमध्ये जीवन समर्थपणे जगण्याची क्षमता त्यांच्या ठिकाणी निर्माण व्हावयास हवी. माहितीला अनुभवाची जोड हवी, ज्ञान हे अनुभवजन्य हवे.

### २) शाळेत जाणे :-

शिक्षणाबाबतची आजची प्रचलीत संकल्पना म्हणजे शाळेत जाणे. मुलं शाळेत जायला लागले की सर्वसामान्यत: असे समजले जाते की, बालकाचे शिक्षण सुरू झाले व त्याचे औपचारिक शिक्षण संपले. अर्थात त्याचे महाविद्यालयीन जीवन संपले की त्याचे शिक्षण संपले

असे समजले जाते. जणु काही शाळेत जाण्याआधी व शालेय जीवन संपल्यावर व्यक्तीचे शिक्षण सुरू नव्हते. पण मानस शास्त्रातील अनुवंशाच्या सिध्दातानुसार व्यक्तीचे शिक्षण गर्भावस्थेपासून सुरू होते. व्यक्तीच्या अनुवंश पक्का झाल्यावर त्याच्या जन्म अवस्थेत मातेच्या गर्भात असतांना माता जे अनुभव घेते त्याचा परिणामस्वरूप व्यक्तिच्या शिक्षणाला प्रारंभ होतो. व्यक्तिच्या जन्मानंतर त्याची सामाजीकरणाची प्रक्रिया सुरू होते हा समाजशास्त्राचा सिध्दांत आहे. प्रथम मूल आपल्या कुटुंबाच्या संपर्कात येते. त्यानंतर ते शालेय समाजाच्या संपर्कात येते व त्यानंतर ते समाजात मिसळते. ह्या क्रमविकासात त्याला नित्य नवीन अनुभवाला सामोरे जावे लागते व ह्या अनुभवातून त्याचे शिक्षण निरंतर घडत असते. ह्या दृष्टिकोनातून विचार केल्यास "शिक्षण म्हणजे केवळ शाळेत जाणे हा विचार अत्यंत संकुचित आहे, शिक्षण ही आजन्म चालणारी निरंतर प्रक्रिया आहे''.

### ३) साक्षरता म्हणजे शिक्षण :-

शासनाने १०० टक्के साक्षरता घडवून आणण्याचा निर्णय घेतला आहे. साक्षरता म्हणजे व्यक्तिला किमान लिहता वाचता येणे अर्थात अक्षरओळख होय. पण केवळ व्यक्ति साक्षर झाला म्हणजे तो शिक्षीत झाला असे म्हणणे कितपत योग्य आहे ? साक्षरतेबरोबर जोवर सार्थकता व सुसंस्कृतपणा निर्माण होत नाही तोपर्यंत व्यक्तिचे शिक्षण झाले असे म्हणता येणार नाही. कारण साक्षरतेतून व्यक्तीला केवळ लिहिता वाचता येईल पण जीवनातील समस्यांना तो समर्थपणे तोंड देवू शकेलच असे नाही. तो सुसंस्कारीत होईलच असे नाही. कारण शिक्षणातून व्यक्तिच्या सर्वांगीण विकास व्हावयास हवा म्हणूनच शिक्षणाची परिभाषा करतांना म. गांधी म्हणतात - Literacy is not end of education not even begining. By education I mean drawing out best in man body, mind.

### ४) ज्ञान म्हणजे विद्वत्ता :-

एखाद्या व्यक्तीने किती पदव्या संपादन केल्या यावरून त्यांचा सुशिक्षितपणा ठरविण्यांत येतो. अर्थात पदव्यांची संख्या हा या युगात सुशिक्षित असल्याबाबतचा मापदंड झाला आहे, पण केवळ ज्ञान विद्वत्ता प्राप्त करणे म्हणजे शिक्षण नव्हे कारण पुष्कळ पदव्या प्राप्त

केलेल्या व्यक्तिचा भावनिक परिपोष झाला असेलच असे नाही, शिवाय त्याचा मानसिक विकास परिपूर्ण झाला असेलच असे नाही. केवळ विद्वत्ता म्हणजे ज्ञान नव्हे, कारण कोणतेही ज्ञान हे अनुभुतिशिवाय असेल तर ते ज्ञान या संकल्पनेत येत नाही. कारण ज्ञान हे अनुभूती शिवाय राहू शकत नाही. अनुभूतीशिवाय ज्ञान हे केवळ पोपटपंची ठरेल. म्हणून केवळ ज्ञान विद्वत्ता पांडित्य म्हणजे शिक्षण नव्हे असे अनेक उदाहरणे व्यवहारात बघावयास मिळतात की, गृहशाखा पारंगत असणारी विद्यार्थीनी सुगृहिणी असेलच असे नाही. वाणिज्य पारंगत असणारा विद्यार्थी व्यवहारात कुशल असेलच असे नाही. मराठी वाड.मय पारंगत विद्यार्थी शुध्दलेखनात कुशल असेलच असे नाही. शिक्षण पारंगत असणारे विद्यार्थी उत्कृष्ट अध्यापक असतीलच असे नाही.

वरील सर्व उदाहरणावरून हीच बाब सिध्द होते कि विद्वत्ता पांडित्य अथवा पदव्या म्हणजे शिक्षण नव्हे.

## १.६ शिक्षणाचा व्यापक अर्थ :-

व्यापक अर्थाने जेव्हा शिक्षण संकल्पनेचा आपण विचार करतो तेव्हा मुळाशी जाऊन त्याच्या अर्थाचा शोध घ्यावा लागेल. शिक्षण हा शब्द ''शिक्ष' ह्या धातु पासून निर्माण झाला आहे. ''शिक्ष'' ह्याचा अर्थ उपदेश करणे, शिक्षक आपल्या विद्यार्थ्याला उपदेश करतात. शिक्षण म्हणजे मार्ग दाखविणे. आपल्या शिष्यात योग्य ते बदल घडवून आणण्यासाठी शिक्षण आहे, कारण शिक्षण म्हणजे संस्कार, 'संस्कारात द्विज उगवते' अर्थात संस्काराने मानवाचा पुनर्जन्म होतो.

व्यापक अर्थाने शिक्षणाचा विचार करणे, शिक्षणाची परिभाषा करणे म्हणजे जीवनाची परिभाषा करण्या इतके महत्वाचे कार्य आहे. कारण व्यक्तिजीवनाला प्रारंभ झाल्यापासून त्याच्या शिक्षणाचा प्रारंभ होतो. हे शिक्षण त्याच्या अखंड चालणारी प्रक्रिया आहे. कारण व्यक्तीला प्रत्येक क्षणाला काही ना काही अनुभव येतात. प्रत्येक अनुभव त्याच्या वर्तनाची दिशा निर्धारीत करित असतो. अर्थात आपले वर्तन अधिकाधिक चांगले करण्याचा प्रयत्न करीत असतो. ह्या प्रयत्नात केवळ शाळेचीच भूमिका महत्वाची नसते तर ज्या कुटुंबात तो राहतो ते कुटुंब समान राष्ट्र समूहसंपर्क साधने इ. चा परिणाम त्याच्या वर्तनावर होत असतो. तात्पर्य शिक्षण ही जीवनभर चालणारी प्रक्रिया आहे.

शिक्षण

↓

सतत चालणारी प्रक्रिया

↓

अनुभव

↓

अध्ययन

↓ → अध्ययनाचा परिणाम

विकास

↓

शिक्षण प्रक्रिया

बोडेच्या मते शिक्षण ही विकासाची प्रक्रिया आहे. "Education is the process of Growth" शिक्षणाचे जे उद्देश आहेत ते व्यक्तिला विकासाच्या वाटेवर दीपस्तंभाचे व मार्गदर्शकाचे काम करतात.

## 1.7 शिक्षणाची कार्ये :–

शिक्षणाची कार्य कोणती या संदर्भात पं. जवाहरलाल नेहरू म्हणतात, "Education is supposed to develop an integrated human beings and to prepare young people to perform useful function for society and take part in collective life.

शिक्षणाने मानवाचा संतुलित विकास होतो. मानवी जीवनात शिक्षणाचे अनन्यसाधारण स्थान आहे. व्यक्तिगत जीवनात पुढील दृष्टिकोनातून शिक्षणाचे अनन्यसाधारण स्थान आहे.

## १) व्यक्तीच्या अंतर्गत सुक्त शक्तीचा विकास :-

शिक्षण नव्याने काहीही निर्माण करीत नाही तर केवळ मानवामध्ये असलेल्या सुप्त गुणांना शक्तींना अभीव्यक्त करते, प्रत्येक बीजामध्ये जशी क्षमता असेल त्याप्रमाणे त्यापासून वृक्षाची निर्मिती होईल. तद्वत मानवाच्या क्षमतांना फक्त प्रगट करण्याचे काम शिक्षण करते आणि म्हणूनच आत्म्याला अनावृत्त करणे म्हणजे शिक्षण अशी शिक्षणाची परिभाषा स्वामी विवेकानंदांनी केली आहे.

## २) व्यक्तिमत्वाचा विकास :-

शिक्षणाची परिभाषा करतांना "Progressive change in behavour" म्हणजे शिक्षण अशी संकल्पना करण्यात येते आणि व्यक्ती वर्तनाच्या गुणात्मकतेवर त्याचे व्यक्तिमत्व निर्धारीत होते आणि व्यक्तिमत्वाची जडणघडण ही शिक्षणातून होत असते. शिक्षणातून व्यक्तिवर्तनाला योग्य वळण मिळते. व्यक्तिचा शारीरिक, भावनिक, मानसिक, नैतिक, अध्यात्मिक परिपोष शिक्षणाच्या माध्यमातून घडून येतो.

## ३) चारित्र्य संवर्धन :-

शिक्षण हे सुसंस्काराचे साधन आहे. संस्कार ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. चारित्र्यवान व्यक्तिमुळे राष्ट्राची भाग्यनिर्मिती होत असते. डॉ. राधाकृष्णन म्हणतात, "Character is destiny, character is that on which the destiny of a nation is built one can not have a great nation with man of small character."

आज सर्वत्र भौतिकवाद फोफावतो आहे व ह्या वहावत जाणाऱ्या समाजात चारित्र्य संवर्धनाचे कार्य अतिशय महत्वाचे आहे.

## ४) सामाजिक भावनेचा विकास :-

व्यक्ति जरी जन्मत: स्वतंत्र असली तरी त्याची समाजाशी, राष्ट्राशी बांधिलकी असते. तो समाजाचा त्याचप्रमाणे राष्ट्राचा घटक असतो. व्यक्तिच्या ठिकाणी सामाजिकतेचा, सामाजिक जबाबदारीच्या भावनेचा विकास हे शिक्षणाचे महत्वाचे कार्य आहे. शिक्षणाच्या

माध्यमातून व्यक्ती स्वत:चा त्याचसोबत समाजाचा विकास करावयास सक्षम बनली पाहीजे. एच.गार्ड यांच्या मते, "Education needs to recognise that he may move in the direction of bringing the social process to individual who are not capable of deating with it".

## ५) सुसंस्कृततेचा विकास :-

सुसंस्कृततेची परिभाषा करावयाची झाल्यास ‘‘ज्याने संस्कृती आत्मसात केली तो सुसंस्कृत’’ अशी करावी लागेल. व्हाईट हेडच्या मते, ‘‘संस्कृती म्हणजे वैचारिक कृतीशिलता व गतिमानता आणि जीवनातील सौंदर्य व मानवी भावनाबाबत संवेदनशीलता.’’

संस्कृती व कला मानवी जीवनाला उदात्त बनवितात, विद्यार्थ्यांमधून अशा गुणांनी युक्त असा मानव घडायला हवा. याकरिता अभ्यासक्रमाबाबत "Integrated out look" हवा अर्थात एकात्म दृष्टिकोन हवा.

## ६) नैतिक व आध्यात्मिक मूल्यांचे संस्कार :-

व्यक्तिची नैतिकता व अध्यात्मिकता म्हणजे व्यक्तीचे चारित्र्य होय. चारित्र्य म्हणजेच सद्‌वर्तन, प्रामाणिकपणा, सत्यप्रियता, सहानुभूती, सेवा, त्याग, निस्वार्थबुध्दी, ध्येयनिष्ठा, धर्मविड, इ. गुणांचा चारित्र्यात समावेश करता येईल. अशा गुणांचे संक्रमण विद्यार्थ्यांमध्ये करणे सत्प्रवृत्ती, सदविचार व सदभावनांचे प्रवर्तन, नैतिक, आध्यात्मिक मूल्यांचे संस्कार करून त्यांचे चारित्र्य घडविणे हे शिक्षणाचे परमोच्च ध्येय कार्य आहे.

## 7) शिक्षणाची काही राष्ट्रीय कार्ये :-

अ. राष्ट्रीय शिस्त

ब. राष्ट्रीय एकात्मता व भावनिक ऐक्य

क. राष्ट्रीय विकास

ड. नेतृत्व व नैतिकतेचे प्रशिक्षण

इ. संस्कृती संरक्षण, संक्रमण व संवर्धन

व्यक्तिगत जीवन आणि सामाजिक जीवन घडविण्यात शिक्षणाचा वाटा मोठा असतो. चांगल्या सवयी अंगी रूजविणे, मनाला वळण लावणे, चारित्र्य संवर्धन करणे, सुप्त गुणांचा विकास करणे, सहकार्य भावना वाढीस लावणे, व्यासंग वाढविणे, छंदाचा विकास करणे, अशा किती तरी गोष्टी शिक्षणाने व्यक्तिच्या जीवनात घडवून आणता येतात.

वरिल प्रमाणे शिक्षणाचे कार्य अभ्यासल्यावर एक निष्कर्ष निश्चित निघतो की, ''शिक्षण म्हणजे सुसंस्कार'' व संस्काराची ही क्रिया अखंड व अव्याहतपणे सुरू असते. शालेय शिक्षणातून ह्या संस्काराबाबत नियोजनबध्द आयोजन करावे लागते. अर्थात अभ्यासक्रम, अभ्यासपूरक कार्यक्रम, सहशालेय उपक्रम, ह्या सर्वांतून मुलांवर संस्कार होत असतात. शिक्षण ही आजच्या युगात व्यक्ती व समाजाचे जीवन घडविणारी शक्ती समजली जाते. डॉ. राधाकृष्णन म्हणतात, ''शिक्षणातून केवळ साक्षर निर्माण करावयाचे नसून माणसे निर्माण व्हावयास हवी, बुध्दी, हृदय व आत्मा यांच्या विकासाला शिक्षण म्हणतात''. साने गुरुजी म्हणत, ''शिक्षण म्हणजे विद्यार्थ्यांतील माणूस जागा करणे, शिक्षणातून माणूस निर्माण व्हावला हवा, शिक्षणाने जीवनाचे सर्वांग उजळून निघावे. विद्यार्थ्यांत सत्यप्रिती वाढविणे, प्रामाणिकपणाची जोपासना करणे, सहकार्याची भावना निर्माण करणे, समाजसेवेची भावना वाढीस लावणे, जातीभेद व भेदाभेद यांचे उच्चाटन करणे हे शिक्षणाचे ध्येय आहे'' पण आज शिक्षणाचे हे ध्येय सफल झाले कां ? आज माणसाचे नैतिक खुजेपण वाढत आहे. शिक्षणातून कर्मयोग, ज्ञानयोग व आनंद यांचा त्रिवेणी संगम व्हावयास हवा व ह्या अनुषंगाने शिक्षणातून सत्यम शिवम सुंदरम् चा साक्षात्कार व्हावयास हवा.

शिक्षणाबाबत सर्वांगपरिपूर्ण विवेचन केल्यावर मूल्य ह्या संकल्पनेचा विचार करावा लागेल. कारण मूल्य संस्कार, मूल्य संक्रमण, मूल्य संवर्धन हे शिक्षणाच्याच माध्यमातून घडत असते. मूल्य व शिक्षण ह्या अर्थाने एकाच नाण्याच्या दोन बाजु आहेत.

## १.८ शिक्षणाबाबतचा दृष्टिकोन :-

शिक्षणाबाबतचा दृष्टिकोनाचा विचार करता दोन प्रकारे याचे विवेचन करता येते.

१) शिक्षणाबाबतचा प्राचीन दृष्टिकोन

२) शिक्षणाबाबतचा आधुनिक दृष्टिकोन

## शिक्षणाबाबतचा प्राचीन भारतीय दृष्टिकोन :-

प्राचीन वाङ.मयात ''शिक्षण'' ह्या शब्दाचा विशेष प्रमाणात वापर झालेला आढळत नाही. त्याऐवजी समानार्थी शब्द म्हणून ''ज्ञान'' ''विद्या'' ह्या संज्ञांचा उपयोग केलेला आढळतो. जीवनामध्ये शाश्वत सुख हवे असेल तर ज्ञानाचीच कास धरावी लागेल. शिक्षणाने मनुष्याला भौतिक सुख मिळेल, पण आध्यात्मिक व मानसिक सुखापासून तो वंचित होईल.

गीतेमध्ये श्रीकृष्णाने ज्ञानास पवित्र असे घटक मानले आहे. ''नहि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते'' असे विधान करून ज्ञानाबाबतचा दृष्टिकोन मांडला आहे. कणादांच्या मते ''शिक्षण हे मानवामध्ये आत्मसंतोष निर्माण करण्याचे साधन आहे''. विद्येच्या माध्यमातून ज्ञान, विज्ञान व नियम इ. गुणांचा विकास व्हावयास हवा असे विधान केले आहे.

सुभाषित रत्नसंदोहात ''ज्ञानं ततीयं मनुजस्य नेत्रम'' अर्थात ज्ञान म्हणजे माणसाच्या तिसरा डोळा असा उल्लेख आहे. महाभारतात ''नास्ति विद्यासमं चक्षु:र्नास्ती सत्यतमं तप:'' शिक्षणा सारखे यथार्थ व निर्दोष ज्ञान देणारे दुसरे साधन नाही.

वरील सर्व विवेचनावरून एक बाब लक्षात येते की, प्राचीन काळाच्या व आजच्या शिक्षणाच्या संकल्पनेत विलक्षण तफावत आहे. आज शिक्षण म्हणजे साक्षरता, लेखन, वाचन असा अर्थ अभिप्रेत असतो, पण प्राचीन काळचे शिक्षण जीवोन्नती, आत्मोन्नती ह्या दृष्टिकोनातून देण्यांत येत असे. कारण जीवनाचे अंतीम ध्येय, आत्मसाक्षात्कार होणे. ज्ञानापेक्षाही सद्‌गुणांवर, सदाचारावर, नैतिक वागणुकीवर अधिक भर होता. धर्मानुसार आचरण करणारा, शुध्दाचरणी, चारित्र्यसंपन्न माणूसच खरा ज्ञानी आहे ही संकल्पना रूढ होती. नैतिक मूल्यांचे संस्कारातून चारित्र्य घडविणे हे शिक्षणाचे उद्दिष्ट होते. सद्‌वर्तनावर विशेष भर होता. अशा दृष्टिने चारित्र्यसंवर्धन करण्याकरिता व्यक्तीने जितेंद्रीय बनावे याकरीता पातंजली आपल्या योगशास्त्रात, ''योगश्चित्त वृत्ती निरोध:'' अर्थात चित्तवृत्तींचा निरोध करून चित्तशुध्दी

होते, असे प्रतिपादन केले आहे. हे सर्व करतांना प्राचीन शिक्षणाने भौतिकतेकडेही पाठ फिरविली नाही. ऐहिक समृध्दीकरीता धर्म, अर्थ, काम, मोक्ष या पुरूषार्थाच्या माध्यमातून ऐहिक संमृध्दी प्राप्त करणे ही संकल्पना होती. वैयक्तिक विकासा सोबतच सामाजिक, जबाबदारीची जाणीव विकसित करण्याचा प्रयत्न शिक्षण संकल्पनेत होता. कर्तव्यपालनावर विशेष भर होता.

वरील सर्व विवेचनावरून एक बाब लक्षात येते की, प्राचीन भारतीय शिक्षण पध्दतीचा पाया आध्यात्म होता. शिक्षणाला धार्मिक, नैतिक, आध्यात्मिक, सामाजिक मूल्यांचे अधिष्ठान होते.

## शिक्षणाबाबतचा पाश्चात्यांचा प्राचीन दृष्टिकोन :-

पाश्चात्य दृष्टिकोनातून शिक्षणाचा विचार केल्यास मानवी जीवनाचा विकास हे महत्वाचे ध्येय शिक्षणाचे आहे. कारण मानवी जीवन हे खऱ्या अर्थाने अध्यात्मिक जीवन व सांस्कृतिक जीवन आहे ही धारणा पाश्चात्य संस्कृतीत रूजली होती, ''मनुष्य प्राणी म्हणजे शरीर व शारीरिक वासना नसून आत्मतत्वच व्यक्तिमत्वाचा गाभा आहे'' अशी धारणा होती. म्हणजेच बुध्दीमत्ता, विचारशीलता, सद्सद्विवेक, कल्पकता, आध्यात्मिकता, नैतिकता, सर्जनशीलता, मानवी प्राण्याची व्यवच्छेदक वैशिष्ट्ये आहेत. माणूस आपल्या सर्जनशील शक्तीच्या साहाय्याने आपल्या मानसिक व आध्यात्मिक गरजा पूर्ण करू शकतो. आध्यात्मिक सुखशांतीकरिता धडपड करणे ही त्याची नैसर्गिक वृत्ती असते. ग्रीक आदर्शवादात सत्यं, शिवं व सुंदर ही जीवनाची सर्वश्रेष्ठ मूल्ये मानली आहेत. मानवी जीवनाविषयीची धारणा आदर्शवादी आहेत. परिणामी याचे प्रतिबींब शिक्षणविषयक संकल्पनेत पडलेले आपणास आढळते. सॉक्रेटिस ''ज्ञान म्हणजे सद्गुण अशी संकल्पना शिक्षणाच्या माध्यमातून भ्रमनिरास व सत्यान्वेष यावर भर देतो''. प्लेटो शिक्षणाची परिभाषा करतांना म्हणतो, मनुष्याचे शरीर व आत्मा यांना नैसर्गिक पात्रतेनुसार पूर्णत्वास नेणे म्हणजे शिक्षण होय, ॲरिस्टॉटल शिक्षणाकडे शाश्वत सुखाच्या प्राप्तीचे साधन ह्या दृष्टिकोनातून पाहतो. तर शिक्षणाची परिभाषा करतांना युकेन म्हणतो, ''अंतिम सत्य, विश्वात्मक मूल्यांचा शोध, त्याची व्यक्तिमत्व जीवनात अनुभूती व तद्द्वार जीवनाला आध्यात्मिक सामर्थ्य प्राप्त करून घेण्याच्या प्रयत्नात सहाय्य करणे म्हणजे शिक्षण'' अशी शिक्षणाची परिभाषा केली आहे.

वरील सर्व विवेचनावरून लक्षात येते की, "Divine Discontent" म्हणजेच ब्रम्हजिज्ञासा हे मानावाचे लक्षण असल्यामुळे स्वरूप ओळखून अंतिम सत्याचे ज्ञान प्राप्त करणे हे शिक्षणाचे उद्दिष्ट होते. प्राचीन कालीन प्राश्चात्य शिक्षण हे मूल्याधिष्ठित होते. अर्थात सत्यं शिवं सुंदरम ह्या जीवन मूल्यांशी निगडीत ही शिक्षण व्यवस्था होती. आध्यात्म वादात ही संकल्पना पाश्चात्य विचारधारेनुसार सत्यं शिवं सुंदरम ह्या मूल्यत्रयीच्या रूपात मांडली आहे, प्राचीन काळी शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन ''संस्कृती आत्मसात करण्याचा प्रयत्न ह्या दृष्टिकोनातून मांडण्यांत आला होता''.

तात्पर्य शिक्षणाबाबतचा भारतीय व पाश्चात्य दृष्टिकोन हा विशेषत्वाने आध्यात्मवादी होता, मूल्याधिष्ठित होता. व्यक्ति जीवनाच्या ध्येयाशी निगडीत होता.

## शिक्षणाबाबतचा आधुनिक दृष्टिकोन :-

जसजसा काळ बदलतो तसतसे समाजाच्या रचनेत परिवर्तन होतात. प्राचीन काळी जो जीवनविषयक दृष्टिकोन होता तो आज नाही. आजचे युग विज्ञानाचे युग आहे, ज्ञानाचा विस्फोट झाला आहे, त्याचसोबत तंत्रज्ञानाचाही विस्फोट झाला आहे. प्रत्येक क्षेत्रात नवनवीन तंत्रज्ञान विकसीत झाले आहे, प्रत्येक क्षेत्रात आधुनिकीकरणाने जोम धरला आहे. शिक्षणाच्या नव्या आकांक्षा समाजात रूजत आहेत. ह्या परिस्थितीत शिक्षणाचा दृष्टिकोन याला अपवाद कसा ठरेल ? आज शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला आहे. शिक्षणाची ध्येय बदलली आहेत, आज शिक्षणातून व्यक्तीचा केवळ धार्मिक विकास करावयाचा नसून राष्ट्रीयत्वाच्या दृष्टिने नागरिकत्वाच्या दृष्टिने आध्यात्मिक दृष्टिकोनातून शिक्षणाचा विचार करावयाचा आहे. प्राचीन भारतीय संस्कृतीच्या पायावर आधुनिक शिक्षणाची इमारत उभी करणे हे शिक्षणाचे महत्वाचे ध्येय आहे. व्यक्तिचे आध्यात्मिक, सांस्कृतिक व भौतिक जीवन शिक्षणाने समृध्द व्हावयास हवे. तद्वतच राष्ट्राचे आधुनिकीकरणाच्या दृष्टीने विकास व्हावयास हवा. ह्या अनुषंगाने विचार केल्यास आजच्या विज्ञान युगात शिक्षणाचा पाया हा प्राचीन तत्वावर आधारीत असावा, कारण प्राचीन दृष्टिकोन हा जीवनाला मूल्य प्राप्त करून देणारा आहे. जीवनाची उंची वाढविणारा आहे, जसे विज्ञान युग आले तसे मानवाच्या जीवनविषयक संकल्पना बदलल्या व मानव अधिकाधिक भौतिकवादी बनला व परिणामी तो शाश्वत सुखाला

मुकला, शिक्षणातील विज्ञाननिष्ठ दृष्टिकोन मानवाला विज्ञानाचा वापर कसा करावा हे शिकविले. शिक्षणातील प्राचीन दृष्टिकोन विज्ञानाच्या मापनाबाबत विवेकबुध्दी विकसीत करेल. भारताने लोकशाही राज्यपध्दती स्वीकारली व भारत धर्मनिरपेक्ष राष्ट्र म्हणून घोषीत झाले. शिक्षणाच्या माध्यमातून व्यक्तिमध्ये लोकशाहीची मूल्ये रूजली पाहिजेत. प्रत्येक धर्माच्या लोकांना आध्यात्मिक स्वातंत्र्य शिकावयास हवे. त्याचप्रमाणे कुशल नेतृत्व व कुशल नागरिकत्वाचा विकास झाला पाहिजे. सामाजिक व राष्ट्रीय एकता निर्माण झाली पाहिजे. हा दृष्टिाकेन शिक्षणातून निर्माण करण्याचा प्रयत्न होत आहे. हे सर्व करीत असतांना ह्या सर्व बाबींचा आधार अर्थात आध्यात्मिक असावा या दृष्टिने मानवावर मूल्यांचे संस्कार व्हावेत. जीवनमूल्ये त्याला समजावीत व त्याचप्रमाणे त्याचे जीवनाला मूल्य प्राप्त व्हावे हा शिक्षणाचा आधुनिक दृष्टिकोन आहे.

शिक्षणाबाबत अनेक तत्वज्ञांनी आजवर अनेक विचारव्यक्त केले आहेत. ह्यातील प्रामुख्याने पाश्चात्य तत्वज्ञानात अग्रणी समजण्यात येणारे तत्वज्ञ शिक्षणतज्ज्ञ म्हणजे प्लेटो, रुसो, जॉन ड्युई, कॉमेनिअस, फ्रेडरिक फ्रोबेल, मेरिया मॉण्टेसरी, हर्बर्ट स्पेन्सर, पेस्टॉलॉजी, रसेल इ. चा आपणास प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. भारतीय तत्वज्ञांमध्ये रविंद्रनाथ टागोर, महात्मा गांधी, पंडीत मदनमोहन मालवीय, स्वामी विवेकानंद, योगी अरविंद, स्वामी दयानंद सरस्वती, राजा राममोहन रॉय, डॉ. राधाकृष्णन, डॉ. जाकीर हुसेर इ. लोकांचा अंतर्भाव आपणास श्रेष्ठ तत्वज्ञ, शिक्षणतज्ज्ञ म्हणून विचार करावा लागतो. वरील सर्व तज्ज्ञांनी जीवनाबाबत तत्कालीन परिस्थितीबाबत एक विशिष्ट दृष्टिकोनाचे प्रतिपादन केले व त्याचे प्रत्यक्ष संस्कार करण्यासाठी शिक्षणाची ध्येये, शिक्षण प्रक्रिया, अध्ययन अध्यापन पध्दती, गुरुशिष्य संकल्पना व संबंध, शिस्त व स्वातंत्र इ. मुद्यांना अनुसरुन भाष्य तर केलेच पण त्याचसोबत ह्या सर्व घटकांच्या अंमलबजावणीचाही प्रयत्न त्यांनी केला. ह्या सर्व तत्वज्ञांच्या रांगेत अजून एक नांव अद्यापही दुर्लक्षित आहे आणि ते म्हणजे वेदांताचे अभ्यासक आधुनिक युगाचे प्रतिनिधित्व करणारे महान ज्ञान तपस्वी स्वामी चिन्मयानंद सरस्वती आणि त्यांच्या विचारांना प्रकाशात आणणे त्यांची अंमलबजावणी करणे ही काळाची गरज आहे. ह्या दृष्टिकोनातून प्रस्तुत संशोधनाचे प्रयोजन आहे. प.पू. स्वामी चिन्मयानंद ह्यांची विपूल ग्रंथसंपदा उपलब्ध आहे. वेदांत तत्वज्ञानाचा प्रचार आणि प्रसार करण्याकरिता चिन्मय मिशन

ह्या संस्थेचे जाळे जगभर पसरले आहे.  शिवाय चिन्मय मिशनच्या अधिकार क्षेत्रात आज अनेक शाळा, महाविद्यालय सुरु आहेत.  ह्या शाळांमध्ये आधुनिक शिक्षण व संस्कार शिक्षणाचा सुरेख समन्वय साधण्यात आला आहे.  पण अद्यापही शिक्षण क्षेत्राला स्वामी चिन्मयानंद ह्यांची शिक्षणधारा माहित नाही.  तसेच आज शिक्षणशास्त्राच्या अभ्यासक्रमात ह्यापूर्वी नमूद केलेल्या सर्व तत्वज्ञ शिक्षण तज्ज्ञांचा समावेश करण्यात आला आहे.  पण स्वामी चिन्मयानंदांच्या विचारसरणीचा अंतर्भाव मात्र अद्यापही करण्यात आलेला नाही आणि हाच उद्देश प्रामुख्याने ह्या संशोधनाचा आहे.

## १.९ संशोधनाची गरज आणि महत्व :-

आज आपण २१ व्या शतकात आलो व अनेक क्षेत्रामध्ये आपण आघाडी मिळवीली. अगदी कोणत्याही क्षेत्रात म्हणजे आर्थिक असो, सामाजिक असो, प्रत्येक क्षेत्रात आज भारताने उज्वल अशी प्रगती केली आहे, नव्हे २०२० च्या महासत्ता असणाऱ्या भारताचे आपण स्वप्न पाहात आहोत ही सर्व प्रगती मन थक्क करून सोडणारी आहे. पण ह्या सर्व प्रगतीच्या लाटेत कोठेतरी आपल्या संस्कृतीला धोका निर्माण झाला आहे की काय इतपत भय निर्माण व्हावे अशी परिचीती समाजात निर्माण झाली आहे. ह्याचे महत्वाचे कारण म्हणजे भारतीयांची मानसिक गुलामगीरी अनेक आक्रमणांना तोड देतांना अनेक आक्रमणे आम्ही परतवून लावली, पण ज्यांनी ज्यांनी आमच्यावर राज्य केले त्यांच्या संस्कृतीचे बीजारोपण ह्या हिदुस्थानात झाले व आमची जीवन हर्ष आम्ही विसरलो. आधुनिकीकरणाच्या नावाखाली अनेक पाश्चात्य संस्कारांचा अंगीकार करून समाजाचे पाश्चात्यिकरण झाले. भारतीय आध्यात्म, भारतीय तत्वज्ञान, ज्ञान, संस्कृती ह्याबाबत पुनश्च नव्याने विचार करण्याची वेळ आता भारतावर आली आहे. अनेक विचारप्रवाहांच्या ह्या लाटेत हिन्दुत्व, भारतीय जीवनदृष्टी ह्याची पुनस्थापना करण्याची वेळ पुनश्च एकदा आली आहे. भारतीय संस्कृतीतील शाश्वत मूल्ये आज जशीच्या तशी लागु होतील असे नाही, पण त्या मुद्यांना त्या घटकांना आपल्याला टाकाउ समजता येणार नाही तर संस्कृतीतील मूल्य समुहाचा आपल्याला युगानुकुल आशय शोधावा लागेल. "From the past to the present for the future" हा आशय लक्षात घेऊन आता आपल्याला शैक्षणिक वाटचाल करावी लागेल. भारतीय प्राचीन तत्वज्ञान हे ज्ञानाने समृध्द आहे. अनेक ज्ञानशाखांचा उगम हा भारतीय प्राचीन तत्वज्ञानात आपणास बघावयास मिळतो. अर्थात आधुनिक म्हटल्या जाणाऱ्या ज्ञान शाखांचा सुध्दा उगम प्राचीन भारतीय तत्वज्ञानात बघावयास मिळतो. परंतु त्याचे भान अद्यापही भारतीयामध्ये पूर्णत्वाने आले आहे असे वाटत नाही. आजही सर्वत्र आणि पुनश्च मनमतांचा गलबला आपणास आढळतो. जातीव्यवस्था, जातीभेद, धर्मभेद, धर्मविद्वेश, प्रांतभेद, आर्थिक भेद ह्या सर्व प्रकारच्या भेदाभेदाने भारतीय समाज अगदी पोखरुन निघाला आहे. वरवर समान वाटणारा भारत आज आतून उधळीच्या ताब्यात गेला आहे. हा अधर्म आहे, भारताने पाश्चात्यांचा भौतिकवाद स्विकारला आणि तेव्हाच खरी भारताची अधोगती सुरू झाली. भारतीय समाज स्वत:ची चेतना विसरला, स्वत:चे मर्म विसरला आणि

त्यावेळी समाज राष्ट्रीय भावनाही लंगडी झाली. भारताचे खरे स्वरूप त्याच्या अंतरंगातील आध्यात्मात आहे. पाश्चात्य संस्कृती ही भोगवादावर, अधिकारवादावर आधारीत आहे तर भारतीय संस्कृती आध्यात्म व कर्तव्यावर आधारीत आहे. परिणामी आम्ही जेव्हा पाश्चात्यांचा भौतिकवाद स्विकारला तेव्हाच भोगवादाला सुध्दा आम्ही स्विकारले, भौतिक वादाने मानवाची प्रगती निश्चित केली यात वादच नाही, पण हा प्रग्तीचा डोलारा भोगवादाच्या पायावर उभा करण्यात आला. त्याचे आध्यात्मिक अधिष्ठान कोठेतरी लुप्त झाल्याचा भास आज निर्माण होण्या इतपत गंभीर परिचिती भारतात निर्माण झाली आहे. अशा वेळी गीतेतील श्रीकृष्णाचे अभिवचन आठवल्या शिवाय राहत नाही.

यदा यदा ही धर्मस्य । ग्लानी र्भवती भारत।
अभ्युत्थानम अधर्मस्य । तदात्मानं सृजाम्यहम्।

अर्थात जेव्हा जेव्हा धर्माला ग्लानी येते तेव्हा तेव्हा धर्माच्या उथ्थानार्थ परमेश्वर स्वतः अवतरीत होतात. पण ह्या ठिकाणी गीतेच्या ह्या वचनात सावधानतेचा इशाराही आपणास आढळतो तो म्हणजे धर्माला ग्लानी येऊ शकते, हा तो इशारा होय. अशी ग्लानी जेव्हा जेव्हा आली तेव्हा तेहा महान यक्ती अवतरीत झालेत. ह्यात प्राधान्याने शंकराचार्य, ज्ञानेश्वर माऊली, स्वामी विवेकानंद, स्वामी चिन्मयानंद।

हिन्दुत्व हा हिन्दुस्थानचा गाभा आहे. हिन्दुत्व हे कोणत्याही जाती धर्म पंथापुरते मर्यादीत नाही तर हिन्दुत्व म्हणजे 'ऋषीत्व' अशी व्यापक संकल्पना करणारे प. पू. स्वामी चिन्मयानंद हे युगप्रणेते होते. आधुनिक काळातील ते ऋषी होते. त्यांनी भारतीय संस्कृती धर्म आध्यात्म ह्यांची अखंड सेवा केली. धर्माचा नव्याने आशय अर्थ त्यांनी माडला. भारतीय संस्कृतीची सनातन धर्माची जी हानी झाली व समाजात कर्मकाण्डालाच धर्म मानण्याची वृत्ती फोफावु लागली तेव्हा प. पू. गुरुदेव हे भारतीयांचे कल्याण कसे होईल ह्याचा विचार करू लागले. परकीय सत्तेचे जुलुम सहन करून हा समाज विमनस्क झाला आहे. संवेदनाशून्य झाला आहे, त्याला आपल्या चांगल्या वाईटाचे भान राहीले नाही. गुलामगीरीत आयुष्य व्यतीत करता करता त्याला मानसिक गुलामगीरीची सवय लागली आहे. ही गुलामगीरी खुप भयावह आहे. आपले सत्व आपले ऐश्वर्य भारतवर्ष विसरला आहे. भारतावर अनेक आक्रमणे झाली. तुर्क अफगाण, मुस्लीम

इ. लोकांनी आक्रमणे केली, पण भारतीय धर्माला तेवढी हानी पोहचली नव्हती, पण इंग्रजांच्या राज्यात इंग्रजांनी जी पाश्चात्य शिक्षण पध्दती सुरू केली त्यामुळे मात्र त्या शिक्षणाने जनता भारावली व त्याची अस्मीता भेदावली. अनेक भारतीयांनी उच्च पदव्या संपादन केल्या, त्यातील काही भान जागृत झाले पण सनातन धर्माबाबत जनताही अनभिज्ञच होती, ज्ञानाबाबत लोक अनभिज्ञ होते.

भारतीय जनतेची ही अनभिज्ञता स्वामी चिन्मयानंदांनी पाहिली आणि मग मात्र त्यांनी आपल्या सर्व कार्याचा संसाराचा सर्वतम परित्याग करून सन्यासदिक्षा घेऊन ज्ञान संपादन केले व हे ज्ञान सर्वसामान्यां पर्यंत पोहोचविण्यासाठी त्यांनी आपले आयुष्य वेचले. त्याचेच फळ म्हणजे आज चिन्मय मिशन ही संस्था जगभर आपले ज्ञानप्रसाराचे कार्य करित आहे. प.पू.स्वामी चिन्मयानंदांनी लावलेल्या चिन्मय मिशन ह्या रोपाचे आज वटवृक्षात रूपांतर झाले आहे. समाजातील कोणतेही क्षेत्र असून जो ज्ञानाचे, शिक्षणाचे, आरोग्याचे, सेवेचे प्रत्येक क्षेत्रात चिन्मय मिशनचे काम वाखाणण्या जोगते आहे. केवळ वेद उपनीषदाचे, हिन्दुतत्वज्ञानाचे भाष्यकार म्हणून आपल्याला त्यांच्याकडे पाहता येणार नाही, ते त्यांच्या कार्याचा गाभा आहे, पण त्यापेक्षाही ते युगशिक्षक, लोकशिक्षक होते व त्यांची ही भुमीका महत्वाची ठरते. ते एक शिक्षक होते, संशोधक होते, ते खऱ्या अर्थाने आचार्य होते. ते गुरु होते कोणत्याही भुमिकेतून आपण त्यांच्याकडे पाहीले तर त्यांचा लोकमानसावर पडलेला ठसा आपल्या लक्षात येतो. प्राचिन वेदप्रणित सिध्दीत आजही कसे विज्ञानयुगात हे उपयुक्त आहे हे सांगण्याची त्यांची हातोटी विलक्षण होती. त्यामुळेच केवळ तरूण वर्गच नाही तर सर्वच स्तरातील लोकांचा ओढा त्यांच्याकडे असे. त्याचा विशेष ओढा होता तो तरूणांकडे आणि म्हणूनच त्यांच्याकडे जे तरूण अभ्यासक असत, त्यांच्या सांस्कृतीक प्रगतीवर ते लक्ष ठेऊन असत, त्यांचा मार्ग हा रचनात्मक सदाचाराचा आहे. ''चिन्मय मिशनचे सभासद हे काही हिमालयात राहणाऱ्या तपस्वीसारखे शांत व निवृत्त जीवन जगत नाहीत, सध्याच्या संघर्षयुगातील ते आघाडीचे वीर आहेत. भारताच्या राजकिय व सामाजिक दैनंदिन कामकाजात हीरीरीने भाग घेणारे हेच तरूण उद्याचे नेते आहेत, त्यांना राष्ट्राची जबाबदारी उचलायची आहे''. त्यांचा तरूणाबाबतचा हा सकारात्मक दृष्टिकोन तर लक्षात येतोच पण त्यात राष्ट्र विकासाची ही तळमळ जाणवते आमच्या सर्व समस्यांवर सांस्कृतीक जागरण हाच उपाय आहे हे त्यांनी जाणले होते. आधुनिक युगात

युवकांना पध्दतशीर प्रशिक्षण देऊन त्यांना माणुस घडविण्याच्या स्वामी विवेकानंदांच्या कार्यनितीचे तेही वारसदार आहेत. आपल्या कार्यातून त्यांनी एकात्म मानव घडविण्याचा प्रयत्न केला.

ते द्रष्टे सदगुरु तर होतेच पण ते शिक्षण तज्ज्ञही होते, पण त्यांचे शिक्षण विषयक विचार अजुनही आपल्या मनावर बिंबवले नाहीत. एखाद्या व्यक्तीला आपण शिक्षण तज्ञ तेव्हाच म्हणतो जेव्हा शिक्षणाबाबत त्यांनी सर्वकष विचार केलेला आहे. अगदी शिक्षण विषयक धोरण अभ्यासक्रम, अध्ययन, अध्यापन पध्दती, शिक्षा स्वातंत्र्य, इ. संकल्पना त्यांच्या तत्वज्ञानात आढळतात व त्याच अनुषंगाने ते शिक्षण तज्ञ ठरतात. अलीकडच्या शिक्षण पध्दतीवर टिका करतांना एका शिक्षकांच्या परिषदेत प. पू.गुरुदेवांनी खालील विचार व्यक्त केले आहेत.

''अलीकडच्या शिक्षण पध्दतीत शिक्षक म्हणजे विद्यार्थ्यांच्या डोक्यात एखाद्या विषयाची माहिती कोंबून परिक्षेच्या वेळी ती बाहेर काढण्याचे साधन झाला आहे, हे काही शिक्षण नव्हे. ज्यामुळे मानसात असलेल्या ज्ञानाने तो शहाणा होईल ते शिक्षण आहे. ज्यामुळे संवर्धन होते ते खरे शिक्षण आहे''. शिक्षणाचा संबंध गुरुदेवांनी मूल्याशी जोडला आहे ते म्हणतात, ''मूल्याधारीत शिक्षण म्हणजे राज्याच्या संस्कृतीचे पुनरुत्थान होय, फार पुर्वीपासून ही जीवनमूल्य जपणारे नेतृत्व ह्या मूल्यांचे संस्करण आपल्या आचरणातून विद्यार्थ्यांवर करित असत. ह्या जीवनमूल्यांचे संस्करण करणारी जी एक व्यवस्था आहे तिला धर्म असे म्हणतात. ह्या धार्मिक शिक्षणाची बीजे जर विद्यार्थ्यांच्या अंत:करणात बालवयातच रूतविली तर हळुहळु ती चांगले मूळ धरतात. आणि भविष्यात त्यातूनच एक चांगले व्यक्तिमत्व घडविण्यासाठी सहाय्य करतात''. निरोगी समाज निर्माण होण्यासाठी शिक्षण संस्था ह्या प्रभावी माध्यम आहेत, पण त्याच सोबत शिक्षण हा महत्वाचा घटक आहे. बालकाबाबत युवकाबाबत त्यांचा दृष्टिकोन हा आजच्या युगाकरीता अतिशय उपयुक्त आहे. मुले ही आपले भविष्य आहे, त्यामुळे आजच त्यांच्यावर योग्य संस्कार करायला हवेत. मुलांना केवळ जीवनमूल्ये शिकवून चालणार नाही, तर त्या मूल्यनिष्ठा नुसार जीवन जगण्याचे साहस धाडसही त्यांच्यात निर्माण करावे लागेल ही दृष्टी जऊन त्यांनी आपले विचार प्रस्तुत केले. त्यांच्या शैक्षणिक तत्वावर आधारीत 'Chinmaya Vision Programm' प्राथमिक स्तरातील विद्यार्थ्यांकरिता तयार करण्यांत

आला. परंतु ''शिक्षण तज्ञ'' म्हणून अजुनही त्यांचे विचार उच्च शिक्षणाला अनाभिज्ञ आहेत. तत्वज्ञ शिक्षणतज्ज्ञ त्यांचे कार्य अद्यापही उच्च शिक्षणास अनभिज्ञ आहे. म्हणूनच प्रस्तुत प्रकल्पाची गरज, प्रस्तुत प्रकल्पातून 'प.पू.स्वामी चिन्मयानंद एक शिक्षण तज्ञ' असा शिक्षण शाखेला त्यांचा नव्याने परिचय झाल्यास शिक्षण शाखेत त्यांच्या विचारांचा अंतर्भाव करता येईल.

## १.१० समस्या विधान :-

स्वामी चिन्मयानंद यांच्या शैक्षणिक विचारांचा नवीन अभ्यासक्रमाच्या दृष्टिकोनातून विश्लेषणात्मक अभ्यास.

## १.११ कार्यात्मक परिभाषा (Functional Defination) :-

**नवीन अभ्यासक्रम** :- एन.सी.ई.आर.टी.ने राष्ट्रीय शिक्षणाचा आराखडा एन.सी.एफ.२००५ हा दस्तऐवज तयार केला आहे. त्यात नवनविन संकल्पनांचा अवलंब केला, नविन तत्वांचा अवलंब केला. ह्या आराखड्यातील गाभाभूत घटकांचा अंतर्भाव विश्लेषणात्मक अभ्यासात करण्यांत आलेला आहे.

### स्वामी चिन्मयानंद :-

स्वामी चिन्मयानंद यांनी वेदांच्या प्रसाराचे व त्याच्या माध्यमातून शिक्षणाचे, मूल्य शिक्षणाचे कार्य केले असून त्यांनी चिन्मय मिशनची स्थापन केली व आज संपूर्ण जगभर चिन्मय मिशन ज्ञानाच्या क्षेत्रात शिक्षणाच्या क्षेत्रात कार्यरत आहे.

### शैक्षणिक विचार :-

स्वामी चिन्मयानंदांच्या तत्वज्ञानात शैक्षणिक विचारांचा उहापोह यात करण्यांत येईल.

### विश्लेषणात्मक अभ्यास :-

शिक्षण ह्या संकल्पनेच्या दृष्टिकोनातून स्वामी चिन्मयानंद यांच्या विचारांचे विश्लेषण करण्यांत येईल.

## १.१२ संशोधनाची उद्दिष्टे :-

१. स्वामी चिन्मयानंद यांच्या साहित्याचा शोध घेणे.

२. स्वामी चिन्मयानंद यांच्या शैक्षणिक तत्वांचा शोध घेणे.

३. स्वामी चिन्मयानंद यांच्या तत्वांची सामाजिक व शैक्षणिक उपयोगिता सिध्द करणे.

## २) दुय्यम उद्दिष्टे :-

१) खालील मुद्यांना अनुसरून स्वामी चिन्मयानंदांच्या शैक्षणिक तत्वांचा शोध घेणे.

अ. शिक्षण संकल्पना व शिक्षणाची ध्येय

ब. शिक्षण परिभाषा

क. अध्ययन व अध्यापन पध्दती

ड. शिक्षण पध्दती व शिक्षण योजना

इ. गुरु शिष्य संबंध

फ. शिस्त व स्वातंत्र्य संकल्पना

२) स्वामी चिन्मयानंद यांच्या शैक्षणिक विचारामधून मूल्य शिक्षण योजनेचा शोध घेणे.

३) स्वामी चिन्मयानंद यांच्या ''व्यक्तिमत्व विकास'' संकल्पनेचे विश्लेषण करणे.

४) स्वामी चिन्मयानंद यांच्या विचारांचा आधुनिक शिक्षण पध्दतीवरील प्रभाव पडताळून पाहणे.

५) आधुनिक युगात स्वामी चिन्मयानंद यांच्या विचारांचे महत्व सिध्द करणे.

६) सामाजिक, नैतिकतेची जपवणूक करण्यासाठी व सद्गुणांचा प्रसार करण्यासाठी सामाजिक पातळीवर व शैक्षणिक पातळीवर स्वामी चिन्मयानंद यांच्या ग्रंथाची योग्यता सिध्द करणे.

७) स्वामी चिन्मयानंदांच्या विचारातून Innovative Ideal concept practices यांचा शोध घेणे.

८) शिक्षणाबाबत व्यापक आराखडा तयार करणे.

## १.१३ चले :-

| | | |
|---|---|---|
| स्वाश्रयी चले | : | प.पू. स्वामी चिन्मयानंद यांचे शैक्षणिक विचार |
| आश्रयी चले | : | NCF २००५ नुसार नवीन अभ्यासक्रम आराखडा |
| बाह्य चले | : | सामाजिक, राजकीय, शैक्षणिक परिस्थिती |

## १.१४ गृहितके (Assumption) :-

१) स्वामी चिन्मयानंद यांच्या साहित्यातून विविध शैक्षणिक तत्वे अभिव्यक्त होतात.

२) स्वामी चिन्मयानंद यांच्या साहित्यातून मूल्य शिक्षणाची योजना अभिव्यक्त होते.

३) स्वामी चिन्मयानंद यांनी व्यक्तिमत्व विकासाची एक व्यापक संकल्पना व योजना मांडली आहे.

४) आधुनिक शिक्षण पध्दतीवर स्वामी चिन्मयानंद यांच्या विचारांचा बऱ्याच आधुनिक संकल्पनांच्या बाबतीत पगडा आढळतो.

५) आधुनिक काळात स्वामी चिन्मयानंद यांच्या विचारांचे महत्व आहे.

६) सामाजिक राष्ट्रीय नैतिकतेची जपवणूक करण्यासाठी स्वामीजींच्या साहित्याची नितांत आवश्यकता आहे.

७) Innovative concepts, Innovative practices याबाबतीत स्वामीजींचे योगदान महत्वपूर्ण आहे.

८) जागतिकीकरणाच्या या युगात स्वामीजींचे योगदान महत्वाचे आहे.

## १.१५ परिकल्पना :-

प. पू. स्वामी चिन्मयानंद यांचे शैक्षणिक विचार व राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २००५ ह्यातील शैक्षणिक विचार ह्यात सहसंबंध नाही.

## १.१६ व्याप्ती व मर्यादा (Scope and Limitations) :-

१) प्रस्तुत संशोधन चिन्मय मिशन पुरते मर्यादित आहे.

२) प्रस्तुत संशोधन महाराष्ट्र राज्यापुरते मर्यादित आहे.

३) प्रस्तुत संशोधन स्वामी चिन्मयानंद यांच्या ग्रंथ, विचारापुरते मर्यादित आहे.

४) प्रस्तुत संशोधन माध्यमिक स्तरावरील अभ्यासक्रमातील विषयापुरते मर्यादीत आहे.

५) प्रस्तुत संशोधन हे महाराष्ट्रातील २० चिन्मय आश्रमांतून मर्यादीत आहे व चिन्मय ग्रंथालयापुरते मर्यादीत आहे.

## १.१७ स्वामी चिन्मयानंद - व्यक्ती आणि कार्य :-

स्वामी चिन्मयानंद ! भगवतगीतेचे एक रूप हिंन्दुत्वाची नव्याने भारत वर्षाला संकल्पना देणारे धर्मवित्ते, वेदांताचे गाढे अभ्यासक, कट्टर ज्ञान मार्गी, मूर्तीमंत शिस्त, एक थोर राष्ट्रभक्त, अध्यात्मिक गुरु हे नाव आज जगाला अतिशय सुपरिचीत आहे. भारतीय संस्कृतीची गंगा ही संपूर्ण जगभर नेण्याचे महान कार्य ज्या ज्या थोर अध्यात्मिक गुरुंनी केले त्यातील मेरूमणी म्हणजे स्वामी चिन्मयानंद. प. पू. गुरुदेव म्हणजे प्रेमाची गंगा, ज्ञानाचा सागर, अथांग मातृद्रव्य, आग्रही शिस्त त्यांचे संपूर्ण जीवन म्हणजेच सर्व साधकाकरिता शिकवण हे एक आदर्श गुरु होते. मातेचा प्रेमळपण व पित्याची शिस्त हा त्यांच्या व्यक्तिमत्वाचा महत्वाचा पैलु होता. ते एक मूर्तीमंत शिस्त होते. त्यांचे पूर्ण जीवनच शिस्तमय होते. अलौकिक स्मरणशक्तीची देणगी त्यांना लाभली होती. हिन्दुत्वाच्या पुनस्थापनाच्या कार्यात त्यांचा फार मोठा सहभाग आहे. ते वर वर राष्ट्रभक्त तर होतेच पण राष्ट्रीयत्वाचा नवा अर्थ त्यांनी भारतीयांना दिला. भारताकडे राष्ट्र म्हणून बघण्याची दृष्टी त्यांनी दिली. भारताचे प्राचीन वैभव प्राप्त करून देणे हे त्यांचे जीवनकार्य होते. भारतवासियांच्या हृदयात राष्ट्रप्रेम, संस्कृतीचा अभिमान, सेवाव्रत, भारतीय आध्यात्मप्रति प्रेम इ. मूल्य रूजवण्याकरिता त्यांनी आपले आयुष्य वेचले. भारताने सर्वतोपरी सामर्थवान झाले पाहिजे असेच त्यांना वाटे. भारताबाबतच्या महासत्तेचे कल्पनाचित्र त्यांनी रेखाटले, पण ह्या सामर्थ्यातून सहिष्णुताच निर्माण व्हावी असा त्यांचा आग्रह होता. भारतावर जेव्हा जेव्हा आक्रमणे झालीत, तेव्हा तेव्हा त्यांनी भारतीयांचा राष्ट्रवाद आपल्या लेखणीतून जागवला, देशातील स्वार्थीपणाबाबत त्यांना तिव्र दु:ख होते.

''कोणताही देश जर त्याग व सेवा ह्यावर आधारित नसेल तर त्या देशाचे उज्वल भवितव्य नाही'' असो ते म्हणत. वेदाताचा प्रचार हे त्यांनी आपले जीवन कार्य मानले होते. भारतीय समाजाचे अज्ञान, त्यांची दुरावस्था ह्याबाबत त्यांच्या मनात तिव्र दु:ख होते. त्यांना जागृत केल्याशिवाय भारताचा विकास होणार नाही. प्राचीन भारतीय वेदांत तत्वज्ञान, भारताची खरी ओळख आहे, हीच व्यक्तीची खरी ओळख आहे ह्याची जाणीव जोवर व्यक्तीला होणार नाही तोवर खऱ्या अर्थाने तो भारताचा नागरिक आहे असे म्हणता येणार नाही असे त्यांचे मत होते आणि ह्याकरिताच ''ज्ञानयज्ञ'' ही संकल्पना त्यांनी मांडून ह्या ज्ञानयज्ञाच्या माध्यमातून त्यांनी वेदांत प्रचार व प्रसाराचे कार्य केले. गुरुदेवांचे प्रवचन हा केवळ विद्वत्तेचे प्रदर्शन नव्हते तर त्यात भाव असे, शिवाय ही प्रवचने ते श्रोत्यांच्या पातळीवर येऊन देत असत. त्यामुळेच त्यांची प्रवचने ही उद्‌बोधक ठरत. त्यांच्या व्यक्तिमत्वाचे अनेक पैलु त्यांच्या जीवनात कसे उलगडत गेले हे पाहणे अधिक योग्य ठरेल.

## जीवन चरित्र :-

मे १९१६ रखरखता उन्हाळा, पृथ्वीवर सर्व प्राणीमात्राच्या जीवनाची अक्षरश: लाहीलाही होत होती. सुर्याच्या प्रखर तेजाने अक्षरशा: भारतामतेचे अंग तापून निघाले होते आणि अशातच मातेच्या कुशीतून बालकाचा जन्म झाला आणि मातेने भाष्य केले माझ्या लाखो लेकरांच्या तप्त जीवनाला शांत करणारा अमृतबिन्दु ह्या पृथ्वीवर अवतरला आहे. विचाराचे अमरत्व घेऊन आलेला हा अमृतबिन्दु स्वत: विस्तारीत होईल आणि आपल्या ज्ञानाच्या कुशीत अखील विश्वाला सामावून घेईल. मातेचे भाष्य हीच गुरुदेवाची कार्याची नांदी. दक्षिण भारतातील एर्नाकुलम ह्या गावी 'पुममपल्ली' नावाच्या घरात बालकाचा जन्म झाला. श्री पी. निलकंठ मेनन (बार ॲट लॉ निवृत्त न्यायाधीश, कोचीन) ह्याची बहीण पार्वती (मंकुअम्मा) ह्यांच्या उदरी ह्या बालकाचा जन्म झाला. वडीलांचे नाव कुट्टन मेनन. श्री कुट्टन मेनन हे खूप मोठ्या जमीनदार घराण्यातील होते. तसेच ते त्रिचुरचे कोचीन संस्थानात मुन्सफ म्हणून प्रसिध्द होते. अशा सुशिक्षीत, सुसंस्कारीत आणि संपन्न घराण्यात जन्म झालेल्या ह्या बालकाचे नांव बालकृष्णन ठेवण्यांत आले. श्री चटराम्बी स्वामीगल हे त्यांचे कुलगुरु होते. त्यांनी बालकाची पत्रिका तयार करून हा बालक हा विश्वकिर्तीमान होईल असे भाकीत केले. बालकृष्ण

हा सर्वांचा खूप लाडका होता. मेनन घराण्यातील वातावरण हे अत्यंत धार्मिक व रूढीप्रिय होते. घरातील कुळकुळाचार सर्वांनी पाळलेच पाहिजे हा सर्वांचा दंडक होता. सिध्द योग्याला त्याच्या अध्यात्मिक प्रगतीकरिता योग्य वातावरणाची उपलब्धता करून देणे हा ईश्वरीय संकेत असतो, त्यानुसार बालकृष्णनला भक्तीमार्गाचे संस्कार बाळकडु बालपणीच मिळाले. घरातील पूजा ही दोन तास चाले त्यानंतर आरती व ही आरती होईस्तोवर कुणीही देवघराच्या बाहेर पडु शकत नव्हते. पण ह्या दोन अडीच तासाच्या काळात छोट्या बालकाच्या मनात अनेक प्रश्न निर्माण होत. स्वत:लाच तो पुजेसंबधी अनेक प्रश्न विचारीत असे ही सर्व पुजा, हा साजश्रृंगार कोणाकरिता ? आणि कशाकरिता? पण त्या वयात कोवळ्या बुध्दीला ह्या प्रश्नांची उत्तरे कधीच सापडली नाही. उलट तो प्रश्न त्याच्याकरिता अधिक गुढ बनला. देवी देवतांची चित्र न्याहाळण्यात त्याला आनंद वाटु लागला. पण त्याही वयात त्याच्या मनात माता सरस्वती बाबतचे आकर्षण होते. पांढरेशुभ्र वस्त्र, बसण्यामधील ऐट हातातील विणा, सुंदर बोटे ह्या सर्व गोष्टींनी बालवयातच त्यांना भाराउन टाकले होते. ही एक विणेचा झंकार ऐकण्याचा ते वारंवार प्रयत्न करित पण हा प्रयत्न निष्फळ ठरत असे पण त्याही वयात बालनला जर काय आवडले असेल तर जटेवर गंगा धारण करणारा, अंगावर डौलदार नाग, चंद्रकला धारी शिव. हाच सरस्वतीचा पुत्र ज्ञानगंगा माध्यमातून लाखो हृदयापर्यंत पोहोचला. ज्ञानगंगा सर्व सामान्यापर्यंत नेण्यास निमित्त बनला. ही शिवप्रतीमा न्याहाळत हृदयातील गाभाऱ्यात जशीच्या तशी पाहण्याचा एक छंद ह्या वयात बालनला लाभला. प्रतिमेतील शिवाला केव्हाही आपल्या हृदयात पाहाण्याचा चाळा सुरू झाला आणि येथेच खऱ्या अर्थाने चिन्मयानंदांचा जन्म झाला असे म्हणावे लागेल. ज्ञानमार्गाची दीक्षा देणे हाच परमेश्वराचा हेतु होता. बालवयात कुलगुरु स्वामीगल ह्यांच्या हातून त्यांच्या अक्षर लेखनास प्रारंभ झाला व बालक पुढे महान होईल हे भाकीत स्वामीगल साधुंनी पूर्वीच केले होते. प्रत्येक कुळाचारात बालन हिरीरीने सहभागी होत असे. बालन सर्वांचाच अतिशय लाडका होता. पण आयुष्य हे कधीही वारंवार राजमार्गावरून जात नाही त्यात अनेक खाचखळगे असतात. ह्या खाचखळग्यांना पार करून जो जीवनाची क्षितीजे पार करण्याचे सामर्थ्य ठेवतो तोच खरा विजयी ठरतो. हे सामर्थ्य निश्चितपणे बालनमध्ये होते. वयाच्या ५ व्या वर्षी बालनचे मातृछत्र हरवले, बालन पोरका झाला. जीवनातील प्रेमाची सावली संस्काराची गंगा ही आटून गेली होती. काळाने आईला हिरावून नेले होते. आयुष्यात खुप मोठी

पोकळी निर्माण झाली होती. पण बालनच्या संस्काराच्या रूपात आई अजुनही त्यांच्यातच समावली होती. पोरक्या झालेल्या छोट्या बालनची काळजी इतर नातेवाईकांनी घेणे सुरू केले. त्याला आईची उणीव भासु नये ह्यांचा सर्वांनी सर्वतोपरी प्रयत्न केला.

वयाच्या ५ व्या वर्षी बालनच्या औपचारिक शालेय शिक्षणाची सुरूवात झाली. ''श्री रामवर्मा मुलांची शाळा'' हे त्यांच्या पहील्या शाळेचे नाव. ही शाळा इंग्रजी माध्यमाची होती, पण ह्या शाळेत मल्याळम व संस्कृत शिकविण्यात येत असे. बालनला खेळण्याचा नाद लहानपणापासूनच होता. फुटबॉल व बॅटमिन्टन हे त्यांच्या आवडीचे खेळ होते. शाळेतून वेळ मिळाला की ते खेळ खेळायचे, वयाच्या १० वर्षापर्यंत आयुष्य अगदी मजेत गेले. वयाच्या १० व्या वर्षापासून त्यांच्या जीवनाला कलाटणी मिळाली. त्याकाळी मलबार मध्ये एक प्रथा होती की बालक १० वर्षाचा झाला की त्याला धार्मिक शिस्तीतून मोकळे करित ही तत्कालीन रूढी होती. ह्या रूढीचा घातक परिणाम म्हणून की काय भावनिक ध्याानस्थ चिंतनशील बालक हा कोठेतरी हरवला तो स्वतंत्र झाला पण समुद्राच्या किनाऱ्यावर हिंडण्याचे त्याचे वेड मात्र कायम होते. अथांग सागर पाहतांना तो त्यात हरवून जाई, रात्री मात्र ''ओम् नम: शिवाय'' चा जप केल्याशिवाय बालन झोपत नसे. ही आपली जपसाधना आहे ह्याचे भानही बालनला नव्हते, नामस्मरणाचा जपाचा अर्थही त्याला समजत नव्हता पण नित्यनेमाने मात्र तो ही साधना करीत राहिला.

## युवावस्था :-

बालनचा जन्म हा अतिशय श्रीमंत घराण्यातील घरातील अतिशय लाडका असा बालन युवावस्थेत पदार्पित झाला. उंचापुरा राजबींडा आकर्षक असा बालकृष्णन यांच्या महाविद्यालयीन शिक्षणास प्रारंभ झाला. प्रश्न विचारण्याची मात्र त्याची सवय अजुनही संपली नव्हती, मनात तिव्र जिज्ञासा, चिकित्सकवृत्ती ह्यामुळे तो अनेक खोचक प्रश्न ह्या काळांत विचारत असे. अगदी नाठाळ, खोडकर प्रश्न विचारून तो समोरच्या व्यक्तीला त्रस्त करीत असे. ''परमेश्वराची गरजच काय?'' असे विचारण्याची सुध्दा हिम्मत त्याकाळात बालनने केली.

एर्नाकुलम मधील महाराजा कॉलेजमध्ये त्याचे शिक्षण सुरू झाले. कॉलेजमधील त्याचे जीवन, त्यांचा खोडकरपणा, त्यांची जिज्ञासा हा कुटूंबाकरिता अतिशय काळजीचा विषय होता. पण ते अतिशय निष्ठावान होते. विशेषत: मैत्रीच्या नात्यात ते विलक्षण प्रामाणिक होते, घरची परिस्थिती सुसंपन्न असल्यामुळे आपल्या मित्रांच्या फी भरणे, त्यांना पुस्तकाची मदत करणे, ह्याबाबतीत ते सढळ हाताने मदत करित. पण त्यांचे मन मात्र चिंतनशील होते, ह्या चिंतनशीलतेतून त्यांनी एक मजेशीर निष्कर्ष काढला. ज्ञनाच्या क्षेत्रात त्यांना असे आढळले सर्वजीव अग्नीच्या ठिकाणी ठिणगी प्रमाणे आहेत, तर सुर्याच्या अनुषंगाने किरण आहेत. परमेश्वर त्यांचा एक बांधीव संघात आहे. म्हणजेच परमेश्वर पूर्ण असून आपण प्रत्येकजण त्याचा अंश आहोत. ह्यावरून त्यांनी असा निष्कर्ष काढला की आपण सर्वजण जर त्या एकाच भगवंताचे अस्तित्व असु तर त्या भगवंताचे आपल्या सगळ्यांची गोळाबेरीज म्हणजेच थोडाच चांगुलपणा व बराच भाग दुर्गंधयुक्त घाणीचाच असला पाहिजे आणि सगळे जीव एकत्र केल्याखेरीज ह्या ईश्वराला अस्तीत्व नाही. ह्याचाच अर्थ बालन देवाचे मुलस्थान आहे. देव बालनचा नव्हे, मग बालनने परमेश्वराची प्रार्थना कां करावी ? त्यानंतर मात्र बालनने ईश्वराशी दुरावा केला व मन शंकेखोर बनले. ही शंका पण अतिशय खोडकर होती. त्या परमेश्वर कल्पनेला सर्वांना वाटेल अशा सोप्या भाषेत कोणत्या मुद्यावर फेरावून लावला येईल? हा मुद्दा उपस्थीत करण्याचे कारण म्हणजे त्यांची प्रामाणीक बुध्दी हीच कोणत्याही अंधश्रध्देवर विश्वास ठेवायला तयार नव्हता. दिवसा असा संशयपणा रात्री मात्र शिवाची आराधना असा त्याचा क्रम सुरू होता. हे जीवनावर त्यांचे सतत चिंतन सुरू होतेच, त्याचा मुख्य विषय हा सायन्स होता. पण ह्या विषयात त्यांचे चिंतनशील मन कधीच रमले नाही. परिणामी सायन्सचे शिक्षण ते पूर्ण करू शकले नाही, पण सायन्सचा हा अभ्यासाने त्यांना मानवी जीवनाबाबत मात्र अधिक चिकित्सक बनविले. त्याकाळी त्यांचे राहणीमान सुध्दा अतिशय आधुनिक होते. ते संशयवादी होते, अज्ञेयवादी होते, प्रखर बुध्दीमान होते पण मनाच्या प्रेमळपणाने ते अतिशय लाडके होते. इंग्रजी साहित्य व कायदा ह्यांचे शिक्षण घेण्याकरिता ते उत्तर हिंन्दुस्थानात लखनौ युनिवर्सिटीत गेले. ह्याच काळात त्यांची महात्मा गांधीची भेट झाली, पण त्यांचा एवढा प्रभाव त्यांचेवर पडला नाही. पण त्या वेळी सुरू असलेल्या स्वातंत्र्य चळवळीला त्यांनी पाठींबा दिला.

## प्रखर राष्ट्रवादी :-

बालकृष्णन यांना राजकारणात अभिरूचि नव्हती पण मनात प्रखर देशप्रेम होते. भारत छोडो चळवळीत त्यांनी हिरीरीने भाग घेतला. ह्या चळवळीत त्यांनी सक्रिय भाग घेतला होता. आपल्या कार्याने त्यांनी तरूणांना भारावून टाकले होते, त्यांच्या विरूध्द ब्रिटिश सरकारने पकड वॉरंन्ट सुध्दा काढलेले होते व पोलीसांनी त्यांना पकडुन तुरूंगात टाकले. तुरूंगातील वातावरण त्यांना मानवणारे नव्हतेच तेथील अन्न घाणीचे साम्राज्य ह्या सर्वांचा व्हायचा तोच परिणाम झाला व ते विलक्षण आजारी पडले. पण ईश्वर त्यांच्या पाठीशी होता, त्यांच्या हातून कार्य घडायचे होते. एका महान कार्याकरिता ही ईश्वराची निवड होती. इंग्रजी अधिकाऱ्यांनी त्यांच्या दुखण्याला कंटाळून त्यांना रस्त्याच्या कडेला आणून टाकले. इंग्रजांनी केलेले हे महान कार्य होते. कारण भारताच्या महापुरूषाला त्यांनी भारताला परत केले होते. रस्त्याच्या कडेला विव्हळणाऱ्या अवस्थेत एका ख्रीश्चन स्त्रीने पाहिले, त्या स्त्रीने त्यांना आपल्या घरी आणले, आपल्या अपत्याप्रमाणे त्यांची सेवा केली. कारण बालकृष्णनचे नाक हे त्या स्त्रीच्या मुलाच्या हुबेहुब नाकासारखे होते व तो सैन्यात काम करित होता. ''माझ्या नाकामुळे मी वाचलो'' असे ते गमतीने म्हणत असत.

नंतर त्यांनी ''नॅशनल हेरॉल्ड'' मध्ये नौकरी पत्करली. त्या काळात श्रीमंताचे जीवन त्यांची संस्कृती अगदी जवळून अभ्यासवयास मिळाली. ते टेनिस चांगले खेळत असत, त्यामुळे त्यांना ब्रिटीश क्लबमध्ये खेळण्याकरीता बोलावण्यांत येई. हे सर्व त्यांनी पाहीले, पण त्यांना जाणवले की हे सर्व अतिशय वरवरचे आहे. मुळातच माणूस श्रीमंत असूनही तो सुखी नाही. ह्या वरवरच्या देखाव्याला त्यांचे मन विटले, त्यांच्या लक्षात आले की कुणीही शांतीने आयुष्य जगत नाही, वरवर सहानुभुती आहे पण आत मात्र हाडवैर आहे. ह्या जाणीवेतच बालकृष्णन मेननची अध्यात्मिक साधना सुरू झाली. त्यांनी पौर्वात्य व पाश्चिमात्य तत्वज्ञानाचा अभ्यास केला. त्यावर सखोल अध्ययन केले, संशोधन केले. त्यांना भारतीय तत्वज्ञानाची सखोलता आढळली. मनातील अनेक प्रश्न अद्याप अनुत्तरीत होते. ह्या प्रश्नांची उत्तरे मिळावी म्हणून त्यांनी देशभर भ्रमण केले. ह्या भ्रमंतीत त्यांना धर्माच्या नावावर चालणाऱ्या विविध गोष्टी न्याहाळण्यात भारतीय दुःख अज्ञान, दारिद्र अगदी जवळून पाहिले व देशाच्या ह्या

परिस्थितीने त्यांचे हृदय अक्षरश: पिळवटून निघाले. हा राष्ट्राप्रती बांधीलकीच्या जागृतीचा क्षण होता. राष्ट्रभक्तीचे स्फुल्लींग येथे जागृत झाले. हिन्दुस्थानचे लोक अज्ञानी आहेत, दरिद्री आहेत हे पाहून त्यांना अतिशय वाईट वाटले, पण ह्याही काळात नॅशनल हेरॉल्डमध्ये त्यांचे लेख लिहणे सुरूच होते. ह्याच प्रवासात त्यांनी रमणमहर्षिंची भेट घेतली. रमणमहर्षिंची ही भेट त्यांची अविस्मरणीय ठरली, कारण ह्याच भेटीत त्यांना आध्यात्मिक अनुभूती प्राप्त झाली. दिव्य अनुभवाने त्यांचे जीवन भाराऊन गेले. रमणमहर्षिंची एक प्रेमळ नजर त्यांना समाधी अवस्थेत घेऊन गेली.  काय होतेय ? काय झालय ? ह्याचे भान मात्र तेव्हा बालकृष्णन ला नव्हते, पण त्या अनुभवाकडे तेव्हा त्यांनी कानाडोळा केला. अनेक वर्ष भ्रमण, इंग्रजांच्या राजवटीत राष्ट्रभक्ताला येणारा जीवघेणा अनुभव, भारताची समृध्दता, भारताची संस्कृती, तत्वज्ञान, हिन्दु धर्माचे तत्वज्ञान, ह्या सर्व गोष्टीने एव्हाना त्यांचे जीवन व्यापून गेले होते. ज्या देशात धर्म, आध्यात्म रूजले, वाढले त्याच देशात धर्माबाबतचा होणारा विपर्यास त्यांचे मनास खिन्नता देऊन गेला. पण ह्यातूनच धर्माबाबत देशाबाबत सेवा करण्याची प्रेरणा त्यांचे ठिकाणी झाली व अध्यात्म व सामाजिक उपयोगिता आता याचा सहसंबंध ते जोडु लागले. पण ह्याच काळात नॅशनल हेरॉल्ड मधून लेख लिहतांना भारतातील अध्यात्माच्या नावावर जी सर्वसामान्यांची फसवणूक होते आहे त्याबाबत तथाकथीत साधु लोकांवर प्रहार करावा ह्या उद्देशाने मेनन हे ऋषीकेश येथे गेले. ऋषीकेश ही साधुंची नगरी म्हणून ओळखली जाते. साधु हे धर्माच्या नावावर थोतांडे आहेत असा त्यांचा समज रूढ होता. १९४७ साली ते ऋषीकेश येथे स्वामी शिवनंदांच्या आश्रमात पोहचले. स्वामी शिवानंद म्हणजे पुर्वाश्रमीचे डॉक्टर मलाया व सिंगापूर येथे त्यांचा व्यवसाय होता, पण ह्या व्यवसायावर तुळशीपत्र ठेऊन ते ऋषीकेश येथे 'आनंद कुटीर' आश्रमात स्थायिक झाले व भारतीय आध्यात्माच्या प्रचारकाची भूमिका डोळ्यासमोर धरली होती व त्यानुसार त्यांचे प्रचारकार्य सुरू होते. ह्या प्रचारकार्यात धर्मग्रंथावरिल प्रवचने, सेवार्थ दवाखाने इ. सामाजिक त्यागाचे उपक्रम होते. जोवर अध्यात्माच्या आशय व्यक्तीच्या जीवनात रूजत नाही तोपर्यंत धर्माची उन्नतावस्था येणार नाही हा कार्याबाबतचा त्यांचा दृष्टिकोन प्रत्यक्ष त्यांच्या कृतीतून दिसत होता. ह्या ठिकाणी मेननचे स्वागतच झाले. ह्याकाळात बालकृष्णन मेनन ने स्वामी शिवानंदांच्या जीवनाचा अतिशय जवळून अभ्यास केला. ह्यांची जीवनशैली अतिशय जवळून अभ्यासली, ह्याच ठिकाणी चिन्मय

मिशन कार्याचे बिजारोपण झाले असे म्हणावयास हरकत नाही. शिवानंदांच्या व्यक्तिमत्वाचा बालनवर विलक्षण परिणाम झाला. शिवानंदांच्या कार्याची पध्दती, कार्यमग्नता ह्यामुळे ते अतिशय भारावून गेले. तोपर्यंतही त्यांचा असा समज होता की साधु हा रिकामटेकडा असतो, पण शिवनंदांच्या संपर्कात आल्यावर त्यांचा हा गैरसमज दूर झाला. ह्याच मुक्कामात शिवानंदाच्या एका पूर्तीच्या स्मरणीकेचे संपादनही बालकृष्णन मेनन ने केले. शिवानंदांच्या कुटी मधील तीन महीन्याचे वास्तव्य हे त्यांच्या जीवनाला नवी दिशा प्रदान करून गेले. ह्या तीन महीन्याच्या काळात त्यांच्यातील बीजारोपण स्वामी शिवनंदांनी केले. वास्तविक मेननची वृत्ती आध्यात्मीक नव्हती, पण शिवनंदांचे त्यांच्यावर खूप प्रेम होते. शिष्याचे गुरुशी नाते हे आंतरिक असते, ईश्वर निर्धारित असते, ह्याची प्रचीती आल्या वाचून राहत नाही. जेव्हा जेव्हा आश्रमात सत्संग होई तेव्हा तेव्हा बालन त्यात सहभागी होई असे अनेकदा शिवानंद त्यांना सायकाळच्या सत्संगात एखाद्या विषयावर बोलण्याचे आदेश देत सुरूवातीला मेननला ही बाब अतिशय अवघड वाटायची पण गुरुचा भक्कम आधार त्यांना होता. श्री मेनन हे आता स्वामी शिवानंदांच्या सत्संगात आपले स्वतंत्र निर्भिड विचार मांडु लागले व एका प्रखर वक्तृत्व शैलीचा जन्म झाला. स्वामी शिवानंदांनी त्यांच्यातील अध्यात्माचे तेज ओळखले होते. त्यांच्यातील विचारांची प्रामाणिकता, आचारातील खरेपणा ओळखला. हिन्दुधर्माचे उत्थान करण्यासाठी ह्यापेक्षा अधिक चांगला गुणसंचय कोठे मिळणार ? ह्याच वेळी स्वामी शिवानंदांनी त्यांना सन्यास घेऊन प्रचार कार्य करण्याबाबत सूचित केले, पण श्री मेनन ह्यांचा अद्याप निर्धार झाला नव्हता व ह्या तीन महिन्यांच्या वास्तव्यानंतर त्यांनी शिवानंदांची आनंद कुटीर सोडली. पण फारच थोड्या काळाकरिता तेथे पुन्हा येणे हे विधीलिखीत होते. आयुष्यात घडणाऱ्या प्रत्येक घटनेमागे ईश्वरी योजना व प्रयोजन असते, पण हे ईश्वरी प्रयोजनाची जाणिव ज्यास होते त्याच्या जीवनाला ईश्वरी स्पर्श झाल्याशिवाय राहत नाही व ही जाणीव होण्यासाठी सुध्दा त्या जगनियत्याकडे विशेष योजना होत्या. 'God has better plan for everybody' ह्या वाक्याची प्रचिती श्री मेनन ह्यांच्या जीवनाचा आलेख बघतांना येते. पण हे ईश्वर प्रयोजन जाणून घेण्याची उर्मी फार थोड्या भाग्यवंतांना असते व अश्याच भाग्यवंताकडून ईश्वरीय कार्याची पूर्तता होत असते. ह्याचीच प्रचिती देणारा क्षण श्री मेनन ह्यांच्या आयुष्यात आला, त्यांच्या मित्राचा मृत्यु झाला होता. वास्तविक जीवन मृत्यु ह्या नित्य घडणाऱ्या घटना. मृत्युने सर्वसामान्य माणूस हा

शोकाकुल बनतो, पण मित्राच्या मृत्युने त्यांना अतिशय चिंतनशील बनविले. मित्राच्या रक्षा विसर्जनाची जबाबदारी श्री मेनन ह्यांचेवर सोपविली होती. रक्षा विसर्जनास जात असतांना त्यांच्या मनान विचारांचे काहूर माजले. मित्राचा मृत्यु कां झाला? एवढा मोठा देह व त्याची रक्षा केवळ एवढ्या छोट्या वाट्यात इ. मित्र मृत्युमुखी पावला पण मी अद्याप जिवंत आहे, माझ्या जीवनाचे प्रयोजन काय ? मला ईश्वराने नेमक्या कोणत्या कार्याकरिता जीवंत ठेवले? जीवन मृत्यु सुखः दुखः ह्यामागील कारण काय ? माझ्या जीवनाचा उद्देश काय ? अशा अनेक प्रश्नांनी त्यांचे मन भारावून गेले. ह्या प्रश्नाची उत्तरे शोधल्याशिवाय आता मनाला चैन पडणार नाही हे उत्तर देण्याचे सामर्थ्य फक्त स्वामी शिवानंदांमध्येच आहे. ह्याची जाणीव त्यांच्या अंर्तमनाला झाली. बुध्दीचा निर्धार पक्का झाला व ते स्वामी शिवानंद ह्यांच्या आनंदकुटीर मध्ये पुनश्च वापस गेले.

## स्वामी चिन्मयानंद यांचा उदय :-

श्री मेनन ह्यांचा हिमालय यात्रेला प्रारंभ २४ एप्रिल १९४८ साली प्रारंभ झाला, ही यात्रा अतिशय कठिण होती पण श्री मेनन ह्यांनी ती अनवाणीच करायचे निर्धारीत केले होते. यमुनोत्री, गंगोत्री, बद्रीनाथ, केदारनाथ इ. ठिकाणी भ्रमंती सुरूच होती. ह्या भ्रमंतीतून त्यांनी ज्ञानग्रहणाची प्रक्रिया सुरूच ठेवली. ह्या यात्रेत त्यांनी अनेक साधुंची भेट घेतली, अनेकांशी सुसंवाद साधला, त्यांच्या विविध उपासना पध्दती जाणून घेतल्या. तपश्चर्येबाबत त्यांच्या वेगवेगळ्या अनुभूती जाणून घेतल्या. ह्यातच त्यांच्या मनात भारतीय वेदांता बाबतची जिज्ञासा निर्माण झाली. ह्या यात्रेत त्यांची गाठ पडती ती हिमालयाच्या साधुत अत्यंत ज्ञानवंत म्हटल्या जाणाऱ्या स्वामी तपोवनम यांचेशी. स्वामी तपोवनम ह्यांचेशी भेट हा त्यांच्या आयुष्यातील एक महत्वाची घटना म्हणावी लागेल. कारण ह्या भेटीनंतर धर्मग्रंथ अभ्यासण्याची मनाची त्यांची तळमळही अधिकाधिक तिव्र होत गेली. निसर्गाचे विशाल सौंदर्य, त्यात निरपेक्ष बुध्दीने राहणारे सर्व साधु ह्या सर्वांचा मनावर जो परिणाम घडायचा तो घडलाच आणि सन्यासाचा त्यांचा निर्धार पक्का झाला. श्री मेनन ह्यांच्या आयुष्याला एक आगळीवेगळी कलाटणी मिळाली. अत्यंत ऐश्वर्य संपन्न घराण्यात जन्मलेला सर्व सुखसोयी ह्याच्या समोर दास म्हणून उभ्या होत्या. अशा वातावरणातील रूबाबदार युवक ''श्री बालकृष्ण मेनन'' आता

सन्यासदिक्षेबाबत ठाम निर्णयाव्रत आले होते आणि ह्याचे पालन त्यांनी केले व हिमालय यात्रा संपवून ते स्वामी शिवनंदांकडे आले. ज्या क्षणाची स्वामी शिवानंद वाट बघत होते तो क्षण आला होता व एका महान तपस्वीचा उदयाचा हा क्षण होता २५ फेब्रुवारी १९४९. महाशिवरात्रीच्या पावनपर्वावर स्वामी शिवानंद यांनी बालकृष्ण मेननला संन्यासदिक्षा दिली व बालकृष्ण मेनन हे स्वामी चिन्मयानंद सरस्वती म्हणून तपस्वी झाले. संन्यासाला सर्वसंगपरित्याग करायचा असतो, हा परित्याग त्यांनी अगदी सहजरित्या केला. ह्यानंतर त्यांना कुटुंब, समाजाचा घटक म्हणून कोणतीच ओळख राहणार नव्हती. धर्मपंथ, ज्ञान, वैराग्य हीच त्यांची संपत्ती व गुरुकृपा हा त्यांचा जीवनाधार. मानवतेची सेवा हे जीवनकार्य व हिन्दुत्वाचा प्रचार व प्रसार हे त्यांचे जीवनध्येय बनले. हा श्री बालकृष्ण मेननचा स्वामी चिन्मयानंद सरस्वती म्हणून जन्म झाला.

## गुरुचे मार्गदर्शन :-

स्वामी चिन्मयानंदांच्या मनात धर्मशास्त्र संस्कृत मधून शिकण्याची जास्त ओढ होती. ज्या ग्रंथाच्या आधारे आजतागायत हिन्दु धर्म डौलदार पण उभा आहे त्यांना जाणून घेणे ही जीवन कार्याची सुरूवात होती व त्याकरीता स्वामी शिवनंदांनी त्यांना स्वामी तपोवनम ह्यांच्याकडे पाठविले. स्वामी तपोवनम हे अत्यंत कडक शिस्तिचे होते. त्यांच्या हाताखाली राहून धर्मग्रंथाचे अध्ययन हे अतिशय कठिण काम होते. शिष्याकरिता त्यांनी घालून दिलेले काही कडक नियम होते. शिष्याकडून त्यांच्या काही अपेक्षा होत्या. स्वामी तपोवन महाराज हे मुळचे केरळचे ते पालक्कड गावातील मदप्पसुर घराण्यातील चिप्पुकुट्टी नायर होते. ते लहानपणापासून वैरागी होते. लहानपणापासूनच शालेय शिक्षण न घेता त्यांनी आध्यात्मिक पुस्तकांचा अभ्यास केला. स्वत:च्याच घराच्या अंगणात त्यांनी एक झोपडी बांधली होती व ह्या झोपडीत ते साधना करित असत. वेदांचा अभ्यास करणे हे त्यांचे ध्येय व जीवनकार्य होते. त्यांनी उत्तरकाशीला येऊन एक झोपडी बांधली व त्यात राहून ते विद्यार्थ्यांना आध्यात्माचे धडे देत असत. त्यांच्या ह्या साधनेचा सुगंध हिमालयाच्या परिसरात दरवळत होताच. त्यामुळे अनेक तपस्वी त्या ठिकाणी येत, त्यांच्याशी चर्चा करित अनेक संन्यास त्यांच्याकडून उपदेश घेत असत. ते स्वत: संस्कृत भाषेत अनेक रचना करित असत. ते आश्रम बांधुन राहण्याच्या विरोधात होते, पण त्यांचे एक जुने शिष्य गोविंदगीरीजी महाराज ह्यांनी स्वामी तपोवन महाराजांच्या झोपडीपासून

खाली जाणाऱ्या रस्त्यावर एक आश्रम बांधला होता व ह्या आश्रमातच ते विद्यार्थ्यांची राहण्याची व्यवस्था करित असत. स्वामी चिन्मयानंद हे तपोवनच्या शिस्तीत कसे राहतील ही त्यांचे ज्ञान कसे पचवतील ह्याबाबत गोविंदगीरीजींना शंका वाटत असे पण स्वामी चिन्मयानंदांची जिद्द चिकाटी ही वाखाणण्या जोगी होती. प्रत्यक्ष अभ्यासाला सुरूवात करण्यापूर्वी स्वामी तपोवनम महाराजांनी त्यांना बाग करण्याचे कार्य दिले, त्या बागेला घालायला आसपास पाणी नव्हते ते खालून गंगेतीरेवरून आणावे लागत असे, पण त्यावेळी हे कार्यही त्यांनी केले. कारण गुरु आज्ञा होती. एक महिन्यानी शिक्षण सुरू होणार होते आणि तोवर जे वाचले त्यावर मनन करून ठेवण्याबाबत गुरुची आज्ञा होती. त्यानंतर एक महिन्यांनी स्वामी तपोवन महाराज, गोविंदगीरीजी महाराज व स्वामी चिन्मयानंद ह्यांची पदयात्रा सुरू झाली ही यात्रा अतिशय खडतर होती पण स्वामी चिन्मयानंदांनी ते सर्व खडतर परिश्रम घेतले कारण ज्ञानाची जिज्ञासा तिव्र होती. पण त्यानंतर मात्र त्यांचे शिक्षण सुरू झाले व ज्या पुस्तकाच्या माध्यमातून वेदांताच्या संकल्पना स्पष्ट होतात असे विद्यारण्य स्वामी यांचे ''पंचदशी'' हे पुस्तक प्रथम अभ्यासास घेण्यात आले. मुळातच स्वामी चिन्मयानंद हे अतिशय जिज्ञासु असल्याने ते आपल्या गुरुंना अनेक प्रश्न विचारीत व त्यांचे इंग्रजीत टिपणे घेत असत. स्वत:च्या प्रश्नाबाबत ते गुरुकडुन पूर्ण समाधान करून घेत असत. गुरुच्या आचरणातून ते बरेच काही शिकले. त्यांचा दैनंदीन कार्यक्रम हा अतिशय शिस्तबध्द असे. गंगेच्या थंडगार पाण्यात दिवसापासुन दोनदा आंघोळ करणे, दुपारचे जेवण चिन्मयानंद स्वत: बनवित, त्यासाठी लागणारी भिक्षा ही नेपाळी विद्यार्थी आणत असत. स्वामीजींना भोजनाची आवड होती, पण त्यांना ते बनविता येत नसे पण तरीही आपल्या गुरुसाठी अन्न बनविण्यात त्यांना धन्यता वाटे व आपल्या शिष्याच्या प्रेमळ हातचे भोजन ग्रहण करण्यात गुरुला धन्य वाटत होते. हीच बाब शिष्यांची असे गुरुनी दिलेले ज्ञान ग्रहण करण्यांत शिष्याला आनंद होता. आश्रमातील थोडाही वेळ हा चिंतनाव्यतिरीक्त घालविण्यास गुरुचा विरोध होता, चर्चा करायची झाल्यास ती आत्मचर्चा असावी व चिंतन करावयाचे झाल्यात ते आत्मचिंतनच असावे असा त्यांचा कटाक्ष होता. ''व्यर्थ बोलणे हा ईश्वर अनुसंधानातील अथडळा आहे'' असे गुरुचे म्हणणे होते. सायंकाळ झाली की चिन्मयानंद आपल्या निवाऱ्याकडे जात असत. तो निवारा म्हणजे उतरत्या गवताच्या छपराचा अत्यंत ठेंगणा असा तो एक उघडा ओस गोठा होता. थंडी खूप असायची रात्री बर्फही पडायचा पण

अशाही वातावरणात ते गुरुज्ञानावर चिंतन करित असत. ध्यान साधना करित असत, तत्वावरिल ध्यान दृढ करित असत. पण ह्या ही काळात त्यांचा जीवनाधार होता तो म्हणजे गुरुप्रेम, शास्त्रप्रेम. ह्याच काळात त्यांनी स्वामी तपोवन महाराजांसोबत यात्रा केली. निसर्ग सौंदर्याने ते भाळून जात अनिमिष नेत्रांनी ते ईश्वरीय वैभव आपल्या डोळ्यांनी साठवून घेत व आपल्या गुरुच्या वाक्यांची त्यांना प्रचिती येत असे. गुरु तपोवनम म्हणत "अशा सुंदर निसर्गात ईश्वराचे प्रगटन पाहूनही परमेश्वरी वैभव व लीला लोकांना कशी पटत नाही, कोण जाणे" ह्या भ्रमंतीनंतर अभ्यासवर्गाला प्रारंभ झाला. ह्या अभ्यासाच्या काळात आश्रमात सेवाकार्य करावे असा गुरुंचा दंडक होता कारण ह्या सेवेनीच अहंकार कमी होतो व सद्‌गुण वाढीस लागतात असे ते म्हणत. आपल्या शिष्याच्या वर्तनाबाबत ते केव्हाही परीक्षा घेत. शिष्याच्या सहनशीलतेबद्दल त्यांची ही परीक्षा शिष्याच्या अहंकाराची पडताळणी केल्याचे त्यांच्या चरित्रात दाखले मिळतात. पण चिन्मयानंदांची निष्ठा अढळ होती, अत्यंत समर्पित भावनेने त्यांनी आपल्या गुरुची सेवा केली हाच समर्पण भाव त्यांच्या जीवनाचा स्थायीभाव बनला.

चिन्मयानंदांच्या जीवनाला कलाटणी देणारा पुन्हा एक क्षण त्यांच्या जीवनात आला. वडीलांची तब्येत चांगली नाही हे कळल्यावर ते आपल्या वडिलांना भेटायला गेले. परतीच्या प्रवासात त्यांनी निरनिराळ्या मंदीरांना भेटी दिल्या, प्रवचने दिलीत तेव्हा त्यांना सर्वांची जी दुरावस्था आढळली त्यामुळे अधिक विचार मग्न झाले हे चित्र बदलणार कसे ह्याचे उत्तर केवळ वेदांतातच आहे ह्याची जाणीव त्यांना झाली. वेदांत हा केवळ सिध्दांत नाही तर ते आचाराचे शास्त्र आहे. हे शास्त्र आता सर्वसामान्य जनांपर्यंत पोहोचवायला हवे. गीता ही अर्जुनाला जीवन रणांगणावर सांगितली तेव्हा अर्जुन हा तरूण होता. त्याच्या मानसिक अवस्थेत गीता तत्वज्ञानाने बदल झाला व संघर्षास तयार झाला. लोकांना गीता ही जीवनाच्या ह्या रणांगणातच शिकवायला हवी, मानवाच्या जीवनाचा स्तर उंचावण्याकरिता त्यांना वेदांताचे शास्त्र शिकवायलाच हवे, ह्या विचारांचे स्फुलींग त्यांच्या मनात निर्माण झाले.

## विलक्षण अनुभव :-

जेव्हा जेव्हा चिन्मयानंद आपल्या गुरुंना वेदांत सर्वसामान्यांपर्यंत नेण्याबाबत विचारत तेव्हा तेव्हा तपोवनम त्यांना नकार देत. कारण त्यांच्या मते धर्म हे प्रत्येकासाठी नाही

तर ज्यांना त्याबाबत जिज्ञासा आहे, त्यांच्याच करिता तो आहे असे ते म्हणत असत. त्यामुळे सुरूवातीच्या काळात त्यांना गुरुकडून ह्याबाबत आज्ञा मिळाली नाही, पण स्वत:ची केवळ आध्यात्मिक उन्नती करण्यापेक्षा सर्वसामान्य लोकांच्या जीवनात प्रकाश आणण्याच्या भावनेने ते भारावले होते. एक दिवस स्वामीजी विचार मग्न अवस्थेत गंगेच्या किनारी बसले असतांना डोक्यात विचारांचे काहूर सुरू होतेच ही विचार मग्नता याबाबत होती की हे उच्च वैदिक तत्वज्ञान केवळ पुस्तकातच रहायला नको तर ते आता सर्वसामान्यांपर्यंत पोहोचायला हवे. सर्वसामान्यांच्या मनात भारतीय संस्कृतीचा, हिन्दुधर्माचा आदर वाढायला हवा. कारण अनेक वर्षापासून परकीय संस्कृतीच्या अधिपत्याखाली राहून भारतीय व्यक्तीही मानसिक गुलाम झाली आहे. ह्यामुळे त्यांना पाहिजे तसा भारतीय संस्कृतीचा आदर वाटत नाही. ह्यापेक्षा अधिक चिंतेची बाब ही की त्यांना भारतीय संस्कृतीबाबत टिकास्पद दृष्टिकोन बनतो आहे, भारताच्या भवितव्यासाठी ही बाब अतिशय घातक आहे. ही बाब त्यांनी तेव्हाच जाणली होती पण ही परिस्थिती आता पालटायला हवी, आता भारतात संस्कृतीचा आदर व्हायला हवा, भारतीय आध्यात्म समाजाभिमुख व्हायला हवे. ह्या विचारांचा प्रवाह मनामध्ये सुरू होताच आणि त्यांना जणु काही गंगामातेने स्वत:च्या प्रवाहातून संदेश दिला. ''वत्सा माझ्याकडे जरा पहा ना ? हिमाचलच्या कुशीत मी जन्म घेतला तरी मी खाली उतरले आणि लोकांना पोषण व जीवन देत आहे. आपल्याला मिळालेली कोणतीही गोष्ट सर्वांना वाटण्यातच ह्याची पुर्तता आहे''. हा एक विलक्षण अनुभव होता. जणु काही सर्व सृष्टी चिन्मयानंदांच्या कार्याबाबत शुभप्रेरणा व आशिर्वाद देत होती, आता मात्र जीवनाचे ध्येयाला अधिक स्पष्टता आली होती.

## गंगोत्री प्लॅन :-

हा दृष्टांत झाल्यावर वेदांत तत्वज्ञाना बाबत त्याची दृष्टी पालटली आणि हे तत्वज्ञान सर्वसामान्य पोहोचविण्याची स्वत:च्या स्तरावर एक योजना बनविली व ती आपल्या गुरुंना विहीत केली. प्रथमता गुरुंनी त्यांना नकार दिला शेवटी त्यांनी नाखुशीनेच अनुमती दिली. भारतीय अध्यात्म व मानवी मूल्ये ह्यांचे पुनरूज्जीवन करणे हेच ह्या शिष्योत्तमाचे जीवनकार्य आहे हे जाणून सद्‌गुरु स्वामी तपोवनम महाराज यांनी स्वामी चिन्मयानंदाला समाजात ज्ञान प्रचार कार्याबाबत परवानगी दिली, आशिर्वाद दिला. १९५१ मध्ये स्वामीजींनी

आपले प्रचार कार्य सुरू केले व ह्याकरिता त्यांनी पुनश्च देश भ्रमणास प्रारंभ केला. गंगोत्री, ऋषीकेश, दिल्ली असा त्यांनी पायी प्रवास केला. काही महत्वाच्या स्थळांना भेटी दिल्यात. मंदीरे, मठ ह्यांना भेटी दिल्यात. स्वाभाविकपणे ह्या कार्यात त्यांना अनेक अडचणी आल्यात, अध्यात्मिक जागृतीकरिता हा काळ महत्वाचा नाही असे सुशिक्षीत वर्गाकडून त्यांना सुचविण्यांत आले. भारत आर्थिक, राजनैतिक संकटात असतांना एका भगव्या वस्त्र घालणाऱ्या व्यक्तीने आध्यात्मिक पुर्नस्थापनेच्या गोष्टी कराव्यात ही बाब तत्कालीन धर्म मार्तंडांना आवडली नाही. त्यांनी त्यांच्या ह्या कार्यास प्रखर विरोध दर्शविला, पण स्वामी चिन्मयानंदांचा निर्धार पक्का होता. भारतीयांच्या आध्यात्मिक उन्नतीचे स्वप्न त्यांनी पाहीले होते. हे स्वप्न ह्यांना सत्यात उतरवायचे होते. पण हे कार्य सोपे तर नव्हतेच पण एकट्याचेही नव्हते. भारतीय वेदांत तत्वज्ञान हे संस्कृत भाषेत होते, पण संस्कृत भाषा सर्वांनाच येईल असे नाही. पण ह्या सर्वांकरिता त्यांनी प्रवचन सांगायची योजना आखली ह्याला ते गंगोत्री योजना म्हणत असत.

## चळवळीस प्रारंभ :-

गंगोत्री योजना सफल बनविण्यासाठी त्यांनी प्रवचने सांगायचे आयोजनाचा मार्ग निवडला. ह्या प्रवचन सत्रास त्यांनी ''ज्ञानयज्ञ'' असे नांव दिले. याचाच अर्थ साधक शुध्द व उन्नत व्हावा म्हणून हृदयाच्या अग्नीत दिलेली ज्ञानाहुती ही उदात्त संकल्पना घेऊन त्यांनी ज्ञानयज्ञास सुरूवात केली व ह्यासाठी सर्वप्रथम पुणे शहराची निवड केली. महाराष्ट्राकरिता ही अभिमानाची बाब आहे, कारण महाराष्ट्राची भुमी ही संतांचे माहेर घर आहे, महाराष्ट्रात संतांची भक्ती रूजली, वाढली, आकाशा ऐवढी मोठी झाली. ३१ डिसेंबर १९५१ साली स्वामीजींचा पहिल्या ज्ञान यज्ञास प्रारंभ झाला. पहिल्या ज्ञानयज्ञाचा विषय होता "Let us be Hindus" (आपण हिन्दु होऊ या!) स्वामीजींच्या ह्या प्रवचनास केवळ ७ श्रोते उपस्थित होते, स्वामजींचा पाहिला ज्ञानयज्ञ ३१ डिसेंबर १९५१ ते ७ एप्रिल १९५२ असा शंभर दिवसांचा घेण्यांत आला. ह्या ज्ञानयज्ञात कठोपनिषद व केनोपनिषद ह्या विषयावर त्यांनी प्रवचने दिली. ह्या १०० दिवसांपैकी ६० दिवस ही उपनिषदाच्या परिचयात्मक भागावर होती. हा यज्ञ रस्तापेठेतील गणपती मंदीरात भरविण्यांत आला होता. दिवसेंदिवस गर्दी वाढतच होती, ह्याच ज्ञानयज्ञात त्यांनी आपल्या पुढील कार्याबाबत उद्घोषणा केली. "My mission is to convert Hindus

into Hinduism" धर्मशास्त्र स्वामीजी इंग्रजीतून सांगतात हा अधर्म आहे अशी भूमिका धर्मपंडीतांनी घेतली. कारण स्वामीजी उपनिषदा सारखा क्लिष्ट विषय इंग्रजीतून अगदी सोपा करून सांगत असत, धर्ममार्तंडांनी ह्या कार्यावर बंदी आणण्याचाही प्रयत्न केला. त्यांना मारण्याचीही धमकी दिली, पण स्वामीजींचा विचार पक्का होता. अनेक सुशिक्षीतांमध्ये स्वामीजी लोकप्रिय होऊ लागले. पण ह्या कार्याला चळवळीचे रूप देण्याचा शंख स्वामीजींनी फुंकला. कार्याचा दुसरा टप्पा चेन्नई हा होता. येथेही त्यांना विरोध झाला, पण एक मुस्लीम त्यांच्या मदतीला आला, त्याने आपले राहते घर त्यांच्या प्रवचन कार्याकरीता दिले व हा मुस्लीम म्हणजेच स्वामीजींच्या हिंदुत्व संकल्पनेचे मूर्त रूप होता. दक्षिणेत हिंन्दुची सेवा कार्याचा पहिला प्रयत्न हा मुस्लीम व्यक्तिमुळे शक्य झाला होता. त्यांचा ज्ञानयज्ञ लोकप्रीय होण्याचे महत्वाचे कारण म्हणजे त्यांच्यातील महत्वाचे तीन गुण ते म्हणजे "Reasoning oratory and progressive thinking" पुण्याच्या ज्ञानयज्ञाचा ज्ञानयज्ञ प्रसाद देण्यांत आला, त्यावर लिहण्यात आले होते.

Chinmayas work is dedicated to the srutis (scriptures), That told me what the reality is to Swami Tapovanji Maharaj of Utterkasi. Who guided me to the end and pused me in to the beyond and to sat Gurudeo Swami Shivananda Maharaj of Rishikesh. Who showed me in his life how to live and act in God as God.

१९५६ मधील दिल्ली येथील ज्ञानयज्ञाचे उद्‌घाटन तत्कालीन राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद ह्यांच्या हस्ते झाले. १९५१ ते १९५६ ह्या काळात स्वामीजींचे २५ ज्ञानयज्ञ झाले. ह्या काळात बराचसा तरूण वर्ग त्यांच्या कार्याकडे आकृष्ट झाला. १९५५ मध्ये त्यांनी आकाशवाणीवर व्याख्याने प्रसारीत करून लोकांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न केला.

चिन्मय मिशनच्या स्थापनेमागे श्रीरंगस्वामी नटराजन अय्यर (स्वामी दयानंद) व कांती अय्यर (स्वामी शांतानंद) ह्यांचे प्रयत्न महत्वपूर्ण ठरतात. १९५३ मध्ये अभ्यासकाच्या एका गृपने वेदांताचा अभ्यास करण्यासाठी एकत्रीत संघटीत होण्याचे निश्चित केले व त्याबाबत त्यांनी स्वामीजींना विचारणा केली. ही विचारणा करित असतांना त्यांनी ‘‘चिन्मय मिशन’’

संघटनेच्या स्थापनेची परवानगी मागीतली. ह्यावर स्वामीजींनी त्यांना जे उत्तर दिले त्यात त्यांच्या निस्वार्थ कार्याची प्रेरणा लक्षात येते ते म्हणतात, "Don't start any organisation in my name I have not come here to be Institutionalised. I have come here to give the message of our ancient sages which has benifitted me. If it has benefitted you pass it on" ह्या त्यांच्या वक्तव्यावर चिन्मय मिशन ही संस्था व्यक्तीच्या नावाशी केंद्रीत नसून ती सत्यज्ञान दर्शन शब्दाशी निगडीत आहे असे समर्थकांनी समर्थन दिले. "As a seeker of truth we are called ourselves The Chinmaya Mission".

हे ज्ञानयज्ञाचे कार्य एका चळवळीच्या रूपात प्रारंभ करण्यांत आले. यदा यदाही धर्मस्य। गीतेमधील ह्या श्लोकाची पुर्नप्रचिती भारतीयांना आली. ज्यावेळी हिन्दु धर्म हा संकटात होता, पुनश्च मतमतांचा गलबला वाढला होता. कर्मकांडाच्या नावावर सर्वसामान्यांची वागणूक होत होती. खऱ्या धर्माचा आशय बाजुलाच राहीला होता व धर्म संकल्पनेत नको त्या उपप्रवृत्तीनी डोके वर काढले होते व त्या प्रबळही झाल्या होत्या. समाजात जेव्हा असा धर्म रसातळाला जातो, जेव्हा धर्माचा खरा आशय विस्मृतीत जातो तेव्हा तेव्हा परमेश्वराला पृथ्वीवर अवतरीत होऊन धर्मचे पुनरूत्थान करावे लागते. अधर्माचा नायनाट करावा लागतो. प्राचीनकाळी शंकराचार्य, ज्ञानदेव, आधुनिक काळात स्वामी विवेकानंद, स्वामी चिन्मयानंद हे ते अवतारी पुरूष होत. स्वामी चिन्मयानंदांनी केवळ ज्ञानयज्ञ चळवळीलाच प्रारंभ केला नाही तर ह्या चळवळीचे प्रतिक ठरविण्यांत आले. 'ॐ' हिन्दुचे प्रतिक असणारे व वैश्विकतेचे प्रतिक असणारे चिन्ह त्यांनी निवडले व ह्याची पार्श्वभूमी केशरी ठरविण्यांत येऊन ह्या चळवळीचा Flag बनविण्यांत आला. अग्नीचे प्रतिक असणारा व ज्ञानाग्नी चेतविणाऱ्या केशरी रंगाची नविड ह्यासाठी करण्यांत आली. 'चिन्मय मिशन' ह्या संघटनेची स्थापना झाली. ह्यामागील गुरुदेवांचे (प.पू.स्वामी चिन्मयानंद ह्यांचा उल्लेख ह्यापुढील लेखनात गुरुदेव हा करण्यांत आला आहे.) त्यांचे व्हीजन काय होते हे त्यांच्याच शब्दात पुढील प्रमाणे - Tapovan Prasad मधील The cult of creative Goodness मध्ये त्यांनी आपले ह्याबाबत विचार व्यक्त केले आहे.

No mission can successfully function and produce

satisfactory resutls unless it has its own vision. Higher the vision, greater the mission.

Now is the time that we need a clear vision to make the mission a really dynamic one, asserting its own against the perversion, moral, political and social that we see around us. The heritage of 500 years of slavery is too strong upon the minds of our generation. We must with all efforts break it. As mission members we must learn to drop all class or caste distinctions. We must forget even to entertain them ! All are Narayana only.

All Chinmaya Mission members together form a single happy Chinmaya family of sincere and dedicated serevents of the lord.

Ours is not a political organisation and we have no political programme. Ours is the human problem - the problem of character - the texture of the social life. To revive it is to revive man. To reinstate the personality within each Indian is the goal. Certainly it is a silent and quiet work if needs endless patience, infinite love and boundless sacrifice form each member. The mission should except form its members everything, their money, knowledge, abilities, strengths, their children, influence, time, health in short we must be ready to give ourselves up for mission. In our dedicated service, in our courage of conviction, and in our faith in the glory of our past alone can we inspire the nation which had been dying for centuries - but not yet dead is the immortal spirit of Bharat.

This is the time for the culture of the rishis to bring hope and strength, faith and courage to the dying hearts and confused heads.

Chinmaya Mission is the one organisation in the country today which can faithfully take up this sacred work of national resurrection of Bharat. Chinmaya Mission members are the servants of the lord, serving his plans here among mankind.

In this grand, new vision, the Hindu culture will revive, grow and flourish not only among a few devotees but throught the world. An area where a population subsists is called a 'country'. And a country is not a 'nation', only a geographical area where a people live in creative endeavour is called a nation. So the transform a country into a nation, we must remould the population into a people with common living culture consciousness.

To forge and to evolve out of our population a healthy, vibrant, creative people is the work of the Mission, Spiritual revival which is the work of the Chinmaya Mission, therefore visualises the improvement of the quality of men. This is the grand vision of the Chinmaya Mission.

त्यानंतरच्या २ वर्षाच्या काळात मद्रास मध्ये चिन्मय मिशनच्या शाखा उघडण्यांत आल्या. ह्या प्रत्येक शाखेचे स्वत:चे स्वतंत्र वाचनालय होते. त्यांचे प्रत्येक आठवड्याचे कार्यक्रम निर्धारीत केलेले असत. ह्यात प्रामुख्याने ध्यानवर्ग, श्लोक पठन, चर्चा अशा प्रकारची कार्य निर्धारीत केलेले असत. ह्या कार्याचा प्रसार प्रत्येक शहरात होण्याबाबत त्याचा मानस होताच. प्रत्येकाने आपले कार्य मिशन ह्या दृष्टीने व मिशनरीच्या भूमिकेतून करावे असा त्यांचा अट्टाहास होता, नव्हे चिन्मय मिशन हा एक शिस्तबध्द परिवारच आहे.

**प्रथम प्रकाशन :-**

सप्टेंबर १९५५ मध्ये चिन्मय चळवळीचे ''त्यागी'' हे पहिले प्रकाशन प्रकाशित झाले. स्वामीजींच्या प्रत्येक व्याख्यानाच्या नोटस् घेण्यांत येत असत. ह्या व्याख्यानाची एक

पुस्तीका तयार करण्यांत आली होती व ही पुस्तिका जे ह्या यशास उपजवीत होते अशा १२००० व्यक्तींना पाठविण्यांत आले. ह्याच काळात भक्तांच्या एका समुहाने चेन्नईत नियतकालीक प्रकाशीत करायचे ठरविले. ज्यात स्वामी शिवानंद, अरविन्द यांच्या सारख्या थोर संतांच्या लेखाचा समावेश असेल. ह्या नियतकालीकाला व त्यायोगे होणाऱ्या कार्याला स्वामी तपोवन महाराजांचे आशिर्वाद प्राप्त झाले होते व ह्या "त्यागी" नियतकालीकाच्या नावाबाबत स्वामी तपोवन यांचे महाराजांनी अतिशय कौतुक केले. ह्या नियतकालीकाचे संपादक होते श्री नटराजन अय्यर.

त्यानंतरचे दुसरे प्रकाशन आहे Holi-Renaissance Vol.-I हे डिसेंबर १९५६ मध्ये प्रकाशित झाले. हैद्राबाद येथे जो ९५ वा ज्ञानयज्ञ झाला त्या ज्ञानयज्ञाच्या मुहूर्तावर ह्याचे प्रकाशन झाले. गुरुदेवांना ज्ञानयज्ञातील उपस्थीती वाढविण्याबाबत व लोकांना प्रोत्साहित करण्याबाबत Management Principle of Motivation चा वापर करून यज्ञातील उपस्थीतीची प्रमाण सातत्याने वाढते ठेवण्यात आले.

## स्वामी तपोवन महाराजांची महासमाधी :-

गुरुदेवांचा कार्याचा व्याप हा सतत वाढताच होता. ज्ञानयज्ञाची संकल्पना समाजात रुजु लागली होती. भारतीय हिन्दु तत्वज्ञानाबद्दलचे जनजागरण अखंड सुरू होते. वेदांताची ज्ञानगंगा सर्वसामान्यांच्या मनापर्यंत, हृदयापर्यंत जात होती. समर्पित बुध्दीने हे कार्य अखंड अव्याहत पणे सुरू होते. सद्गुरुंनी एका चांगला सत्शिष्य भारताला दिला होता. सत्शिष्यामुळे ओळखल्या जाणाऱ्या सद्गुरुमध्ये आज एक मेरूमणी निर्माण झाला होता ते म्हणजे स्वामी तपोवन महाराज. कार्याची कृतार्थता सेवेत आहे, सेवेची कृतार्थता अखंडत्वात आहे, आपल्या कार्याचा प्रवाह आता अखंडत्वाकडे विलीन झाला आहे ही खात्री आता सद्गुरुंची झाली होती. सत्शिष्य निर्माण करून आपले गुरुऋण फेडण्याची घटका आता जवळ आली होती. नोव्हेंबर १९६५ प. पू. गुरुदेवांचे २३ ला ज्ञानयज्ञाचा अंतीम टप्पा आणि प.पू.स्वामी तपोवन महाराजांच्या प्रकृती गंभीर असण्याबाबत त्यांना निरोप प्राप्त झाला व त्यानंतर गुरुदेव तपोवन महाराजांना भेटावयास गेले होते, ही त्यांची शेवटची भेट होती. त्यानंतर जानेवारी १९५७ मध्ये स्वामी तपोवन महाराज ह्यांनी महासमाधी घेतली, पण कार्याच्या रूपात मात्र त्यांनी

स्वत:चे अखंडत्व कायम ठेवले.

१९५६ मध्ये दिल्ली येथील ज्ञानयज्ञ संपल्यावर गुरुदेवांना भेटण्याकरीता काही मंडळी आली, त्यात अतिशय क्रियाशील व बुध्दीमान स्त्रिया होत्या. १९५८ मध्ये मद्रास येथे मॉ सुंदरन ह्यांनी Ladies Group सुरू केला. प्रत्येक आठवड्यात त्या सगळ्यांनी एकत्र येऊन वेदांतावर चर्चा करित व आपल्या दैनंदीन व्यवहारात वेदांताचा उपयोग कसा होऊ शकेल ह्यावर त्यांचा विचार विनिमय व चर्चा करित असत. आपल्या Activity बाबत सांगण्याकरिता ह्या सगळ्याजणी जेव्हा गुरुदेवांकडे गेल्यात तेव्हा चिन्मयानंदांनी त्यांला "Chinmaya Devi Group" हे नांव दिले. २ नोव्हेंबर १९५८ मध्ये Devi group ची स्थापना झाली. त्यानंतर चिन्मय देवी ग्रुपच्या कार्याला चळवळीचे रूप १९६० मध्ये केरळमध्ये भरलेल्या Chinmaya Devi Conference नंतर वाढले. स्वामीजींनी Women Central Family ची कल्पना व महत्व मानलेलेच होते. जर आई ही चांगली साधक असेल तर घरातील वातावरण निश्चितपणे बदलते ह्यावर त्यांची दृढ श्रध्दा होती. ते म्हणत 'Your family does not have to go out to hear a swami, you change and your environment will follow suit, your are the mother, the model and the Guru'. आपल्या मुलांना मार्गदर्शन करण्याबाबत ते सूचना देत. बालकांना लहान लहान गोष्टीतून जीवनमूल्य रूजविण्यावर त्यांचा भर होता. आपल्या दैनंदीन गृहकार्यात पूज्यभाव ठेवण्याबाबत ते स्त्रीयांना सुचीत करीत असत.

१९५५ मध्ये त्यांनी बालकांसाठी पहीला कार्यक्रम घेतला. दिल्ली येथे श्रीमती जानकी सेठ यांनी ३५ बालके एकत्रीत केली. ह्यात अधिक बालके येण्यास इच्छुक होती पण जागे अभावी हे शक्य नसायचे. अशावेळी ह्या मुलांना बागेतील नैसर्गिक वातावणात सुसंस्कार करण्यांत येत असत. एर्नाकुलम येथे मिस जानकी मेनन ह्यांनी मुलांसाठी वर्ग सुरू केला. मुलांबाबत चिन्मयानंदांचे खालील विधान अतिशय मार्मिक आहेत, ते म्हणतात -

'Children are the architects of the future world, They are the builders of humanity. The most sacred task of parents as well as teachers is to mold their lives in accordance with the sublime Indian Tradition. The seed of spiritual values should be shown in the young hearts and conditions

should be made favourable for its, sprouting and steady growth by the exercise of proper control and discipline when carerd for with warmth of love and affection a tree will blassom forth, with the flowers of brotherhood universal love, peace, bliss beauty and perfection.

१९५९ मध्ये चिन्मय मिशनच्या माध्यमातून All India Chinmaya Children Conference चे आयोजन करण्यांत आले. प्राथमिक शाळेतील शिक्षकांकरिता सुध्दा कार्यशाळेचे आयोजन करण्यांत आले होते. ह्या कार्यशाळेचा उद्देश To give them background in their religious heritage to enable them to share it with their students. ह्या कॉन्फरन्सचे उद्घाटन स्वामजींनी केले व आपल्या व्याख्यानात त्यांनी Teacher आणि Instruction ह्या मधील भेद समजाऊन सांगीतला. ह्या व्याख्यानात त्यांनी खेद व्यक्त केला, "Its was unfortunate that Indian had patterned its modern education after the style of west, which was based on stuffing facts and figures into the childrens mind where they remained just long enough to be vomited back at exam time.

सप्टेंबर १९५९ मध्ये स्वामीजींनी दुसरे नियतकालीक सुरू केले त्याचे नांव होते USHA. हे प्रकाशन हैद्राबादचे होते. चिन्मय मिशनच्या ॲक्टीव्हीटीची माहिती सर्वांपर्यंत पोहोचविण्याच्या दृष्टिकोनातून हे प्रकाशन अतिशय उपयुक्त ठरले.

३० ऑगस्ट ते १ सप्टेंबर १९५२ ह्या काळात ॲम्बेसेडर हॉटेल चेन्नई येथे 'All Indian Conference of Chinmaya Mission' चे आयोजन करण्यांत आले होते. ह्या कॉन्फरन्स करिता ४०० प्रतिनिधी उपस्थीत होते. ह्या कॉन्फरन्स करिता विषय ठरविण्यांत आला "Dynamic, Integrated HINDUISM".

जानेवारी २३ ते २५, १९६० मध्ये केरळ मध्ये Kollengode येथे अखिल भारतीय चिन्मय देवी सम्मेलन भरविण्यांत आले होते. ह्या संमेलनाचे उदिष्ट ठरविण्यांत आले होते 'To revive Hinduism and guide the younger generation to take up the

right path'. १९६१ मध्ये ह्याच ठिकाणी बाल महोत्साचेही प्रयोजन करण्यांत आले होते. 'How our dreams of a better tommrrow could be realised through a proper molding of our children.

१९६१ मध्ये चिन्मय मिशनच्या दृष्टिकोनातून एक अतिशय महत्वाची घटना घडली. ती म्हणजे डॉ. एकम्बरम ह्यांना १९६१ मध्ये स्वामी चिन्मयानंद ह्यांनी महाशिवरात्रीच्या दिवशी सन्यास दिक्षा दिली. डॉ. एकम्बरम हे व्यवसायाने डॉक्टर होते व ते सेवानिवृत्त झाले होते. चेन्नई येथील एका दवाखान्यात ते कार्यरत होते. ते स्वामीजींचे अनेक वर्षापासून सेवक होते व त्यांच्या संन्यास दिक्षेनंतर त्यांना स्वामी प्रेमानंद हे नांव प्रदान करण्यांत आले.

८ मार्च १९६१ मध्ये चेन्नई येथे Chinmaya Publication Trust स्थापन करण्यांत आला. त्याचे रजिस्ट्रेशन ही करण्यांत आले. १९६२ मध्ये बंगलोर येथे चिन्मय नर्सिंग होम उघडण्यांत आले. मुंबई येथे Tara Cultural Trust स्थापन करण्यांत आले व Tapovan Prasad ला प्रारंभ झाला.

१९६४ मध्ये तीसरी चिन्मय मिशन कॉन्फरन्स बोलविण्यांत आली. ह्या जवळपास १०० सेन्टरच्या स्टडीग्रुपने Devi groups चे Balvihar चे सभासद सहभागी झाले होते. ह्यात एका केंदीभुत संघटनेची गरज ही सर्वांच्या कार्यात समन्वय आणण्याच्या दृष्टीने आवश्यक आहे असा सर्व साधकांकडून प्रस्ताव आला ह्याच वेळी चिन्मय मिशनचा symbol ठरविण्यांत आला. हा सिम्बॉल दिव्याच्या स्वरुपात ठरविण्यात आला. ह्याचे कारण "The oil lamp is the symbol of the moral and ethical life necessary to develop the discriminating power to bring forth the light within" हंस पक्षी हे निरक्षीर विवेकाचे प्रतिक आहे, कमळ हे राष्ट्रीय फुल आहे, मानवाच्या अंतीम ध्येयाचेच प्रतिक आहे. शारीरिक दृष्ट्या चिखलात राहूनही आपले अंतरंग विकसीत करते.

जानेवारी १९६३ मध्ये मुंबई येथे सांदीपनी साधनालयाची स्थापना करण्यांत आली. वेदांताचा अभ्यास हे साधनालयाचे प्रमुख उद्दिष्ट होते. १९६३ मध्ये स्वामी शिवानंद महाराज हे स्वामीजींचे दिक्षागुरु होते. त्यांनी महासमाधी घेतली. जुलै १९६४ मध्ये Central

Chinmaya Mission Trust ची स्थापना करण्यांत आली व उद्दिष्ट ठरविण्यांत आले. "To promote and spread Indian Culture and Education and enlightment among the masses". एप्रील १९६४ मध्ये जगदीश्वर मंदीराची कोनशीला बसविण्यांचा कार्यक्रम झाला. हे चिन्मय मिशनचे पहीले मंदीर होते.

संघटनेच्या स्थापनेमागील त्यांचा दृष्टिकोन उदात्त होत. हिन्दु धर्माबद्दल त्यांची निष्ठा प्रगाढ होती. धर्माने संघटीत झाल्याशिवाय भारतीय वेदांत तत्वज्ञानाचे पुनरूत्थान होऊ शकत नाही. संघटनेचा उद्देश स्पष्ट करतांना गुरुदेव म्हणतात, "Why we want an organization ? without organization nither industry nor commerce nor culture, nor any activity in the world can succeed today. When I pay my attention to religions. I find those relegions that are organised have a stay in the world, today disorganised relegions will be wipe out ! See Chiristianity! How beautifully they are organised look at Islam ! Even Buddhists all over the far east are well organised our Religion also has to gain organisitional beauty.

मुंबई येथील सांदीपनी साधनालयाच्या वास्तुत ऑगस्ट १९६४ मध्ये विश्व हिन्दु परिषदेची स्थापना झाली. हिन्दु समाज संघठीत झाला पाहिजे हा दृष्टिकोन डोळ्यासमोर जऊन विविध हिन्दु बांधवांनी ह्या विश्व हिन्दु परिषदेची स्थापना केली. प. पू. गुरुदेव हे विश्व हिन्दु परिषदेचे संस्थापक अध्यक्ष होते.

चिन्मय मिशनच्या कार्याचा वेग अफाट होता, १९६५ मध्ये चिन्मय मिशनच्या पहिल्या नर्सरी शाळेची सुरूवात Kollengode येथे झाली. त्यानंतर प्रत्येक वर्षी नर्सरी शाळांची स्थापना होत राहील. कुर्नुल, म्हैसुर, भंडारा, कालीकत, मुंबई इ. ठिकाणी शाळांची स्थापना झाली. कुर्नुल येथील Women College च्या सेवानिवृत्त प्राचार्या स्वामीनी विद्यानंदा यांच्याकडे शैक्षणिक कार्याची जबाबदारी सोपविण्यांत आली. प्रत्येक शहरात जाऊन शिक्षकाशी संपर्क व समन्वयाचे कार्य त्या करित. शिक्षण खात्याच्या नियमानुसार पण हिन्दु संस्कृतीशी सहसंबंध जऊन शालेय कार्यक्रमाचे संयोजन करण्यांत येत असे. त्या मागील उद्देश हा अशा

शाळांची निर्मिती करणे ज्या Secular Education तर देतील पण हिन्दु संस्कृती नैतिक मूल्ये, धार्मिक आदर्श आणि जीवनाचे तत्वज्ञान यांच्याशी फारकत नसेल. हा दृष्टिकोन ठेऊन चिन्मय नर्सरी शाळेचा शैक्षणिक आराखडा बनला होता व त्यानंतर मात्र शाळांमध्ये एकेक तुकडी वाढतच गेली व ६ व्या वर्गापर्यंत शाळेचा विस्तार झाला, अनेक ठिकाणी माध्यमिक शाळाही स्थापन करण्यांत आल्यात. शाळेचा आर्थिक स्त्रोत विद्यार्थी फी, डोनेशन, फंड हा होता.

मार्च १९६५ मध्ये स्वामीजी विश्व दौऱ्यावर रवाना झाले. हा दौरा ४ महिन्यांचा होता. जागतिक स्तरावर चिन्मय मिशनच्या कार्याची ही सुरूवात होती. १९६६ मध्ये विदेशातही ज्ञानयज्ञाचे आयोजन हा चिन्मय मिशनच्या दृष्टिकोनातून व भारताच्या दृष्टिकोनातून महत्वाचा क्षण होता. १९६६ मध्ये Chinmaya Mission Correspondance Course सुध्दा पाश्चात्य साधकांसाठी सुरू करण्यांत आला होता. देशभरात ७० चिन्मय विद्यालय, एक रेसिडेन्शीयल स्कुल हा शिक्षण क्षेत्रासाठी मानाचा तुरा होय. युवकांसाठी चिन्मय युवा केंद्राची स्थापनाही करण्यांत आली. युवकांबाबत त्यांचा दृष्टिकोन अतिशय सकारात्मक होता. युवा व्यक्तिवर त्याचा विश्वास होता. ते म्हणत, "Catch them young and give them your love, Inspire them to lead a higher life of noble values and self dedicated service, you can then be sure of the nations glourious present and a brighter future". हे व्हीजन डोळ्यासमोर जऊन गुरुदेवांनी १९७५ मध्ये अर्थात CHYK चिन्मय युवा केंद्राची स्थापना केली व हरिदास चैतन्य ह्यांची Organising Secretary म्हणून नियुक्ती करण्यांत आली. युवकांच्या बाबतीत कृतीत आध्यात्म हा दृष्टिकोन होता (Spiritually in action). ह्या दृष्टिकोनातून त्यांनी कृतीशील अध्यात्मिकता संकल्पना सर्वप्रथम समाजात उद्घृत केली. "Never before the world needed such dynamism as today and our country needs it most. Your future job is to uplift the country revitalise and make it nation". ह्या वाक्यातून कृतीशील आध्यात्माची संकल्पना ही राष्ट्र निर्मीतीशी निगडीत होती हे लक्षात येते. ही बाब भौतीक ज्ञानातून प्राप्त होऊ शकत नाही. It needs in the leaders this explosive expression personal magnetism and this dynamism, cultivated through proper education. चिन्मय युवा केंद्राच्या स्थापनेमागील मागील गुरुदेवांचा उद्देश होता, "To create an atmosphere of study for

the youth, whereby they are exposed to the highest truths of Vedanta and at the same time they are able to exibit this knowledge as excellence and perfection in their interactions with the external world". ह्यातून त्यांना नेमके काय साधायचे होते? He wanted to create a strong army of spirituality enlightened soldiers who would march out in the world with dashing courage and speak words of devine enthusiasm for others to emulate. युवकांबाबत ते नेहमी म्हणत असत, Youth are not careless they are cared less.

सामाजिक कार्यात राष्ट्रीय कार्यात स्वामीजींचा पुढाकार हा हिरीरीचा असायचा ते प्रखर राष्ट्रभक्त होते. भारताचे प्राचीन वैभव हे आध्यात्मात आहे, हिन्दुत्वात आहे, ते प्राप्त करून देणे हेच त्यांनी जीवीत कार्य मानले होते. भारतीयांच्या मनात राष्ट्रप्रेम, संस्कृतीचा अभिमान जागविणे हे त्यांचे सेवाव्रत इ. बाणवण्याकरिता त्यांनी आपले आयुष्य वेचले. आपल्या विविध लेखांमधुन त्यांनी जनजागृती केली, जेव्हा जेव्हा भारतावर आक्रमणे झालीत, तेव्हा तेव्हा त्यांनी आपले परखड विचार व्यक्त केले. भारतीय संस्कृतीत अध्यात्म ह्याबाबत जाज्वल्य अभिमान त्यांचेजवळ होता. त्याग, सेवा हा भारताचा स्थायीभाव आहे हा स्थायीभावच जर हरवला तर भारताचे अस्तीत्व मिटून जाईल असे ते म्हणत. देश संकटात आहे, त्याचप्रमाणे आपला धर्म संकटात आहे ह्याबद्दल त्यांना खूप वाईट वाटे. आपल्या भारतीयत्वाचा आपल्याला अभिमान असेल तर आपण आपल्या संस्कृतीचे व धर्माचे रक्षण केले पाहिजे हे ते ठामपणे म्हणत असत. भारताला स्वातंत्र्य मिळून इतकी वर्ष झाली पण भारताची आर्थिक, राजकिय, सामाजिक परीस्थिती सुधारली नाही ह्याचे त्यांना वाईट वाटे. ह्यासाठी त्यांनी तरूणांना आव्हाहन केले होते. वेदांत तत्वज्ञानाचा प्रचार व प्रसार हे त्यांचे जीवन कार्य होतेच. त्या विचारांचे कार्याने त्यांचे संपूर्ण जीवनच व्यापून गेले होते. ह्या मागील आलेली संकटे ही संकटे वाटलीच नाही. प्रत्येक क्षणी विचार होता तो केवळ ध्येयाचाच, त्यापुढे त्यांना व्यक्तीगत आयुष्य तुच्छ होते. कार्यापुढे शरीराची पर्वा नव्हती, कार्याबाबत उत्साह दांडगा होता. हा उत्साह इतका अदम्य होता की प्रारंभिक काळामध्ये जेव्हा प्रवचने देत तेव्हा स्वत: स्वत:च्या प्रवचानाची जाहीरात ते करीत. हातात मेगॅफोन घेऊन स्वत: सायकलवर स्वार होऊन गावात गल्ली, गल्ली फिरत व आपल्या कार्याचा प्रचार करित होते. वास्तविक संन्यासाने आपले अध्यात्म हे विजनवासात ठेवावे, त्याला

सामाजिक बनवु नये असा तेव्हाचा प्रघात होता. पण समाजाची दुरावस्था, धर्माला लागलेली ग्लानी, उत्तुंग विचारांचा वारसा असूनही उदासीन असणारा हिंन्दु समाज, सहिष्णुतेच्या नावाखाली अगतिक बनलेला हिन्दु समाज, शक्तिहीन, विवेकहीन बनलेला मानव, कर्मकांडाचे माजलेले स्तोम, ह्या सर्व गोष्टी ह्या असह्य करणाऱ्या होत्या, पण ह्यांच्यात परिवर्तन घडवून आणणे ही बाब एका कफल्लक संन्याशाकरिता कठीण होती. समाजाला खडबडून जागे करणे ही बाब अत्यंत क्लिष्ट असते. समाज हा गतीशील असतो, सदविचार समाजात चटकन रूजत नाही. अशावेळी हे सतीचे वाण घेऊन स्वामीजींनी ह्या कार्यास जो प्रारंभ केला तोच केवळ राष्ट्रप्रेम, धर्मप्रेम, त्यांच्या मनात प्रबळ होते. हिन्दुत्व हीच आपल्या राष्ट्राची ओळख आहे, राष्ट्राचा आत्मा आहे. हा आत्मा त्यांना गवसला होता. पण सनातनी पंडीतांच्या त्या धार्मिक अधिराज्याला गदागदा हलविणे ही त्या काळात सोपे नव्हते. सनातनी ब्राह्मण लोकांच्या विरोधाला तोंड देणे ही तेवढी सोपी बाब नव्हती. कारण सर्वसामान्यांनी, त्याही पेक्षा ब्राह्मणेत्तर समाजाने ब्रह्मविद्या शिकु नये असे पंडीत ब्राह्मणांचे त्याकाळी मत होते. त्यामुळे त्यांना ब्राह्मण पंडीतांचा खूप त्रास झाला. असा ही इतिहास आहे की सनातनी ब्राह्मण लोक ह्याबाबतची तक्रार कामकोटी पिठाच्या आचार्यांकडे ह्याबाबत तक्रारही घेऊन गेले होते. तक्रारीत महत्वाचा सूर असा होता की मुळातच स्वामी चिन्मयानंद हे ब्राह्मण कुटूंबात जन्माला न आल्याने त्यांना खरेतर ब्रह्मविद्येचा अधिकारच नाही. शिवाय सर्व सामान्य व ब्राह्मणेत्तर ब्रह्मविद्या शिकवून ते धर्म बुडविण्याचे कार्य करित आहे. पण कामकोटीचे आचार्य हे तपस्वी होते, सिध्द पुरूष होते. त्यांनी स्वामीजींचा अधिकार जाणला होता. गीता उपनिषदांचा मतितार्थ जो शास्त्र पंडीत शब्द पंडीताना समजला नाही. तो स्वामीजींनी जाणला आहे व तो सर्वसामान्यांपर्यंत कसा पोहोचवायचा हेही त्यांना माहित आहे. अशा शब्दात त्यांनी सनातनांना उत्तर देऊन निरूत्तर केले, पण त्यानंतर मात्र त्यातीलच काही धर्मपंडीत स्वामीजींचे अनुयायी झाले असे हे युवा सन्यासी यांनी अखिल भारतीय युवा केंद्राची स्थापना करून युवकांसाठी कृतीशीलतेचे दालन उघडून दिले आहे असे म्हणायला हरकत नाही. युवा केंद्राच्या माध्यमातून युवकाच्या रचनात्मक चारीत्र्य बांधणीसाठी व व्यक्तिमत्व विकासासाठी युवकांचे संघटन करण्यात आले आहे. युवा केंद्राच्या कार्याचा तपशील हा चिन्मयानंदांच्या कार्याच्या बाबत वेगळ्या प्रकरणात विस्तृत अभ्यास, सांस्कृतीक कार्यक्रम, सामाजिक सेवा कार्यक्रम, युवा शिबीर, कॉन्फरन्सेस,

अभ्यासवर्ग इ. कार्यक्रमाच्या माध्यमातून युवा केंद्राचे कार्य चालते.

१९७२ मध्ये विविध पाश्चात्य विद्यापीठात त्यांनी वेदांतावर तेथील प्राध्यापकांशी चर्चा केल्यात. University of Hawil, कॅलीफोर्निया इ. विदेशात असतांना गीता तत्वज्ञानावरील प्रवचने ऐकण्यास एक विद्यार्थी येत असे, त्याने स्वामीजींना पत्र पाठवून एक प्रश्न विचारला. How they could integrate East and West ? Robert Holbin हे त्या विद्याथ्याचे नांव आहे. स्वामीजींनी त्यावर जे उत्तर दिले त्याला जगात तोड नाही. ते म्हणतात, "To serve as a bridge between the east and west the individual must have an inconceivable height, and his arms must have the widest imaginable embrace. When an individual has grown to such a height and such an arms length and has cost his head in the heights of meditation he becomes that all pervading. Because where the ego has ended spirit alone exists. The spirit needs neither the eastern spirituality and its values of life nor the western materialism and its all anihilating missiles of death and disaster. In the external heart there are no continents. There are no people. There is only love. Cultivate such an all embracing love which seeks no distiction, sees no difference knows no east and west and you will bring the whole universe in to your palm. Wish to embrance the whole universe, Never plan to make cragy quilt of the world by bringing together the spiritual experience of the east and Material wealth of the west this cannot be done where one is the another can not be". गुरुदेवांचा हा वैश्विक दृष्टिकोन पाहता. मानवते बाबत त्याची प्रेमळ दृष्टी लक्षात येते. शिवाय एखाद्या घटनेचा विचार जर त्याच्या मुक्कामी जाऊन केला तर त्याबाबत योग्य दृष्टिकोन विकसित व्हायला मदत होते. "By study of Hindu philosophy christians would become better christions. Their own understanding of christenity would be enhanced and their personal relationship with christe and his teaching would deepen".

स्वामीजींना हिन्दुधर्माबाबत नितांत आदर होता, पण त्यांनी इतर धर्मातील लोकांना धर्मांतराबाबत कधिच प्रोत्साहन दिले नाही. वेदांताचाच अभ्यास करून ते आपला धर्म किती योग्यरित्या पाहू शकतात हे त्यांनी पटवून दिले.

स्वामीजींचा प्रभाव हा संपूर्ण विश्वावर गाजत राहीला. ते जेथे जेथे गेले तेथे तेथे त्यांनी माणूस जिंकून मानवता जिंकली, प्रेम जिंकले. त्यांचे व्याख्यान हे प्रत्येकाच्या हृदयात शिरले, जीवनात उतरले व अनेकांचे जीवन परिवर्तीत झाले. अनेक लोक एकत्र येत होते, केंद्रांची स्थापना करित होते. ह्या कार्यात सर्व समावेशकता होती, तळागाळाच्या लोकांपासून स्वामीजींनी माणसांची मने जोडली. ही मने जोडण्याचा महत्वाचा दुवा होता तो म्हणजे वेदांत तत्वज्ञान, देशातील विदेशातील युनिव्हर्सिटी मधून स्वामीजींना व्याख्यानाकरिता, मार्गदर्शनाकरिता आमंत्रणे येवु लागली, त्यांचे व्याख्यान हे सर्वंकष, सर्वांगपरिपूर्ण व्यापक असत. चिन्मय इंटरनॅशनल फाउंडेशन, चिन्मय बेस्ट ही त्यांची अत्यंत जमेची बाजु होती. त्याच्या माध्यमातून वेदांत तत्वज्ञान हे सातासमुद्रा पलीकडे पोहोचले. तेथे ते रूजले एवढेच नाही, तर तेथे विविध चिन्मय केंद्राची स्थापनाही झाल्यात. कार्यात विविधताही आली, अनेक सर्वधर्मीय सभा व संमेलनामध्ये स्वामीजींच्या व्यक्तिमत्वाची छाप घडत होती. ह्याच काळात अनेक वृत्तपत्रातून त्यांचे लेख प्रसिध्द होत होते. त्यांच्या मुलाखती घेतल्या जात, ह्या मुलाखतीतून त्यांचा व्यापक दृष्टिकोन जगासमोर येत होता व वैश्विक स्तरावर मानव त्यांच्याकडे अधिकच आकृष्ट होत होता.

स्वामीजी अत्यंत कडक शिस्तीचे पण तेवढेच प्रेमळ होते. शिस्त लावण्याकरीता ते अनेकदा आपल्या शिष्यावर चिडत, पण त्यांचे व्यक्तिमत्वच महासागरासारखे होते. वरवर लाटा कितीही उफाळल्या तर अंतरंगातून प्रशांत असे ते होते.

१९९२ साली अमेरिकेतील मासिकाने Hinduism Today ते स्वामीजींना सन्माननीय हिंन्दु पुनरूज्जीवन पारितोषीक व Hindu of the year ह्या पुरस्काराने सन्मानीत केले ही भारताकरिता अत्यंत गौरवाची बाब होती.

पं. पू. स्वामी चिन्मयानंद म्हणजे एक समर्पित जीवन होते, त्यांना कशाचाही पोकळ अभिमान नव्हता. त्यांच्या कार्याचे एवढे ऐश्वर्य वाढले पण त्याबाबत आपण ईश्वरी

कार्याचे एक साधन आहोत अशीच त्यांची कार्याच्या प्रति श्रध्दा होती. कार्यात त्यांची तन्मयता होती ह्याचे महत्वाचे कारण त्याचे देहतादात्म्य पूर्णपणे सुटले होते. कोणत्याही प्रकारचा वयोगट असला तरी त्यांच्या अनुभवाचा जाणीवेच्या कक्षेतील विषयावर ते सुसंवाद साधत असत त्यांच्या ह्या स्वभावाबद्दल स्वामी ब्रम्हानंदांनी त्यांचेबाबत उद्गार काढले आहेत की, "स्वामीजी श्रोत्यांच्या पातळीवर येऊन विषय सोपा करून सांगत असत. लहान मुले समोर असली की हावभावासह त्यांच्याच शब्दात गोष्टी सांगायचे आणि खुप हसवायचे, तरूण वर्गासमोर व्याख्यान असले की त्यांच्या समाजातील, राष्ट्रातील समस्या मांडून त्याला यशस्वीपणे तोंड देण्या इतके बलवान कसे व्हावे ते शिकवित. शिक्षणाचा उद्देश काय ? चांगला नागरीक कसे बनावे ते शिकवित, कृति युक्त योजना सांगत, राष्ट्राची मान उंचावयाची असेल तर प्रत्येक तरूण विद्वान उद्योगी, सतशील आणि योजक असा झाला पाहीजे असाच त्यांचा दंडक होता. स्त्री वर्गाशी महिलांशी बोलतांना त्यांनी प्रपंचातील कर्तव्य व्यवस्थीत पार पाडतांना आत्मोध्दार कसा करावा हे मार्गदर्शन केले. पुढील पिढी उत्तम घडविण्याचे मोठे कार्य स्त्रीयांना करायचे आहे. ह्या गोष्टींवर त्यांचा भर असे. "स्वामीजींच्या प्रत्येक कृतित यज्ञभाव होता, कार्यमग्नता हे त्यांच्या कृतीशिलतेचे रहस्य होते. पहाटे चार वाजतापासून ते कधी कधी रात्री दोन वाजेपर्यंत त्यांचे कार्य चाले. त्यांच्या कार्याचे अजुन एक वैशिष्ट्य असे होते की, गुरुदेव प्रत्येकाच्या पत्राला अतिशय आत्मीयतेने उत्तर देत असत. साधकांच्या मनातील प्रश्नांचे समस्यांचे निराकारण करित असत. काम कोणतेही असो त्या कामात रंगून जाऊन काम करणे हे त्यांचे वैशिष्ट्य होते.

## देहातीत गुरुदेव :-

माझे खरे रूप ब्रम्हस्वरूप आहे, अहंब्रह्मास्मिची अनुभूती गुरुदेवांनी घेतली होती. ह्याची प्रचिती त्यांच्या आयुष्यात डोकावली असता त्यांच्या वर्तनावरून ते लक्षात येत होते. प्रचिती आणून देणारे अनेक क्षण साधकांनी टिपले आहेत. त्यातील एक प्रसंग असाच आहे. एकदा प्रवचनस्थळी ते व्यासपीठावर चढले व आपल्या प्रवचनास प्रारंभ केला. दीड तास प्रवचन झाले, प्रवचन झाल्यावर स्वामींजी उठून चालु लागत पण त्या दिवशी त्यांनी साधकांना हरीओम म्हणत उठण्याची विनंती केली. सर्व श्रोते आश्चर्याने उठले व निघुन गेले. त्यानंतर आयोजकांनी स्वामीजींना काय झाले म्हणून विचारले ह्यावर स्वामीजींनी मला उठता येत नाही असे

सांगीतले. सर्व जण स्वामीजींकडे धावले तेव्हा सर्वांच्या लक्षात आले होते की स्वामीजींच्या पायाला खिळा लागला असून त्यांचा पाय रक्तबंबाळ झाला होता व त्यांचा पितांबर रक्तबंबाळ जागी चिकटून बसला होता. अशा परिस्थितीत त्यांनी आपले प्रवचन पूर्ण केले. पण चेहऱ्यावर वेदनेचा साधा लवलेशही नव्हता. ही आठवण त्यांच्या ''असंगोहम्'' भावनेची प्रचिती दिल्या वाचुन राहत नाही.

कामाचा विस्तार, कामाचे सातत्य ह्याचा परिणाम आता त्यांच्या शरीरावर जाणवू लागला होता. त्यांची होस्टन मध्ये हृदयाची शस्त्रक्रीया झाली. जुलै १९९० मध्ये गुरुदेवांचा ज्ञानयज्ञ सुरू होता. अचानक त्यांना धाप लागली, श्वास लागला थकवा वाटु लागला. लगेच डॉक्टरांना पाचारण करण्यांत आले. डॉक्टरांना तब्येतीची तिव्रता लगेच लक्षात आली. त्यांच्या चाचण्या करण्यांत आल्या. हृदयाला रक्तपुरवठा करणाऱ्या तीन रक्त व्हेन्समध्ये ९०% अवरोध निघाला. पण त्यावेळी जेव्हा डॉक्टरांनी त्यांचा दिनक्रम विचारला तेव्हा ते स्तिमीतच झाले. हृदयात एवढे अवरोध असतांना ते कसे काय करतात याचेच कोडे त्यांना पडले. ह्यांची बायपास सर्जरी ह्युस्टन येथील प्रख्यात सर्जन डॉ. डेटनकुली यांनी करण्याचे ठरविले. हे ऑपरेशन झाल्यावर स्वामीजी क्लींटला विश्रांतीकरिता आले होते.

डिसेंबर १९९३ मध्ये स्वामीजींनी युनायटेड नेशन्स, न्युयॉर्क येथे भाषणे दिलीत. १९९३ मध्ये USA मध्ये अनेक विद्यापीठात त्यांनी व्याख्याने दिली. प्रकृती खालावतच होती, पण त्या परिस्थितीतही ते म्हणत, "Illness and pain are the nature of the body, whoever has a body will experience them. We must have a courage to suffer it with peaceful joy. Never pray for a cure, the lord will never give anyone-even his enemy-more pain than he deserves pray for the strength to the lord for his love. Keep on smiling always at all times, under all conditions". ही देहातील भावना असेल म्हणून की काय ह्याही प्राकृतिक अवस्थेत स्वामीजी २१ तास काम करित असत.

मे १९९२ ते मे १९९३ ह्या काळात त्यांची तब्येत अधिकच खालावली. हृदयाचे कार्य केवळ २०% पर्यंतच सुरू होते. डॉक्टरांनी त्यांना पूर्ण विश्रांतीचा सल्ला दिला

होता, परंतु शेवटच्या क्षणापर्यंत ते अखंड कार्य करित राहिले.

ऑगस्ट १९९३ मध्ये स्वामीजी वॉशींग्टन येथील अध्यात्मिक शिबीर आटोपून ते कॅलीफोर्नीया Sanoiego ला गेले. काहीच दिवसापूर्वी ते आपल्या शिष्यांना म्हणाले होते, "The lord has been calling me, but all these people wont let me go. I feel like arope being pulled on both ends".

त्यांचे हे वाक्य खरे ठरले, त्यांची प्रकृती अतिशय गंभीर झाली व त्यांना अतिदक्षता विभागात हलविण्यांत आले. त्याचवेळी Devine Life Society चे प्रमुख स्वामी चिदानंद यांनी स्वामीजींची भेट घेतले. स्वामी चिदानंदांनी प्रार्थना केली व भक्तांना सांगीतले की आता स्वामीजी आत्मस्वरूपात विलीन होत आहे. भक्तांच्या नामस्मरणात ३ ऑगस्ट १९९३ ला स्वामीजी सायंकाळी ५ वाजून ४५ मि.नी महासमाधीच्या दिव्य स्थितीला पोहोचले.

**हरीओम**

# राष्ट्रभक्त स्वामीजी

स्वामीजी हे प्रखर राष्ट्रभक्त होते. त्यांच्या अध्यात्मिक कार्यात सुध्दा त्यांची राष्ट्रभक्ती आपल्या लक्षात येते. १९६२ साली जेव्हा चीनचे भारतावर आक्रमण झाले तेव्हा गुरुदेवांनी ऑल इंडीया रेडिओवर जे भाषण दिले ते पुढील प्रमाणे ''प्रस्तुत भाषणाचा अनुवाद हा 'हृष्यमिच्य पुनः पुन्हा' यातून घेण्यांत आला आहे.

''आपली मातृभूमी सध्या संकटात आहे. आपल्या संस्कृतीचे उत्पत्तीस्थान असलेला हिमालयाचा बराचसा भाग परकीय राक्षसांनी घशात घातला आहे. पुरातन धार्मिक स्थळे व आश्रम लुटमार करून नाश केले गेले आहेत. आपल्या तीर्थयात्रांचा मानबिंदू जो कैलास तिथे आपल्यापैकी थोड्यांनाच जाता येते. आपल्या पूर्वजांचे, अनेक पिढ्यांचे स्फूर्तीस्थान असे जे मानसरोवर, सध्या आपल्या टप्प्यापलीकडचे झाले आहे. आपल्याच घरी जायला आपल्याला परवानगी घ्यावी लागते.

खरेतर हिंदूलोक लढायला स्वभावतःच उत्सुक असत नाहीत. राष्ट्र म्हणून भारत काही वसाहती सत्ता (Common Wealth) प्रस्थापित करू इच्छित नाही. आम्हाला शांतता आवडेत, आम्ही समाधानी राहू इच्छितो हेच आमच्या संस्कृतीचे वैशिष्ट्य व वैभव आहे. हे समाधान व ही शांती आपल्या आध्यात्मिक संपत्तीतून व नैतिक मूल्यांच्या बळामुळेच निर्माण झाली आहे. हे स्पष्ट आहे की, हिंदुत्व ही एक जीवनशैली आहे व निर्बलत्वाचा पुरस्कार तिने कधीच केला नाही. आत्मशक्तीचे प्रगटन असलेल्या शांतीचा आपल्याला आशिर्वाद आहे आणि ती आता आपल्याला हाक मारीत आहे.

समाजातील नैतिक जीवन जेव्हा धोक्यात येते, धर्माची सर्व मूल्ये तुडवली जातात, सत्ता, तृष्णा व पाशवी लुटीचे प्राबल्य वाढलेले असते, तेव्हा सर्व सज्जनांचे हे धार्मिक कर्तव्य आहे, की त्यांनी आपले सर्व सामर्थ्य पणाला लावून ह्या पाशवी शक्तीशी सामना द्यावा. आपले धार्मिक साहित्य अशा तऱ्हेच्या धर्मयुध्दांनी पूर्ण भरलेले आहे. कार्यरत हिंदू पाहायचा असेल तर भगवान विष्णूंची दहा अवतारचरित्रे पाहावीत. फार काय ! चार हातात चार आयुधे घेतलेले विष्णु हे प्रतीकच हिंदुत्वाची गतिमान जीवन पध्दती दाखवते. भगवान विष्णु

एका हातातील शंखाने सर्वजणांना नीतिमान आयुष्य जगण्याचे आवाहन करतात. जे लोक त्यांचे ऐकतील, त्यांना शांती देण्याच्या विश्वासाचे कमळ हे प्रतीक आहे. त्यांनी सांगितलेले जे मनावर घेणार नाहीत, त्यांना ते आपल्या गदेने प्रहार करतात आणि जे अगदीच कोडगे, सुधारण्यास अशक्य, ते त्यांच्या चक्राला बळी पडतात.

आपण शंख पुकारला परंतु परकीयांना ती शांतीची हाक कळली नाही. नंतर आम्ही गदेचाही उपयोग केला, तरीही अजूनही ते मदांध आहेत. आता मात्र त्यांना चक्राचा इंगा दाखविल्याशिवाय आम्हाला गत्यंतर नाही. आम्ही शांततेकरता प्रार्थना करू, पण अधर्मापुढे नमणार नाही. समाधानात राहू, पण आक्रमकापुढे मान तुकवणार नाही. आम्ही नरम आहोत पण शुध्द प्रतिक्रियेत नाही. आपण ह्या आव्हानाला यशस्वीपणे तोंड देणार आणि आमचा हिमालय परत मिळवणारचं. गीतेचा हाच संदेश आहे, 'तस्माद् उत्तिष्ठ कौंतेय युध्दाय कृतनिश्चय:' 'माझ्या देशबंधूंनो, लढा देण्याचा निश्चय करा. या पवित्र भारत-भूमीकरता मरावे लागले तरी चालेल.'

## शिस्तप्रीय स्वामीजी :-

स्वामीजी शिस्तीचे अतिशय भोक्ते होते, ज्या गुरुच्या तालमीत ते तयार झाले होते ते म्हणजे मूर्तीमंत शिस्तच होते. प्रत्येक कार्य संपविण्याची त्यांची कालमर्यादा होती, ते काम ज्यावेळेस जे पूर्ण करू शकत नव्हते ते स्वामीजींच्या सहवासात फारसे राहू शकले नाहीत. स्वत:च्या आचरणातून त्यांनी शिस्त शिकवीली होती. अभ्यासवर्गाला हजर राहात नाहीत,ह्यावर उपाय काय करावा ह्याबाबत काही केंद्रावरून स्वामीजींना उपाय योजनेबाबत विचारणा झाली, त्यावर स्वामीजींनी काही सूचना दिल्यात त्याचा उल्लेख Journey of Master ह्या पुस्तकांत करण्यांत आल्या त्यापुढील प्रमाणे.

1) **Sickness** :- No excuses based on sickness are acceptable to Chinmaya Mission Study Centres. We will no longer accept your doctors certificate, as proof of illness since we firmly believe that if you are able to go to doctor for consultation, you are surely fit to

come to our classes. If you received the medical certificate through a phone call or through an agent, please send us the doctors name and address along with your apology for your absense.

2) **Death (Other than your own)** :- Death of friends or relations can not be a sufficiently valid reason as it is then too late to do anything for those concerned. We are sure some one else can take care of the necessary arrangement. You may be so kind as to come to the study classes and let us pray for the departed. This will be more fitting service to the beloved one who has left than your following the food sheath (physical Body) to the cremation ground.

3) **Death (Your own)** :- This will be accepted as a very reasonable and valid excuse but we would like to have at least a week notice to check whether you have paid all dues and subscriptions. You who are group leaders should give a week's notice and during that week train another member of the group of take up your work.

4) **Interruptions** :- During the study classes we would like to discourage people from running to the bathroom to often. We shall in further decide to go to the washroom in alphabetical order for instance those whose names start with 'A' will go in the first he minutes and so on. If you are unable to go at your appointment time it will be necessary for you to wait until the next study session when your turn will surely come round.

स्वामी चिन्मयानंदांचे जेष्ठ शिष्य व प्रस्तुत प्रकल्पाचे मार्गदर्शक स्वामी पुरूषोत्तमानंद सरस्वती ह्यांनी त्यांच्या शिस्तीबाबत आठवण नमुद करून ठेवली आहे ती अशी

की, ''गुरुदेवांच्या ठिकाणी आईचे प्रेम व पित्याची कडक शिस्त यांचा सुरेख संगम होता. अभ्यासाच्या बाबतीत ते विद्यार्थ्यांचा यथायोग्य समाचार घेत असत. एकदा मुंडकोपनिषदातील शिष्याने गुरुला विचारले प्रश्न विद्यार्थ्याला सांगता येईना, म्हणून त्यांनी त्या शिष्याला आश्रमातून हाकलून दिले आपले भक्त व शिष्य ह्यांच्याबाबत भावनात्मक दृष्टीपेक्षा त्यांची शिस्त जास्त आग्रही होती. निरनिराळ्या विद्यार्थ्यांच्या योग्यतेप्रमाणे ह्यांची शिस्त असे. विद्यार्थ्यांनी सुधारावे हाच त्यांचा त्यामागील उद्देश होता. मातेच्या प्रेमळपणा बरोबर पित्याची कठोर शिस्त हा त्यांच्या व्यक्तिमत्वाचा सुंदर पैलु होता''. शिस्त ही त्यांची अतिशय आवडती गोष्ट, परंतु आपली शिस्त दुसऱ्यावर किती लादावी याची मर्यादा काय ? त्यावर त्यांचे उत्तर असे की, ''तुम्ही जेव्हा इतर लोकांशी संबंध ठेवता तेव्हा आपल्या हृदयाचा उपयोग करा पण स्वत:च्या बाबतीत मात्र आपले डोके वापरा'' शिस्तीबाबतचा त्यांचा हा दृष्टिकोन स्वयंशिस्तीकडे नेणारा होता असेच म्हणावे लागेल.

## धर्मपारायण गुरुदेव :-

गुरुदेवांच्या व्यक्तिमत्वाचा हा अविभाज्य घटक आहे. सर्वसामान्य लोकांना जेव्हा संस्कृती निरस वाटत होती, धर्म संकल्पना मोडकळीस आल्या होत्या त्यावेळेस त्यांनी संस्कृतीचा आशय सामान्यांला पटवून दिला. हिन्दु धर्म हा व्यापक आहे, पण हिन्दुधर्माचे अविचारी अभ्यासक व अप्रबुध्द अनुयायी चुकीचा अर्थ लावल्यामुळे हिन्दु धर्माचे पवित्र ज्ञान प्रदुषित झाले आहे. आणि जेव्हा एखादी पिढी स्वत:च्या संस्कृतीमधील जे सर्वात चांगले असते त्या विषयी भावनिक धास्ती किंवा बौध्दिक तिरस्कार बाळगुन लागते तेव्हा बहुजन समाजाच्या मनामधून ही निरर्थक भिती काढुन टाकल्याशिवाय पुनरुत्थान होऊ शकत नाही असे त्यांचे परखड मत होते. ह्यासाठी त्यांनी धर्म प्रचाराचे कार्य हाती घेतले. माणूस जर धर्मापर्यंत पोहोचत नसेल तर आता धर्मानेच माणसापर्यंत पोहचायला हवे आणि त्यासाठी त्यांनी स्वत:चे संपूर्ण आयुष्य समर्पित केले. आपल्या संस्कृतीचा घात करण्यास टपलेल्यांनी हिन्दु पारंपारिक विचार धारेत जाणूनबुजून घुसविलेलया उपद्रवी गैर समजुतीमुळे हे उदात्त हिन्दु तत्वज्ञान विकृत झाले आहे. जगातील सर्व धर्मांमध्ये हिन्दु धर्म हा एकच धर्म असा आहे की सर्वसमावेशक आहे, पण आजही हिन्दुंची अवस्था पाहून त्यांचे मन विदीर्ण होत असे आणि हिन्दु संघटनेची स्थापना

करण्याबाबत त्यांनी पुढाकार घेतला व त्यांच्या पुढाकाराने विश्व हिन्दु परिषदेची स्थापना झाली. आज आपले राष्ट्र धर्मनिरपेक्ष राष्ट्र म्हणून घोषीत झाले, स्वामीजी म्हणतात, "हिन्दुंनी आपल्या संस्कृतीचे थडगे जे उघडे केले आहे ते शाश्वत धर्माच्या याच विपर्यास्त आचार पध्दतीच्या कुदळीने राष्ट्र म्हणून सुध्दा जर आपणाजवळ स्पष्टपणे अधर्मी म्हणून घेण्याचे निर्दय पशुसम धैर्य असते तर कदाचित आपण भौतिक जीवनात तरी अधिक चांगले झालो असतो. धड धर्माच्या मार्गावरून चालण्याचे अध्यात्मिक धैर्य आपल्याजवळ नाही, ना धड अधर्मी होण्याचे प्रबळ धैर्य ही अधर्मासारखा धर्म व धर्मासारखा अधर्म असे दोन निरनिराळे आदर्श जगण्याच्या आपत्तीचा खेळ आपण खेळत आहोत''. हे धर्माबाबतचे भीषण वास्तवच त्यांची मांडले. तेच मुळात देशाचे अध्यात्मीक मूल्यांचे, सांस्कृतीचे पुनरूज्जीवन हे होते. आपल्या प्राचीन संस्कृतीची पताका त्यांना जगभर न्यायची होती. ते खऱ्या अर्थाने हिन्दुत्वाच्या पुनरूत्थापनाचे प्रचारक होते. त्यांनी "हिन्दुत्वाची'' जी परिभाषा केली त्यामुळे हिन्दुत्वाकडे हिन्दुधर्माकडे पाहण्याचा एक नवा दृष्टिकोन तरूणांना मिळाला. शास्त्रीय दृष्टिकोन मिळाला, वेदांताच्या त्यांच्या शिकवणुकीमुळे भारतीय समाजाला आपल्या समृध्द संस्कृतीची किंमत समजली. आधुनिक समजल्या जाणाऱ्या तथाकथित सुशिक्षीतांना त्यांनी धर्माचा आशय लक्षात आणून दिला. हिन्दु धर्म हा विश्वधर्म कसा आहे हे त्यांनी पटवून दिले, हिंन्दुंचा स्वाभिमान त्यांनी जागृत केला.

देवळे, मशिदी, धार्मिक संस्था, मिशन मठ, पाठशाळा यामध्ये धर्म पाहण्याची मानवांची वृत्ती झाली आहे. परीणामी समाजात अनेक जातीय दंगली, धार्मिक विद्वेष वाढतो. त्यातून धार्मिक युध्दे होतात व मानवतेचा अपमान होते. एवढेच नाही तर ह्याबाबी घडल्यानंतर हे सर्व घडण्यासाठी धर्मच जबाबदार आहे ही भावना लोकांच्या मनामध्ये निर्माण होते. ह्यातून असा सरसकट निष्कर्ष काढला जातो की मानवतेवर जो आघात होतो आहे तो धर्मामुळे होतो आहे. समाजाने स्विकारलेली धर्माबाबतची ही भूमिका स्वामजींना मान्य नव्हती. धर्म संकल्पना टिकुन आहे, ह्याचे कारणच असे आहे की ह्या धर्मात काहीतरी बहुमोल असे आहे आणि हेच बहुमोल काय हे जाणून घेतल्या शिवाय धर्म संकलपना खऱ्या अर्थाने समजणार नाही. म्हणून धर्मात नेमका काय सांगीतले आहे हे जाणून घेतले पाहिजे. स्वामीजी प्रश्न करतात, "काळाच्या ओघात कुठल्या परकीय विचारांनी आधुनिक पिढीला झाकुन टाकलय की ज्यामुळे आज आपण

किंवा आपल्यापैकी काही जण ह्याचा तिरस्कार करू लागलो ?'' ह्याची कारण मिमांसा त्यांनी अशी केली की ह्या धर्म संकल्पनांच्या कार्यवाहीतच वाईट प्रवृत्ती आपणास काढाव्या लागतील. आज आपण समाजात पाहतो नवनवीन दवाखान्यामध्ये वाढ होत आहे, त्याचप्रमाणे नवनवीन रोगांची संख्या, रूग्णांची संख्याही वाढते आहे. आजही मानवजात ही रोगमुक्त झाली नाही, म्हणून रूग्णालयेच निरूपयोगी आहे असे म्हणणे वास्तवाला धरून होणार नाही. तद्वतच धर्म ही पण एक संख्या आहे, गुरुदेव म्हणतात ह्या धर्माचे रूपांतर पंथात होते, मग तिचा पंथ झाला की त्यातील सगळा चांगुलपणा विकृत होत जातो. ''धर्माचे रूपांतर पंथात होणे ही धर्माबाबतची विकृत कार्यवाही आहे'' आज मानव आपल्या उच्च मूल्यांची तडजोड करतो, परिणामी त्याला मूल्यामधील उदात्तता व पावित्र्यच नाहीसे होते. ही तडजोड जेव्हा अनेक काळपर्यंत सुरू राहते तेव्हा सर्वत्र वैचारिक गोंधळ माजतो व हाच गोंधळ समाजाला घातक ठरतो.  आज ही समाजामध्ये नितीमूल्यांची घसरण झाली आहे अशी ओरड ऐकायला येते तेव्हा तो ह्या तडजोडीचा परिणाम आहे. परंतु ''यदा यदा ही धर्मस्य ग्लानीर्भवती भारत'' हे धर्माचे अभिवचन आहे. जेव्हा जेव्हा धर्माला ग्लानी आली तेव्हा तेव्हा ज्ञानी जनांनी संस्कृतीचे पुन:नुतनीकरण केले आहे. ही परंपरा अगदी १९ व्या शकतकात स्वामी विवेकानंदापर्यंत सुरू राहीली. ह्या परंपरेतील सर्व ज्ञानीजनांनी वैश्विकतेचीच शिकवण दिली. हिन्दु धर्माचा खरा अर्थ जेवढा स्वामी चिन्मयानंदांनी व्यापकतेने मांडला तेवढा व्यापकता समजुन घेण्यासाठी आपल्यालाही आपली दृष्टी व्यापक बनवावी लागते. स्वामीजी म्हणतात, ''या जगाच्या मैदानात जिथे उपनिषदांनी, ऋषींनी सांगीतलेली सत्य तत्वे तंतोतंत पाळली जातात, त्यालाच ह्या देशात धर्म म्हणतात.  आपल्या हिन्दुत्वात अनेक धर्म आहेत, अनेक धर्माच्या मिळून एक धर्म बनला आहे व त्यांना एकत्रित पणे सर्वसाधारण हिन्दुत्व असे म्हणतात. हिन्दु हा शब्द जातीयतेच्या अर्थाने उल्लेखलेला नसून वैश्विक भुमिकेतून वापरला आहे. जे कोणी जीवनाच्या उदात्त आणि नैतिक मूल्यांना मान देतो आणि त्याचा आदर करतो, स्वत:मधील पशुत्व नष्ट करून आंतरिक ईश्वराचे   अधिपत्य पुन्हा प्राप्त करण्याचे जीवनकार्य मानतो अशी महत्वकांक्षा असणारी सर्व माणसे हिन्दु होत. हिन्दु धर्माच्या ह्या महासंघातून एकेक भाग वेगवेगळ्या ऐतिहासिक काळात अनुयायांच्या खास मागण्यातून वेगवेगळा होत गेला''. हिन्दुत्वाची ही संकल्पना सर्व समावेशक आहे आणि ह्याच दृष्टिकोनातून हिन्दुत्व हे वैश्विक व व्यापक ठरते. कारण जगातील प्रत्येक

ऋषींचा विचार म्हणजे हिन्दुत्व आहे. मग ते आचार्य असो, गौतम बुध्द असो, नानकजी असो हे सर्वांना जेव्हा मानवजात ऋषी म्हणून मान्यता देते, द्रष्टे म्हणून मान्यता देते, तेव्हाच ती हिन्दुत्वालाही स्विकारत असते. आज धर्म संकल्पनामध्ये शिरलेल्या गैरसमजुती म्हणजे मूळ वृक्षावरील बांडगुळे आहे व ही बांडगुळे आपण काढायला पाहीजे असा सल्लाही गुरुदेव देतात. मानवी मूल्ये आपल्याला जोपासायला हवीतच पण त्याच सोबत त्या विचारामध्ये काही चुकीच्या संकल्पना शिरल्या असतील तर त्यांना काढून टाकून धर्म वाढविला पाहीजे. आधुनिक विज्ञानाने मानवातील मानवत्व हिरावून घेतले, ह्यांचे ह्याबाबत गुरुदेव खेद व्यक्त करतात. आधुनिक मानव हा वैज्ञानिक उत्क्रांतीने तर धास्तावला आहेच, पण त्याच बरोबर अनेक सामाजिक, राजकीय, नैसर्गिक आपत्तीने तो घेरला आहे व सतत तणावाच्या स्थीतीत तो वावरत आहे. पण ह्या ठिकाणी एका भीषण वास्तवाकडे स्वामीजी सर्वांचे लक्ष वेधु इच्छितात की ''शास्त्र आणि विज्ञानाने आपल्याला सुविधा दिल्या असतील तर त्यांनी अत्यंत गंभीर राजकीय, सामाजिक व मानसिक समाजही आपल्यासमोर उभा केला आहे''. ही वास्तवता नाकारता येत नाही कारण आज आम्ही भौतिक क्रांती भरपूर साधली आहे पण आमचे आयुष्य दु:ख व वेदनेनी व्यापले आहे, अनेक वैज्ञानिक शोध लागले, क्रांती झाली, पण मार्गदर्शनाची आवश्यक नाही असे म्हणायचे कां ? आणि अशी जर मार्गदर्शनाची आवश्यकता असेल तर ती केवळ धर्मातूनच पूर्ण होऊ शकते. धर्म संकल्पनेवर आजवर आक्षेप घेतला गेला व आजही घेतला जातो की धर्माचा उगम हा भयातून झाला आहे. गुरुदेवांनी टिकाकाराचे हे मत खोडून काढले आहे, ते म्हणतात, ''प्रगतीच्या पथावर उडी मारण्यासाठी भयाची काडी वापरण्यास काही गैर नाही'', ह्या अखिल सृष्टीच्या निर्मितीला जबाबदार कोण ? माझे या जगाशी नाते काय ? जग कोणी निर्माण केले ? ह्या प्रश्नातून काही जण ह्या निष्कर्षापर्यंत आले की ह्या सर्वांनाच काही शक्तीशाली ईश्वर रूप तत्व ह्याचे अधिष्ठान असावे. समजा हा प्रश्न त्यांनी जगताबाबत उपस्थीत केला नसला तरी तो स्वत:बाबत उपस्थीत केला असता. मी येथे का आलो ? मला कोणी निर्माण केले ? मी सुखी आनंदी कसा होऊ शकेल ? अशा प्रश्नांच्या उत्तरातून जे निष्पन्न होते त्यालाच आध्यात्मिक तत्व म्हणतात. ''उपनिषदाच्या भाषेत ह्यालाच मूल्ये म्हणतात''. हे शुध्द ततवज्ञान सामाजिक परिस्थीतीला लावले की तो धर्म बनतो आणि ह्या शुध्द तत्वज्ञानाचा जीवनात वापर केला तर ते धार्मिक नियम बनतात. धर्माबाबतचा हा सकारात्मक दृष्टिकोन

आहे, पण ह्या दृष्टिकोनात अतिशय लवचिकता आहे. ह्या धर्मावरून जेव्हा जेव्हा जगात युध्दे झालीत तेव्हा तेव्हा समाजाने धर्म टाकाऊ समजला, पण स्वामीजी परखडपणे सवाल करतात की जेव्हा आर्थिक बाबीमुळे अथवा राजकीय बाबीमुळे जगात युध्द झालीत ते अर्थकारण अथवा राजकारण कुचकामी टाकाउ मानण्यांत आले कां ? पण जेव्हा जेव्हा धर्माला टाकाउ समजण्यांत येते तेव्हा तेव्हा धर्माची जागा अन्य गोष्टींनी घेतली आहे, मग ही जागा सत्ताधाऱ्यांनी देखील घेतली आहे. पूर्वी ईश्वराची भीती वाटायची आता सत्ताधाऱ्यांची भिती मानवाला वाटते. पण धर्माला दुसरा पयार्य ठरू शकत नाही. कारण त्यामुळे मानवी वर्तनात एकजीनसी पणा घेऊ शकणार नाही, तर त्यात व्यक्तीनिष्ठता निर्माण होऊन द्वेषाची भावना व सर्वात महत्वाचे म्हणजे अतिशय गोंधळ वाढेल ही बाब स्वामीजींनी जाणली होती आणि म्हणूनच मानवी मूल्यांचे वैश्विक परिणाम म्हणजे धर्म आहे हे त्यांनी ठामपणे सांगितले. कारण धर्मामुळेच मानवाची दृष्टी विशाल व व्यापक होते. ''वसुधैव कुटुंम्बकम'' ही भावना त्यांच्या ठिकाणी निर्माण होते. कारण वैश्विकतेची भावना लोकांमध्ये रूजवायची असेल तर मानवाने सर्वप्रथम विशाल आदर्शाशी एकरूप व्हायला हवे. आजच्या जागतिकीकरणाच्या ह्या काळात गुरुदेवांचे हे विचार अतिशय उपयुक्त ठरतील. आज आपण वैश्विक खेड्याची संकल्पना मान्य केली, वैश्विकरणाला मान्यता दिली, पण मानवाचे हृदय आपण विशाल व्यापक बनवु शकलो कां ? ज्यांनी ज्यांनी वैश्विकतेची आधुनिक संकल्पना मांडली व शिक्षणाच्या माध्यमातून ती रूजविण्याचा प्रयत्न केला त्यांच्यासाठी मार्गदर्शक असणारे मत स्वामीजींनी मांडले ते पुढीलप्रमाणे, ''वैश्विक एकात्मता व बंधुभावना याची कल्पना मी कशी रूजविणार ? मग त्या करिता मला विशाल आदर्शाशी एकरूप व्हायला नको कां ? मी जेव्हा माझ्या घराशी किंवा जातीशी व देशाची एकजीव होतो तेव्हाच मी दुसऱ्या देशाशी, घराशी व जातीशी यांच्याशी मी संघर्ष करून त्यांचा नाश करण्यास उद्युक्त होतो. पण समजा त्याऐवजी मी जर अमर्याद अधिक भव्य आशा अनंत सत्यतत्वाशी मिसळून गेलो की हे विश्व ज्याचे अभिव्यक्ती आहे अशा तत्वांशी तर मग अशा माझ्या विशाल भव्य दृष्टिकोनातून मी सर्व प्राणीमात्रावर प्रेम करू शकेल, नव्हे सर्व विश्वालाच प्रेमाने घेऊ शकेन''. गुरुदेवांचे हे विधान आधुनिक शिक्षण शास्त्रातील Four pillers of Education मध्ये Learning to be व Learning to live together ह्या तत्वाशी जुळणारे आहे. धर्मातून सहअस्तीत्वाची भावना येतो व एका अत्युच्च

पातळीवर आत्मिक दृष्टिकोन येऊन भेदाभेद नाहिसा होतो व सर्वांभूती परमेश्वर ही भावना दृढ होते. हीच वैश्विक समन्वयाची भावना आहे. वैश्विक समन्वयाचा पाया धर्म, पण हाच धर्म जेव्हा ''माझा धर्म, माझा धर्मगुरु, माझा धर्मग्रंथ'' ह्या संकल्पनेत अडकतो तेव्हा धर्माचा खरा आशय संपतो व त्या ठिकाणी सुरू होतो तो धर्मविद्वेष व नंतर मग समाजाचे विघटन व्हायला सुरूवात होते. समाजात ताणतणाव निर्माण होतात, समाजात धर्माच्या नावावर विध्वंस होतो पण त्याचवेळी जर अंतिम चैतन्याचे एकमेव अद्वितीय तत्वाचे जर आकलन झाले तर ही बाब घडणार नाही. हा धर्मवेडेपणा का वाढला, याचे उत्तर स्वामीजी फार परखडपण देतात. समस्या तेव्हाच निर्माण झाली जेव्हा राजकीय मंडळींनी धर्मात लुडबुड करायला सुरूवात केली. आजवर धार्मिक युध्दे झाली ती योग्य धर्माची राजकारणाशी सांगड असंस्कृतपणे घातल्यामुळे झाली, राजकारणी जेव्हा धर्मात शिरले तेव्हा त्यांनी त्याच्य बरोबर त्यांच्या आकांक्षा आणि मतभेद आणले, पुरातन भारतात जेव्हा धार्मिक मंडळी राजकारणात पडली तेव्हा त्यांना राजगुरु म्हणून राजकारणात प्रवेश करावा लागला आणि तेव्हा सुध्दा त्यांनी देशादेशातील तंट्यात मध्यस्थी करून ते मिळवण्याचे आटोकाट प्रयत्न केले. त्यामुळे देशात शांती, सौख्य, उत्कर्ष नांदु लागले. जेव्हा राजकारणींना राजगुरुंची अडचण वाटायला लागली, तेव्हा त्यांनाही राजकारणातून काढून टाकण्यांत आले'' धर्म हा राजकारणात शिरायला हवा होता तसे न होता पण धर्मात राजकारण शिरले, नव्हे धर्माचेच राजकारण झाले. ह्याबाबत गुरुदेवांनी खंत होतीच आज खऱ्या अर्थाने धर्माची संपूर्ण जगाला आवश्यकता आज जगात सर्वत्र अनाचार, अत्याचार माजलेला आहे तो धर्मामुळे नाही तर वैयक्तीक दुर्बलतेचे ते कारण होय. धर्म हा जीवनाच्या कणाकणात भरला आहे. धर्माच्या नावाने आज समाजात जे आढळते तो खऱ्या अर्थाने धर्म नाही. गुरुदेव म्हणतात, ''आपल्या बुध्दीवान पुर्वजांनी धर्मात वेळोवेळी बदल केला म्हणूनच आजही आपल्या देशाकडे उच्च अध्यात्मिक संस्कृतीचा वारसा जपणारा देश म्हणून पाहिले जाते''. भारत हा लोकशाही प्रधान देश आहे, हिन्दुत्व ही भारताची ओळख आहे, पण आधुनिक भारतीय लोकशाही हिन्दुत्वाबाबत काय विचारधारा असेल ह्याबाबत ते म्हणतात, ''आधुनिक भारतीय लोकशाही पध्दतीने मते घेऊन ठरवतील की आपल्या धर्म नको आणि आध्यात्मिक संस्कृतीही नको, आम्हाला निधर्मी संस्कृती हवी तर हिन्दुत्व ह्या विचारांचे स्वागतच करेल हाच तर आपल्या संस्कृतीचा मोठेपणा आहे. कारण आपली संस्कृती लोकसत्ता मान्य करणारी आहे,

इतकेच नव्हे तर समाजाच्या कल्याणासाठी स्वत:चा नाश करण्याचा आत्मघातकीपणा मान्य करण्या इतका हिन्दु धर्म उदार व विशाल आहे'', हिन्दुत्वाची व हिन्दु धर्माची इतकी व्यापक संकल्पना मनाला थक्क करून जाते व हिन्दुत्वाप्रती आपण नतमस्तक होतो.

असे हिन्दुत्वाचे मूर्तीमंत रूप असणारे प. पु. स्वामी चिन्मयानंदांना अमेरिकेतील सुप्रसिध्द मासिकाने "Hinduism Today" ने सन्माननीय हिन्दु पुनरूज्जीवन पारितोषीक व "Hindu of the year" अशी पदवी देऊन बहुमान केला. ही पदवी अशा व्यक्तीस दिली जाते जी जगभरातील हिन्दुवर जास्तीत जास्त प्रभाव टाकते. ऑगस्ट १९९३ मध्ये स्वामजींना "Global Vision - 2000" ह्या पुरस्काराने सन्मानीत करण्यांत येणार होते. सप्टेंबर १९९३ मध्ये विश्वधार्मिक लोकसभेमध्ये विश्वस्तरीय हिन्दुत्वाचे प्रतिनिधत्व करणाऱ्या हिन्दुधर्मीय प्रतिनिधींचे ते अध्यक्ष म्हणून निवडले गेले होते. विश्वधर्म परिषदेस संबोधीत करण्यासाठी त्यांना आमंत्रित करण्यांत आले होते. भारताच्या जीवनात पुनश्च १०० वर्षानंतर स्वामी विवेकानंदांच्या भाषणानंतर हा आनंदाचा क्षण आला होता, पण तत्पुर्वी ३ ऑगस्ट १९९३ मध्ये गुरुदेवांची महासमाधी झाली.

धर्म हा शब्द असा आहे की त्यास इंग्रजीत तत्सम शब्द नाही, Righteousness हे भाषांतर अत्यंत घाई गर्दीत केलेले भाषांतर आहे. परंपरेने धर्म म्हणजे सदाचरण होय. तथापी धर्म ह्या शब्दाचा जो आशय आहे त्या अर्थाचे ओझे वाहून नेण्यास तो शब्द अगदीच अपुरा आहे. जो सर्वत्र लागु होण्याच्या दृष्टीने सर्व ठिकाणी सर्व काही चांगली असतात. अशी जीवनाची मूलभुत मूल्ये म्हणजे धर्म होय. नैतिक सुसज्जतेचा सर्व प्रयत्नांचा आणि नैतिक परिपूर्णतेच्या सर्व प्रसादांच्या जो भक्कम पाया तो धर्म. पूर्णतेला पोहोचलेल्या मानवी प्रतिष्ठेने जगु पाहणाऱ्या आणि या जन्मी माणूस म्हणून अत्युच्च पातळीपर्यंत विकसीत होण्यासाठी सतत झटणाऱ्या प्रत्येक मानवाची शाश्वत कर्तव्ये म्हणजे धर्म. Law of being अस्तीत्वाचा नियम म्हणजे धर्म, हिन्दु धर्माची बांधणी कर्तव्यावर केली आहे, हक्कावर नाही. युरोपीय विचार पध्दती हक्कावरच्या तत्वावर घडविली गेली आहे. ते हक्क आपणावरच उलटणारी अस्त्रे, बंदुकीच्या गोळ्या आणि तोफेचे गोळे ह्या मधुन वाढत आजच्या काळापर्यंत पोहोचले आहेत. आता एकाचे हक्क ते दुसऱ्याच्या हक्का विरूध्द मागण्यासाठी आणि टिकविण्यासाठी ते

एकमेकास अण्वस्त्रांनी आणि एकमेकांचा शिरच्छेद करणाऱ्या गुप्त शस्त्रांनी धमकावीत हक्काची मागणी करित आहेत. हक्क हे घ्यावयाचे असतात, मिळवायचे असतात जी संस्कृती हक्कावर आधारीत असते ती निश्चितपणे आरडाओरडा झगडा यांच्याकडेच वाटचाल करणार आणि मिळविणे, साठविणे, राखणे, जपणूक करणे, ह्या प्रवृत्ती समाजात जोपासल्या जाणारच. परिणामी समाजातील शांततेचा भंग हा होणारच, पण हिन्दुचा सनातन धर्म हा स्वत:चे कर्तव्य कर्म करणे ह्या त्याच्या हक्काला जीवनातील मुलभूत विशेषाधिकार समजतो, कर्तव्य हे व्यक्तिमध्ये संचय लोभ किंवा राखण्याची चिंता ही वाढविण्यापेक्षा देण्याची वृत्ती दानधर्माची दुर्दम्य इच्छा जोपासते, "ह्या अर्थाने आज ही प्रचलीत मानवाधिकार संकल्पना युनोने मांडली त्या ऐवजी जर 'मानवाचा विशेषाधिकार' ही संकल्पना मांडली असती तर भारतीय समाज नव्हे जागतीक मानव हा कर्तव्याच्या बाबतीत सजग झाला असता व मानवाधिकाराच्या नावावर आज मानवाच्या अधिकाराचाच बळी जातो आहे ते घडले नसते''.

वरिल विवेचनावरून त्यांच्या व्यक्तिमत्वाची आपणास कल्पना येते, पण त्यांच्या कार्याची ओळख ही त्यांनी स्थापन केलेल्या चिन्मय मिशनच्या कार्यावरून त्यांचा खरा परिचय आपणास आढळतो तो पुढील प्रमाणे.

# चिन्मय मिशन

## घोषवाक्य

***To provide of individuals from any background.***

***The wisdom of Vedanta and practical means for***

***spiritual growth and happiness enabling them***

***to become positive contributors to society.***

# PLEDGE

***We***
***stand***
***as one***
***family,***
***bound to***
***each other***
***with love***
***and respect.  We serve as an army,***
***courageous and disciplined, ever ready to flight***
***against all low tendencies and false***
***values, within and without us. We live***
***honestly the noble life of sacrifice and***
***service, producing more than what we***
***consume and***
***giving more***
***than what***
***we take. We***
***seek the***
***Lord's***
***grace, to***
***keep us on***
***the path of***
***virtue, courage***
***and wisdom. May***
***they grace and***
***blessings flow***
***through us to***
***the world***
***around us.  We***
***belive that***
***the service of***
***our Country is the***
***service of the Lord or Lords, and devotion***
***of the people is the devotion to the Supreme***
***self.  We know our responsibilities;***
***Gives us the ability and courage to fulfil them.***

**OM TAT SAT**

हरि ओम्



My justification is only with

I am essentially his servent

I am entirely his to be used as he likes best.

## Lamp of Truth

Mission member

Wherever they are

in whatever condition

their life's work is

to discuss and impart.

The secret essence of Vedanta

By yourself a "Sandeepany"

one who lights the lamp of truth

in the heart of all.


## SAFFRON OM FLAG

**Fire of Knowledge**



Sound with which creation of this universe Began.

## Chinmaya Mission Motto



# चिन्मय मिशन

चिन्मय मिशन ही संघटना नाही, तर ती एक चळवळ आहे. ज्याप्रमाणे संघटनेची ध्येय अनेक असतात, Many project one goal. पण चिन्मय मिशनच्या बाबतीत असे आगळेवेगळे रूप आहे. संघटनेची आवश्यकता कां आहे ह्याबाबत गुरुदेवांचे मत अतिशय परखड होते. ते म्हणतात, "What we want is an organization without organization neither industry nor commerce nor culture nor any activity in the world can succeed today.  When I pay my attention to relegion, I find those relegions that are organized have a study in the world see Christianity! How beautifully they are organised.  I look at Islam ! Even Buddhists all over the far east are well organised.  Our relegion also has to gain organisational beauty".

चिन्मय मिशनची स्थापना झाल्यावर आज त्याचा विस्तार झालेला आपणास आढळतो. हा विस्तार कसा झाला हे पुढील विवेचनावरून लक्षात येते.

## चिन्मय सांदीपनी साधनालय :-

महर्षि सांदीपनी ह्यांनी गुरुकुलांची स्थापना करून अनेक वर्षापूर्वी आध्यात्मिक ज्ञानाचा प्रसार केला.  त्यांच्या अनेक शिष्यांपैकी भगवान श्रीकृष्ण ही होते.  ज्यांनी गीतेच्या माध्यमातून वेदांताचे ज्ञानाचा प्रसार केला.  स्वामीजींचे एक स्वप्न होते, वेदांताचा अभ्यास करू शकतील व वेदांताच्या प्रसार व प्रचार कार्याकरिता त्यांना खऱ्या ज्ञानप्रेमी लोकांना घडवायचे होते व अध्यात्म ज्ञानाची ही गंगा प्रसारीत वाहनी ठेवायची होती आणि म्हणूनच स्वामीजींनी सांदीपनी हे नांव निवडले.  सांदीपनी स्थापन करून स्वामीजींच्या अनेक भक्तांनी सढळ हातांनी देणगीच्या स्वरूपात मदत करून त्यांचे स्वप्न पूर्णत्वास नेले.

१. सांदीपनी (विस्ट), कॅलीफोर्निया

२. सांदीपनी हिमालय, सिध्दबारी, हिमाचल प्रदेश

३. सांदीपनी तामीळनाडु, काईम्बतूर

४. सांदीपनी कनार्टक, बंगलोर

५. सांदपनी आंध्रप्रदेश, चिकोट्टा

६. सांदीपनी प्रयोग, अलाहाबाद

७. सांदीपनी केरळ, कसारगॉड

८. सांदीपनी महाराष्ट्र, कोल्हापूर

वरील प्रमाणे वेदांत प्रशिक्षणाची केंद्र ही भारतात व विदेशातही तयार झाल्याने त्याचा थोडक्यात इतिहास पुढीलप्रमाणे आहे.

## १) सांदीपनी साधनालय, पवई, मुंबई :-

स्वामीजींनी सांदीपनी स्थापनेचा मनोदय व्यक्त केला आणि श्रीमती तारा स्वरूप ह्यांनी पवई येथील आपल्या १४ एकर जागेपैकी अधी जागा देण्याचे कबुल केले. Tara Cultural Trsut च्या त्या Managing Trusty आहेत. तीन एकर जागा त्यांनी सर्वप्रथम देवु केली, स्वामीजींनी त्या जागेवर सांदीपनी साधनालयाच्या निर्मितीची परवानगी दिली. काही वर्षांनी पुन्हा ८ एकर जागा मिळाली व एकूण सात एकराच्या परिसरात आज सांदीपनी साधनालय कार्यरत आहे. चेन्नईच्या चिन्मय मिशन सदस्यांनी वेदांत प्रशिक्षण संस्थेचे Rule व Regulations बनविले आणि Hail Renaissance Volume 1957 मध्ये प्रसिध्द केले. त्यागी ह्या नियतकालीकामध्ये स्वत: स्वामीजींने डोनेशन बद्दल आवाहन केले.

१९६३ तपोवन दिवस, त्याच दिवशी सांदीपनी साधनालयाचे उद्घाटन झाले. वेदांत कोर्ससाठी अनेक अर्ज प्राप्त झाले, स्वामीजींनी स्वत: त्या अर्जांची छापनी केली व केवळ ६० अर्जांची निवड केल. ह्या सर्वांचे आचार्य म्हणून स्वत: स्वामीजींनी पहीले व्याख्यान दिले. १९९३ ते २००० ह्या काळात ११ बॅचेस मधून वेदांत कोर्स जवळपास ३८५ विद्यार्थ्यांनी पूर्ण केला व ह्या ठिकाणी स्वामी चिन्मयानंद, स्वामी दयानंद, ब्रम्हचारी स्वरूप चैतन्य, स्वामी तेजोमयानंद, स्वामी पुरूषोत्तमानंद, स्वामी चिदानंद, स्वामी अनुभवानंद ह्यांनी आचार्य म्हणून कार्य केले.

**धर्मसेवक कोर्स :-**

स्वामीजींनी १९९१ मध्ये धर्मसेवक कोर्स सांदीपनी साधनालय, पवई येथे सुरू केला. हा अभ्यासक्रम होता व ह्यात एकुण ४० जण सहभागी झाले होते. भारतीय वेदांत तत्वज्ञानाचा समावेश ह्यात करण्यांत आला होता, हा Lower Dharmasevak Course होता. त्यानंतर Higher Dharmasevak Course सुध्दा सुरू करण्यांत आला. ह्या अभ्यासक्रमाचा संस्कृत हा अनिवार्य भाग होता.

**२) सांदीपनी पश्चिम (१९७९) :-**

वेदांत कोर्सच्या संदर्भात स्थापन झालेली ही द्वितीय संस्था आहे. ही संस्था १९७९ मध्ये स्थापन करण्यांत आली. निसर्गाचे सौंदर्य भरभरून लाभलेले हे सदन सॅनफ्रॅन्सीस्को पासून २०० मैल अंतरावर आहे.

कृष्णालय हे आठ एकर परिसरात बहरले आहे. कृष्णालय हे चिन्मय पश्चीमचे मुख्यालय आहे, ह्या ठिकाणी बालविहार युवा केंद्र, निवासी शिबीर इ. उपक्रमाचे आयोजन करण्यांत येते.

**३) सांदीपनी हिमालय (१९८१) :-**

भारतात सुरू करण्यात आलेल्या वेदांत कोर्सच्या संदर्भात ही दुसरी संस्था आहे. विविध प्रादेशिक भाषामधुन वेदांताचे शिक्षण मिळावे हे गुरुदेवांचे व्हीजन ह्या संस्थेच्या माध्यमातून यशस्वी झाले. राष्ट्रभाषेत ह्या ठिकाणी वेदांताचे शिक्षण दिले जाते. प्राथमिक काळात येथे आचार्य म्हणून व विवेक चैतन्य जे आज स्वामी तेजोमयानंद आहे त्यांनी सेवा दिली. २५ व २६ एप्रिल, १९८१ मध्ये सांदीपन हिमालय ह्याचे उदघाटन झाले. प.पू.गुरुदेवांचे स्वप्न पूर्ण झाले कारण पुन्हा हिमालयात येऊन वेदांत शिकविण्याबाबत त्यांच्या गुरुंनी त्यांना १९५१ मध्येच सांगीतले होते. १९८१ ते २००१ ह्या काळात ह्या वेदांत प्रशिक्षण संस्थेतून ७ बॅचेस प्रशिक्षित झाल्यात व एकुण ७० प्रशिक्षणार्थी ह्यातून बाहेर पडले जे आज प्रचार कार्य करित आहेत. ह्या ठिकाणी ह्या सात बॅचेस मध्ये ब्र. विवेक चैतन्य, ब्र. निर्वाण चैतन्य, ब्र. विशाल चैतन्य, ब्र. सुमित्रा चैतन्य, स्वामी सुबोधानंद ह्यांनी आचार्यपद सांभाळले.

## ४) सांदीपनी आंध्र प्रदेश १९८२ :-

सुरवातीच्या काळात सांदीपनी आंध्र प्रदेशचे कार्य हे अनौपचारिकरित्या झाले. औपचारिक दृष्ट्या ह्याचे उद्घाटन झाले नाही. निवडक ब्रम्हचारी व ब्रम्हचारीणी ह्यांना स्वामीजी शारदाप्रीयानंद ह्यांनी शिकविण्यास प्रारंभ केला होता. हे प्रशिक्षण इंग्रजी व तेलगु भाषेत देण्यांत येत होते. येथे शैक्षणिक पात्रतेचे बंधन नव्हते, ह्या ठिकाणी धर्मवीर कोर्स ही आयोजीत करण्यांत येतो. वेदांतावर आधारीत हा ११ महिन्यांचा कोर्स असे सर्वसामान्य गृहस्थाला प्रचार कार्य करता यावे म्हणून प्रशिक्षणाचे आयोजन होते. आजवर ५४ लोकांनी हा धर्मसेवक कोर्स पूर्ण केला आहे. आजवर एकूण (१९८२ ते २००१) ३० लोकांनी हा कोर्स पूर्ण केला आहे.

## ५) सांदीपनी प्रयाग १९८५ :-

१४ एप्रिल १९८५ ला ह्या सांदीपनीचे विधीवत उद्घाटन झाले. ह्या ठिकाणी पहीले आचार्य म्हणून ब्र. विशाल चैतन्य यांनी (स्वामी सुबोधानंद) पदभार सांभाळला. एकूण सात विद्यार्थ्यांनी ह्या प्रशिक्षणासाठी प्रवेश घेतला. १९८७ मध्ये ही बॅच संपली त्यानंतर वेदांत प्रशिक्षण वर्ग येथे झाला नाही.

## ६) सांदीपनी तामीळनाडु १९८८ :-

संपूर्ण भारतातील साधकांना सांदीपनीत येता यावे हे गुरुदेवांचे स्वप्न होते ते १९८८ मध्ये ह्यास प्रारंभ झाले. येथील शिक्षणाचे माध्यम इंग्रजी ठरविण्यांत आले व ब्र. आत्मचैतन्य यांचेकडे येथील आचार्यपद देण्यांत आले. काही काळ साधनालय हे कोइम्बतुर हून चेन्नईला हलविण्यांत आले, पण २००० मध्ये पुनश्च कोइम्बतुर येथे कार्य सुरू झाले. ब्र. आत्मचैतन्य, ब्र. धर्मेश चैतन्य, ब्र. प्रवीण चैतन्य, ब्र. संहिता चैतन्य, स्वामी श्रीधरानंद ह्यांनी आचार्यपद भूषविले आहे.

## ७) सांदीपनी केरळ १९८८ :-

१६ फेब्रुवारी १९८८ रोजी सांदीपनी केरळ ह्याचा प्रारंभ कासारागोड येथे करण्यांत आला. सांदीपनीचा परिसर सात एकर एवढा आहे. ह्याच ठिकाणी चिन्मय विद्यालयही

कार्यरत आहे. स्वामी बोधानंद व ब्र. आत्मचैतन्य यांनी आचार्यपद भुषविले आहे.

## ८) सांदीपनी कर्नाटक १९८८ :-

सांदीपनी कनार्टकचे शिक्षणाचे माध्यम हे कन्नड आहे. प्रादेशिक भाषेमध्ये वेदांताचे प्रशिक्षण देण्यात गुरुदेवांची खुपच दूरदृष्टी लक्षात येते. प्रादेशिक भाषेचे महत्व व बोलणाऱ्यांची संख्या विचारात घेतो सर्व सामान्यांपर्यंत वेदांताचे ज्ञान पोहोचविणे ही गुरुदेवांची दृष्टी होती. या संस्थेचे नांव चिन्मय सांदीपनी ठेवण्यांत आले. दिनबंधु देवाश्रनम, बंगलोर ह्याच्या Premises मध्ये सर्वप्रथम ह्याची सुरूवात करण्यांत आली. १० मे १९८२ मध्ये ह्याची सुरूवात झाली. स्वामीजींच्या पुढील वाक्यावरून त्यांचा प्रत्येक प्रांतात सांदीपनी उघडण्यामागील ध्येय लक्षात येतो.

## ९) सांदीपनी महाराष्ट्र :-

स्वामी चिन्मयानंदांच्या महासमाधीनंतर सांदीपनी महाराष्ट्र हा प्रकल्प उभा झाला व महाराष्ट्रात मराठी भाषेतून वेदांत शिकविण्यासाठी ह्या प्रकल्पाची योजना आहे. कोल्हापुर जवळ टोप संभापूर येथे हा प्रकल्प उभारण्यांत आला आहे. ह्या वेदांत संस्थेत प्रस्तुत प्रकल्पाचे मार्गदर्शक प.पू. पुरुषोत्तमानंद सरस्वती हे प्रमुख आचार्य असून तेथे वेदांताचा अभ्यासक्रम प्रारंभ झालेला आहे.

## चिन्मय चळवळ :-

पं. पू. स्वामी चिन्मयानंद ह्यांनी लावलेले चिन्मय रोपाचे आज विशाल वटवृक्षात रूपांतर झाले आहे व आज ह्या वृक्षाच्या छायेत मानवता विसावली आहे. ह्या वृक्षाला अनेक फाद्या तर फुटल्याच पण त्यासोबत त्या फाद्यांच्या पारंब्यांनी सुध्दा आज चांगले मूळ धरले आहे व संपूर्ण विश्वात आज ह्याचे रूपांतर चिन्मय चळवळीत झाले आहे. ह्यातील काही उपक्रम पुढील प्रमाणे :-

१) **सांदीपनी** :- अध्यात्मिक ज्ञानाचा प्रचार व प्रसार करण्यासाठी व त्यासाठी प्रचारक घडविण्यासाठी चिन्मय सांदीपनीची स्थापना ही चळवळीची सुरूवात आहे. सांदीपनीनी आतापर्यंत ५४० ऋषीपूत्र घडविले आहे. ह्या सर्व सांदीपनीचा इतिहास यापुर्वी देण्यांत आला आहे. सांदीपनीतून वेदांत प्रशिक्षण घेतलेले अनेक स्वामीजी, स्वामीनी, ब्रम्हचारी व ब्रम्हचारीणी ह्या जगभर वेदांत प्रचाराचे व प्रसाराचे कार्य करित आहे.

२) **चिन्मय विद्यालय** :- स्वामी चिन्मयानंद म्हणतात, "You can train a young plant to grow straight but you can not straighten a tree children are the architects of the future world and builders of nation, we should adopt a methodical approach to foster their innate talents and top their spiritual potential". लहान मुलांचा वर्ग हा स्वामीजींनी निवडला होता आणि ते आपल्या कार्यकर्त्यांना "catch them young" ह्या शब्दात आव्हान करित असत. लहान मुलांवर त्यांचे अतिशय प्रेम होते व ह्या प्रेमातून १९५० मध्ये बालविहार ह्या उपक्रमास प्रारंभ झाला व ह्या उपक्रमाच्या प्रेरणेतूनच १९६५ मध्ये पहीली चिन्मय नर्सरी स्कुलची स्थापना केरळ प्रांतात Kollengeole ह्या ठिकाणी झाली. ह्या शाळेचे नेतृत्व सेवानिवृत्त प्राचार्या पंकजम्मा यांचेकडे सोपविण्यांत आले. १९६८ मध्ये स्वामीजींनी त्यांना संन्यास दिक्षा देऊन त्यांचे नामाभिधान स्वामीनी विद्यानंदा असे ठेवले. ह्या चिन्मय मिशनच्या पहिल्या स्वामीनी होत. Spark शाळा स्थापने मागील स्वामजींचे ध्येय होते "To import the latest secular education as well as inculcates moral values and the typically Hindu Philosophy of Life". त्यानंतर चिन्मय विद्यालयाची वाढ झाली, त्याची आकडेवारी पुढील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| विद्यालये | - | ७२ |
| महाविद्यालये | - | ०८ |
| उच्च माध्यमिक शाळा | - | २० |
| माध्यमिक शाळा | - | २३ |
| प्राथमिक शाळा | - | २९ |
| हरिहर शाळा | - | १ |
| आंतरराष्ट्रीय विद्यालय | - | १ |

वरीलपैकी बरीच विद्यालये ही C.B.S.E. शी संलग्नीत आहेत. काही I.C.S.E. शी संलग्नीत आहेत. Indian Council of Secondary Education व इतर ह्या राज्यातील शिक्षण मंडळाशी संलग्नीत आहे. चिन्मय विद्यालयाची यादी परिशिष्टात जोडण्यात आली आहे.

## चिन्मय विद्यालयाची उद्दिष्ट्ये पुढील प्रमाणे आहेत.

1) To prepare the students to live their lives fully and succenfully by imparting them the vision of life.

2) To instill in the students the spirit of service in all walk of life and become responsible citizen of future.

3) To make the students capable of facing challenges of the life efficiently and curve out their own future.

4) To provide a balanced and school oriented programm by in corporating progressive techniques, learing theories and methodologies.

5) To provide a conductive environment to team and live the right values and appreciate the glory of our culture.

चिन्मय शिक्षण चळवळ ही चिन्मय मिशनचे एक महत्वपूर्ण योगदान आहे. चिन्मय विद्यालयाचे कामकाज हे Chinmaya Education Cell च्या माध्यमातून चालते. स्वामी चिन्मयानंद हे visionary होते. ते म्हणत, "Children are the cream of our generation and are the rulers and makers of tommorrow upon them depends the futhre of our nation. I am sure that the Chinmaya Education Movement will serve as a spiritual work shop to mould and march out the new generation of men and women who will grow to have great moral stature and ethical beauty". सध्या चिन्मय विद्यालयातून ५०००० विद्यार्थी शिक्षण घेत आहे.

**Moto of school - keep smilling**

**Vision - Inner transformation of individual resulting in a happy world arround them.**

स्वामी चिन्मयानंद शिक्षणाच्या संदर्भात म्हणतात, "Dont just invest on the child also invest in the child true education is Investment on complemented with Investment in the child education is not only a load of information but also the light of transformation".

चिन्मय विद्यालय हे इतर विद्यालयापेक्षा निश्चित निराळे आहे, "Chinmaya Vidyalayas - School with difference" ह्या लेखात चिन्मय मिशनचे विश्वगुरु प. पू. स्वामी तेजोमयानंद लिहतात. "The student are our greatest wealth, they are the assets of the society and the nation the future citizen who will mould the world. So we invest our time money and effort to nourish and guide children Chinmaya Mission is the boulding these schools and other educational institutions to impart not only a academic knowledge but also values and ideals that will remain with the students through out their lives. Valuables are short lived but values are permanent. When we say "Chinmaya Vidyalaya is a school with difference, we mean that our Vidalayas do not merely emphasis on academics but also enable students to adopt to various situation in life through our Chinmaya Vision Programm one should be able to use the knowledge not only for material gains but to serve people and purify ones mind. (Tapovan Prasad, Sept. 2007). प. पू. स्वामी तेजोमयानंदांच्या ह्या वरिल विवेचनावरून चिन्मय विद्यालयाचे वेगळेपण आपल्या लक्षात येते. चिन्मय विद्यालयाची स्वतंत्र कार्यनिती तयार करण्यांत आली आहे व ह्या कार्य नितीचे पालन करणे सर्व चिन्मय विद्यालयांना बंधनकारक आहे. ह्यासाठी Central Chinmaya Mission Mumbai च्या वतीने Guideline बनविण्यांत आल्या आहेत. ह्या गाईड लाईनच्या प्रथम पृष्ठावर गुरुदेवांचे vision देण्यांत आले आहे.

The children of today are citizens of tommorrow to mould their thoughts and aspirations in the true fulfillment of education.

Try to create in them self confidence to serve and act rightly incheerfulness. Generate in them true affection in all their contacts. Inculcate in them some personal decipline and the true spirit of leadership.

प्रस्तुत गाईडलाईन ह्या अतिशय परिपूर्ण असून त्यानुसार सर्व चिन्मय विद्यालयाचे कार्य सुरू आहे. ह्या गाईडलाईन मध्ये पुढील विषयास अनुसरून मार्गदर्शक तत्वे देण्यांत आले आहेत.

1) Management of the Vidyalaya.
2) Classification minimum qualification for recruitment.
3) Vacation and administrative matters.
4) Service record and miscellaneous matter.
5) Leave rules.
6) Accounting procedure fees and funds.
7) Disciplinary control.
8) Provident fund, Calm liberalised pension scheme.
9) Admission, Award and assessment.
10) Examination system.
11) House system and its conduct.
12) Code of conduct for teachers and other employers.
13) School community relationship.
14) Student participation.
15) Leadership Training.
16) Vidyalaya Publication.

विद्यालयाकरीता चिन्मय मिशनच्या स्वामीनी विमलानंदा यांनी Chinmaya Vision Program तयार केला असून परमपूज्य गुरुदेवांच्या व्हीजनवर आधारीत हा कार्यक्रम आहे. ह्या कार्यक्रमातून बालकांच्या शारीरिक, मानसिक, बौध्दिक, आध्यात्मिक विकासावर भर

दिला आहे. ह्या अभ्यासाचे चार स्तर आहेत.

१) बालकाचा एकात्मिक विकास (Integrated Development of Child)

२) सांस्कृतीक विकास (Cultural development)

३) देशभक्ती (Patriotism)

४) वैश्विक दृष्टिकोन

ह्या संपूर्ण कार्यक्रमाकरिता आणि Teachers Training करिता एक Manual तयार करण्यांत आले आहे. ह्या कार्यक्रमांतर्गत पालकांचेही सहकार्य घेण्यात येते. चिन्मय शैक्षणिक चळवळीत लाखो विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनाचे कल्याण केले. आज जवळपास ५०००० विद्यार्थी चिन्मय विद्यालयातून शिकत आहेत. एवढेच नाही तर चिन्मय विद्यालयात शिकणाऱ्या आर्थिक दृष्टीने कमकुवत घटकांना C.E.C.S. (Chinmaya Education Cell Scholarship) देण्यांत येते.

**Chinmaya International Residential School :-**

जगभरातील विद्यार्थींना संस्कृतीचे शिक्षण मिळावे ह्यासाठी जून १९९६ मध्ये कोइम्बतूर येथे चिन्मय आंतरराष्ट्रीय निवासी शाळेची स्थापना करण्यांत आली. स्वामजींचे शिक्षणाबाबतचे जे व्हिजन होते ते म्हणजे 'Education means the ability to see the whole world in orison working together a Macrocosmic vision' त्यांनी पूर्णत्वास आणले. ह्या संस्थेच्या स्थापनेला गुरुदेवांनी संदेश दिला, त्यात त्यांनी असे म्हटले आहे की, Those who have gone abroad with their family try to contribute there Indian way of life with the life style of there adopted contries. आपल्या संदेशात त्यांनी पालकांना आपल्याला आपल्या पाल्याला पाठवण्याबाबत आव्हान केले आहे.

चिन्मय आंतरराष्ट्रीय विद्यालयाचे जे व्हिजन गुरुदेवांनी ठरवले ते त्याच्यात शब्दात पुढील प्रमाणे - 'The purpose of education is the overall unfolding a gentle blosiming of the child of the physical, emotional, intelactual, spiritual level of his/her personality through education complement academic excelence with character and personility development.

शाळेमध्ये मूल्यशिक्षणासाठी CVP programme चा अवलंब केला जातो. या शाळेची मूल्य व्यवस्था प. पु. गुरुदेवांनी खालील प्रमाणे सांगीतली आहे. ही मूल्य व्यवस्था म्हणजे एक मूल्य समूह आहे आणि गाभाभूत मूल्य म्हणून शाळेने स्विकारणे बंधनकारक आहे.

1) Placing the interest of the student first.

2) Best of quality in everything.

3) Preating people with respect and dignity.

4) Highest stnadard for integrity.

5) Fierce spride in once country.

6) Thanking the lord for all that he has given us.

"ज्ञान सेवाच: कौशल्यम:" हे शाळेचे घोषवाक्य आहे आणि शाळेचे बोधचिन्ह अतिशय उदबोधक आहे. शाळेच्या अभ्यासक्रमात आध्यात्मिक अभ्यासक्रमाचा समावेश करण्यांत आला आहे. ग्रेड ५, ६, ७ करीता संताची जीवन कथा सार्थ दैनंदिन प्रार्थना, गीता परिचय, तुलसी रामायण. गेड १०, ११, १२ करीता चिन्मय मिशन प्रतिज्ञा, I love you letter भागवत गीता.

प्रस्तुत शाळा ही CBSC शी संलग्न असून I.B.O. (International Baccacalaureate Geneva) यांच्याशी संलग्नीत आहे. यातील ग्रेड ११ आणि १२ हे उच्च शिक्षणाशी निगडीत आहे.

**Chinmaya Institute of Technology Konnum (Approved by AICTE) :-**

प्रस्तुत शैक्षणिक संस्थेची स्थापना १६ डिसेंबर, २००२ मध्ये स्वामी तेजोमयानंद यांच्या हस्ते करण्यांत आली. ह्या संस्थेकरीता गुरुदेवांचे व्हिजन पुढीलप्रमाणे -

1) You will be among the top self supporting professional education institute with globel impact and strong local commetment.

2) Our practices will make us one of the most fought after institute.

3) Our student who will be future professional shall in culcate the best business practices.

ह्या संस्थेची गाभातून मूल्य पुढील प्रमाणे ठरविण्यांत आली आहे.

1) Social responsibility
2) Learning
3) Achieving
4) Caring
5) Sharing

# चिन्मय मिशन व विविध प्रकल्प

१. चिन्मय विभुती प्रकल्प

२. चिन्मय तपोवन, केरळ

३. चिन्मय अरण्यम: आंध्र प्रदेश

४. सेन्ट्रल चिन्मय वानप्रस्थ संस्था

५. पितामह सदन

६. चिन्मय मिशन हॉस्पीटल

**Chinmaya Institute of Management :-**

गुरुदेवांना बऱ्याच मॅनेजमेंट इन्स्टीट्युट मध्ये व्याख्यानाकरिता आमंत्रित करण्यांत येत होते. तेव्हाच त्यांच्या मनात Management Institute चे स्वप्न होते. ही संस्था व्यवस्थापन शास्त्राासाठी तर आहेच पण भारतीय वेदांताची सुध्दा दृष्टी ह्या अभ्यासक्रमात घेण्यात आली आहे. ह्या ठिकाणी विविध कार्यक्रम घेतली जातात जशी, Executive development workshop for corporation and colleges, Seminars, Guest lecture, Research publication इ. उपक्रम ह्या संस्थेत घेण्यांत येतात.

**Chinmaya International Foundation :-**

एप्रिल १९८९ मध्ये C.I.F. ची स्थापना झाली. चिन्मय चळवळीचा हा अतिशय महत्वाचा टप्पा आहे. सि.आय.एफ. चे उद्घाटन १९९० मध्ये झाले, हे आंतरराष्ट्रीय स्तरावरील संशोधन केंद्र आहे. वेदांत व संस्कृतचा अभ्यास हे कलेचे अभ्यास विषय आहे. The CIF is geared to function as a bridge between spiritually and science. ज्या ठिकाणी सि.आय.एफ.ची स्थापना झाली ते आदी शंकराचार्यांचे जन्मस्थान आहे. सि.आय.एफ. बाबत प.पू.गुरुदेव म्हणतात, "Let the CIF grow up as a national institute of Hindu Culture, gearing up to embrace the entire humanity in love and with great concern for their welfare".

सि.आय.एफ. हा विज्ञान व अध्यात्म ह्यांना जोडणारा पूल आहे. संस्थेच्या ग्रंथालयात ग्रंथसंपदा १०००० इतकी आहे. संगणकाची सोय येथे उपलब्ध आहे. संशोधन कार्याकरीता येणाऱ्या साधकाकरिता तेथे निवासाचीही व्यवस्था आहे.

**चिन्मय सेवा प्रकल्प :-**

चिन्मय मिशनच्या घोष वाक्यास अनुसरून चिन्मय मिशनचे कार्य अव्याहत सुरू आहे. त्यातीलच एक भाग म्हणजे विविध चिन्मय सेवा प्रकल्प होत. त्यातील प्रकल्प पुढीप्रमाणे -

१. **चिन्मयारण्यम्, आंध्र प्रदेश :-** स्वामीनी शारदा प्रीयानंदां या चिन्मयारण्यमच्या संस्थापिका आहेत. हा प्रकल्प आंध्रप्रदेशातील Ellayapalle ह्या ग्रामीण भागात स्थापन झाला आहे. जवळपास १७ दानशुर व्यक्तींनी २४ एकर जमीन ह्या प्रकल्पाकरीता दिली. ह्या आश्रमाच्या स्थापने मागे गुरुदेवांचे व्हिजन असे की, "This Ashram would be a new type of Ashram where the poor and needy would be served with love and affection. It would set an example to the whole country to show how village uplift had to be done. प. पू. शारदा प्रीयानंदांनी ह्या गरीब लोकांची सेवा तर केलीच पण त्यांना सुसंस्कारीत केले, त्यांचे जीवनमान उंचावले, अध्यात्मिक ज्ञानावर सुध्दा लक्ष केंद्रीत करण्यांत आले.

१९८२ मध्ये सत्यकाम मंदिर २ मुलांनी सुरू करण्यांत आले, सध्या जवळपास १०९ मुले मुली आहेत.

२. **हरिहर स्कुल :-** १९८६ मध्ये २६ विद्यार्थ्यांसह हरीहर स्कुल स्थापन करण्यांत आली. गरीब घराण्यातील मुलांना येथे ग्रेड १ ते ७ पर्यंत शिक्षण देण्यांत येते. त्या ठिकाणी त्यांना दिवसाचे जेवण व दुध देण्यात येते. सध्या ह्या शाळामधील विद्यार्थ्यांची संख्या वाढते आहे. माध्यमिक शाळेचे शिक्षणही येथे देण्यांत येते. चिन्मयारण्यम् प्रकल्पातच Hospital ची सुध्दा उभारणी झाली आहे. १९९० मध्ये ह्या हॉस्पिटलला सुरूवात झाली. १९९७ मध्ये चिन्मयारण्यम ने ग्रामीण पुर्नरचना कार्यक्रमही हाती घेतला होता. समाजाचा आर्थिक आणि सामाजिक इतिहास बदलविण्याचे सामर्थ्य चिन्मय मिशन कार्यात आहे हे पटवून देणारा हा प्रकल्प आहे. चिन्मयारण्यम

ह्या प्रकल्पांतर्गत तीन आश्रम आहेत. ते म्हणजे - Chinmaya Sarda Tapovanam, Chinmaya Yoga Ashram आणि गीता आश्रम ही सर्व आश्रम आध्यात्मिक ज्ञानदानाचे कार्य करित आहेत.

### ३. पितामह सदन आणि सेन्ट्रल चिन्मय वानप्रस्थ संस्थान :-

ह्या प्रकल्पाचा उद्देश आहे, To provide a quaite life to senior citizen. हे केंद्र सेवा संघांना Tamaraipakkam, Struvani, Ellayapalle, कोल्हापुर, अलाहाबाद, सिध्दबारी ह्या ठिकाणी आहे. Home away from the home असे ह्याचे स्वरूप आहे. गृहस्थाश्रमींना वानप्रस्थाश्रमात प्रवेश करण्यासाठी सक्षम ह्या ठिकाणी बनविण्यांत येते. ह्या करिता विविध प्रशिक्षण वर्गाचे आयोजनही करण्यांत येते.

### ४. चिन्मय मिशन हॉस्पीटल :-

१९६० मध्ये बंगलोर येथे काही भक्तांनी झोपडपट्टी भागात एक खोली घेऊन तेथे साप्ताहिक दवाखान्यास प्रारंभ केला. हीच चिन्मय हॉस्पीटलची सुरूवात होती. सध्या ह्या हॉस्पीटल मध्ये २०० रूग्णांची व्यवस्था असून विविध सुविधा उपलब्ध आहे. ह्या हॉस्पीटलचे ऑब्जेक्टीव्ह आहे "Imidiate human patient care at affordable cost".

### ५. चिन्मय इंन्स्टीट्युट ऑफ नर्सिंग :-

चिन्मय हॉस्पीटलला सेवाभावी नर्स उपलब्ध व्हाव्यात ह्या उदात्त ध्येयास अनुसरून १९८६ मध्ये ह्या संस्थेची स्थापना झाली. ह्या इंन्स्टीट्युटला Karnataka Nursing Council ची मान्यता आहे. हा तीन वर्षाचा अभ्यासक्रम आहे. संस्थेचे घोषवाक्य ''जनसेवा हिच जनार्दन सेवा'' हे आहे. ह्या ठिकाणी भारतीय तत्वज्ञान, गीता तत्वज्ञान व व्यक्तिमत्व विकासाचेही वर्ग घेण्यांत येतात.

### ६. चिन्मय डायग्नोस्टीक आणि रिसर्च सेंटर :-

हे केंद्र कलकत्या पासून दूर बसवरिया येथे आहे. ह्या ठिकाणी एक्सरे, सोनोग्राफी, पॅथॉलॉजी सर्व सुविधा उपलब्ध आहे. त्यामुळे ग्रामीण विभागातील व्यक्तीला कलकत्याला यावे लागत नाही.

### ७.	चिन्मय डायग्नोस्टिक सेंटर ॲन्ड क्लिनीक :-

हे क्लिनिक मुंबई, चेंबुर येथे आहे. ह्या ठिकाणी देखील वरील प्रमाणेच सर्व सुविधा उपलब्ध असून हे C.C.M.T. च्या नियंत्रणात आहे.

### ८.	चिन्मय रूरल केअर आणि ट्रेनिंग सेंटर :-

तपोवन ट्रस्ट अंतर्गत येणारी ही संस्था आहे. १९८५ साली ह्या केंद्राच्या कार्यास प्रारंभ झाला. ग्रामीण भागात मुलभुत आरोग्य सेवा पुरविणे हे ह्या केंद्राचे ध्येय आहे. २७८ खेड्यापर्यंत यांचे कार्याची व्याप्ती वाढली असून जवळपास १५०००० जनता ह्याचा फायदा दरवर्षी घेऊ शकते. महिलांचे सक्षमीकरण व सर्वकष एकात्मीक विकास हे संस्थेचे ध्येय आहे. विविध उपक्रमांच्या माध्यमातून महिला सशक्तीकरण, पर्यावरण कार्यक्रम राबविण्यात येतात.

### ९.	चिन्मय सेवा सेंटर :-

सिध्दबारीला ह्या केंद्राची स्थापना करण्यांत आली. पहाडी भागात घटस्फोट ही सर्वसामान्य बाब आहे. अशावेळी स्त्रीयांची समाजात पिळवणुक होते, अशा स्त्रीयांना सक्षम बनविण्यासाठी हा उपक्रम हाती घेण्यांत आला. केंद्राचे तीन सेंटर्स आहेत. 1) Sewing Centre, 2) Carpet making section, 3) The weaving section.

### १०.	Chinmaya Human Research and Development Institute :-

रानीपत, सिक्कीम येथे हे केंद्र आहे. ह्याचा प्रारंभ १९८८ मध्ये झाला. ग्रामीण कल्याणार्थ हे केंद्र कार्यरत आहे. स्त्री सबलीकरण व युवकांना सक्षम करण्यासाठी ह्या केंद्रात शिक्षण प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यांत येतात.

### ११.	Seva - Inc.

वॉशिंग्टन येथे ह्या केंद्राचे कार्य आहे. १९८३ मध्ये या केंद्राची स्थापना झाली, शैक्षणिक स्कॉलरशिप ह्या संस्थेच्या माध्यमातून देण्यांत येते.

**चिन्मय मिशन उपक्रम :-**

प. पू. गुरुदेव स्वामी चिन्मयानंद द्रष्टे होते, तसेच ते उत्कृष्ट शिक्षक होते. प्रत्येक वयात मानवाच्या मनाची बुध्दीची घडण ही वेगवेगळी असते, पण ह्या मन आणि बुध्दिच्या घडणीनुसार मानवाची संस्कार यंत्रणा कशी असावी ह्याबाबत गुरुदेवांचा अभ्यास अतिशय सूक्ष्म होता हे त्यांनी सुरू केलेल्या उपक्रमावरून लक्षात येते.

**१. बालविहार :-**

"आपली मुले आपले भवितव्य'' ह्या विषयावर गुरुदेवांचे १९८७ साली मुंबई येथे व्याख्यान झाले. ह्या व्याख्यानात त्यांनी बालकांबद्दलचा दृष्टिकोन व्यक्त केला. त्यावरून केवळ बालकांबाबतचाच त्यांना दृष्टिकोन कळतो असे नाही तर बालक शिक्षणाबाबतही त्यांचा दृष्टिकोन लक्षात येतो. ते म्हणतात "आजच्या मुलांचे दृष्टिकोन जीवनमूल्ये त्यांच्या कल्पना, ध्येय केंद्रे, आणि आदर्श यांना उत्तम आकार व घडण दिली तर आपल्या सध्याच्या अपेक्षानुसार अधिक चांगले सुसंघटीत व आदर्श असे जग निर्माण होईल. आजचे मुले हेच आपले भवितव्य आहे हे जाणून आताच कसून प्रयत्न करायला हवे. भवितव्य उज्वल होण्यासाठी आपण आपल्या मुलांना विचारी बनवले पाहिजे. ह्यावरून लक्षात येते की आजची असणारी बालके हे उद्याचे भविष्य असल्याने त्यांना योग्य सुसंस्कार देण्याची आवश्यकता आहे व ह्याच दृष्टिकोनातून गुरुदेवांनी बालविहार प्रारंभ केला''. March of Future ह्या त्यांच्या व्याख्यानत बालविहारांची जी ध्येय आहेत ती पुढील प्रमाणे.

1) To train the children and indullate in them the reverence for our ancient culture and inspire them to live up to it with correct understanding.

2) To create self confidence to serve and act cheerfully.

3) To generate a true affection in all contacts, inculcate personal discipline and a true spirit of leadership.

4) To mould their capacity to express and asert their individuality.

5) To bring out their dormant faculties and detect defects, cultivate and improve their creative abilities.

6) To help children to develop a healthy resistance against temptation in the atmosphere in which they grow.

7) To provide an atmosphere to grow with noble ideals, healthy emotions and physical discipline.

वरील उद्दिष्ट्ये डोळ्यासमोर जऊन १९६५ मध्ये बालविहारास प्रारंभ झाला, आज देशभरात, जगभरात अनेक बालविहार सुरू आहेत. बालविहार मधुन खालील बाबींचा विकास करण्यांत येते. Good conduct, emotional refinement, intellectual finesse and spiritual awareness. हा बालविहार चिन्मय मिशनच्या सेवक-सेविका घेतात. ह्यासाठी काही बालविहारा मध्ये उपक्रमही घेण्यांत येतात. बालक हा समाजाचा संवेदनशील घटक बनविण्यास जबाबदार घटक बनविण्यात त्याला सहकार्य करण्यांत येते. गुरुदेवांच्या मते ज्याप्रमाणे इमारतीसाठी मजबुत विटांची गरज आहे त्याचप्रमाणे समाज घडविण्यासाठी व्यक्तिची आवश्यकता आहे आणि म्हणूनच ते म्हणतात "Catch them young" हा बालविहार घेण्याची एक पध्दती आहे. आज जगभर अनेक बालविहार वर्ग सुरू आहेत व अनेक बालक संस्कार ग्रहण करित आहेत.

## चिन्मय युवा केंद्र :-

चिन्मय युवा केंद्राच्या स्थापने मागे गुरुदेवांचे जे व्हीजन होते ते म्हणजे, "To create an atmosphere of study for the youth whereby they are exposed to the highest truths of vedantas and at the same time they are able to exibit this knowledge as excellence and perfection in their interaction with the external world. चिन्मय युवा केंद्राच्या माध्यमातून गुरुदेवांना युवकांची अध्यात्मिक सेना बनवायची होती. १९७५ मध्ये गुरुदेवांनी काही तरूणांना बंगलोर येथे एकत्र केले व त्यांचे ९ दिवसांचे सत्र घेतले व ह्यानंतर मात्र युवकांचे संघटन करण्याचा त्यांचा विचार पक्का झाला

व ब्र. हरिदास चैतन्य ह्यांना चिन्मय युवा केंद्राचे सचिव म्हणून कार्य देण्यांत आले. "Spirituality in action" ह्यावर गुरुदेवांचा भर होता. ह्यालाच त्यांनी "Dynamic spirituality" हे नाव दिले आहे. भारतीय तत्वज्ञानच केवळ अभ्यास महत्वाचा नाही तर त्याचे दैनंदीन जीवनात अभिव्यक्ती महत्वाची आहे. आज अशा प्रकारच्या Dynamism ची आवश्यकता आहे. आपल्या देशाचा विकास करून त्याचे रूपांतर राष्ट्रात करावे व ही जबाबदारी युवकांचीच आहे असे त्यांचे मत होते. युवा केंद्राच्या स्थापने मागील त्यांचा उद्देश जसा अध्यात्मिक राष्ट्र होता तसाच तो सामाजिकही होता. युवकांनी उच्च जीवन मूल्यांचाच अंगीकार करावा ह्यावर त्यांचा भर होता.

युवाशक्तीवर त्यांचा प्रचंड विश्वास होता. ते म्हणतात, "Youth must look ahead, youth alone can dare to look ahead. The old will tend to look back and live in memories. The youth is everfull of aspiration hopes plans to build a new world to fit in their demands in life". आपण भुतकाळातील ज्ञान वर्तमानात गोळा करायला हवे, त्याला वर्तमानानुसार घडवायला हवे व त्याची भविष्यासाठी सुंदर रचना करायला हवी हा त्यांचा दृष्टिकोन होता. इतर संघटनापेक्षा चिन्मय युवा केंद्रा बाबतची त्यांची संकल्पना ही निराळी होती.

चिन्मय युवा केंद्रे महाराष्ट्रात खालील ठिकाणी आहेत.

| | | | |
|---|---|---|---|
| १. औरंगाबाद | २. कोल्हापूर | ३. मुंबई | ४. डोंबविली |
| ५. मुलुंड | ६. नागपूर | ७. पिंपरी चिंचवड | |
| ८. पुणे | ९. ठाणे | १०. वाडेगांव रसाई | |

युवा केंद्रा मार्फत आजपर्यंत अनेक सामाजिक, शैक्षणिक आध्यात्मिक उपक्रम राबविण्यांत आले आहे. त्याचप्रमाणे दरवर्षी अखील भारतीय युवा परिषदेचे आयोजनही करण्यांत येत असते. महाराष्ट्रातील युवा केंद्रांतर्गत पुढील कार्यक्रम राबविण्यांत आले आहेत.

1) Blood donation camps

2) Visiting orphanges

3) Personality development camps

4) Public speaking course

5) Sevak sadhana saptah

6) Abhanga darshan

7) Chinmaya Katha

8) Youth camps

9) View of education

10) Puls Polio

11) Shraven sadhana on Bhagwat Geeta

12) Chinmaya Youth Festival

13) Petriotic song compition

14) Disha - Carrier counselling projects

15) Camp on -

a) Mind your mind b) Self unfoldment

c) total self d) achieving excellence in exams

16) Drama - Yugapurusha

17) Projects on "My city is Beautiful and awakening of national consciousness among people

18) Parikrama - Interschool cultural program

19) The art of Man making quize contest

20) Talks

21) Chinmaya Vyakhyan Mala

22) One act play

23) Saints of Maharashtra

24) Indian classical dance compitation

25) Special coaching classes for 10th passed students.

वरील कार्यक्रम फक्त उदा. दाखल देण्यांत आले आहे, वरिल शिक्षकांतर्गत अनेक कार्यक्रम राबविण्यांत आले व राबविण्यांत येत आहेत. ह्या व्यतिरीक्त अनेक कॉन्फरन्सेस १६ युवा केंद्राच्या झाल्या आहेत.

**चिन्मय अभ्यासवर्ग :-**

अभ्यासवर्गाच्या तीन Disciplin आहेत. 1) Self study, 2) entightened discussion, 3) reflection on the knowledge gain in the class. अर्थात स्वयंअध्ययन त्यावरील चर्चा व त्याचे आचरण असा हा उपक्रम आहे. अभ्यासवर्गाचे आयोजनाबाबत एक मार्गदर्शक पुस्तीकाही बनविण्यांत आली आहे. स्वामी दयानंद म्हणतात, "Study group help you to provide opportunities for reflections.

प्रस्तुत अभ्यासाची योजना स्वामीजींनी दूरदृष्टीने आखली आहे. हे अभ्यासवर्ग म्हणजे व्याख्यान सत्र नाही जेथे केवळ एकजण बोलतो व बाकी केवळ श्रवण करतात, तर अभ्यासवर्गातील सर्वच सदस्य ह्या वर्गात सारखाच भाग घेतात. पाठ्यपुस्तकातील नेमून दिलेल्या भागाचा सदस्य व्यक्तीशः आठवड्यातून एकदा सर्वत्र एकत्र जमतात, अभ्यासवर्गात एक अभ्यासू व्यक्ती अशी असते की जी ह्या अभ्यासवर्गाच्या कार्यात सुसंवाद निर्माण करते. स्वामी चिन्मयानंदांनी अधीकृतरित्या मान्यता दिलेलया एक वर्षाच्या पत्रव्यवहारा द्वारा अभ्यासक्रमाच्या चिन्मय अभ्यासक्रमाच्या संयुक्त अभ्यासासाठी सुध्दा अभ्यासवर्ग काढण्यांत आलेले आहे. ह्या पत्रव्यवहाराच्या द्वारा अभ्यासाच्या काळात थेट सांदीपनी साधनालयाशी थेट पत्रव्यवहार सुरू ठेवला जातो. प्रश्नोत्तर पत्रिका ह्या गुरुकुल आश्रमाकडे तपासण्यासाठी पाठविल्या जातात. हे अभ्यासवर्ग १९६३ मध्येच सुरू करण्यांत आले, आज जगभर हे वर्ग सुरू आहेत.

नवीन काळात संगणकाच्या युगात सध्या E-Vedanta Course सुध्दा सुरू करण्यांत आला आहे. अभ्यासवर्गाच्या उपयुक्ततेबद्दल गुरुदेव म्हणतात, "Once you have

gained discriminative knowledge run away from the study groups, Apply it to your life and realise the state of truth in yourself". पं. पू. स्वामी चिन्मयानंदांनी ह्याबाबत अभ्यासयोजना सुचविली होती. ह्यात काळानुसार बदल करण्यांत आले व त्याची विभाजन खालील प्रमाणे करण्यांत आले आहे.

### Part 1 : Basic scheme of Study

| For group study | For self study | For Video viewing |
|---|---|---|
| Kindle life Bhaj Govindam | Vedanta through | विवेक चुडामणी |
| Tativa Bodha letters | मन:शोधनम | साधना पंचकम् पुरूषसुक्तम |
| उपनिषदसार नारद भक्तीसुत्र | ध्यान आणि जीवन गीता १-२ | ज्ञानसागर केनोपनिषद |
| गीता ३ ते ६ | ध्यान स्वरूपम | कैवल्या उपनिषद |
| गीता ७ ते ९ | इशावस्य उपनिषद | गीता अध्याय १० ते १२ |
| भक्तीसुध्दा गीता १३ ते १५ | मुंडकोपनिषद गीता १६ ते १८ | सददर्शन |

### Part 2 : Advance study scheme

| | | |
|---|---|---|
| १) योग वशिष्ट | २) अद्वैत मकरंद | ३) ऐतरेय उपनिषद |
| ४) दक्षिणामूर्ती स्तोत्र | ५) कठोपनिषद | ६) प्रश्नोपनिषद |
| ७) तैतरिय उपनिषद | ८) मांडुक्य उपनिषद | |

### Part 3 : CHYK study group

| | Senior CHYK | Junior CHYK | Self study |
|---|---|---|---|
| 1) | Self unfoldment | Art of Living | Hindu |
| 2) | Art of man making | हनुमान चालीसा | Culture |
| 3) | We must | Art of God Symboling | |
| 4) | विभिषण गीता | I love you | |
| 5) | साधना पंचकर्म | Game of life | |
| 6) | Right thinking | | |

**चिन्मय देवी ग्रुप :-**

महिलांसाठी ह्या उपक्रमाची योजना आहे. स्त्रीचे मातेचे रूप महत्वाचे आहे, कारण मातृशक्ती समाजात जागृत असेल तरच संस्काराची आवाहन प्रक्रिया सुरू राहते. भारतीय तत्वज्ञानात स्त्रीचे शक्तीरूपच मानले आहे. हा वर्ग आठवड्यातून एक दिवस घेणे अपेक्षित आहे. ह्याचा अभ्यास स्टडी गृप सारखीच त्रीस्तरीय आहे. स्वामी दयानंद म्हणतात, "Knowledge is acquired by inquiry and knowledge acquired should be free from error, vagueness and doubt.

**भजन ग्रुप व वैदिक मंत्रोच्चार ग्रुप :-**

प्रत्येक आठवड्यातील ठराविक दिवशी साधक एकत्र येऊन भजन, स्तोत्र, सुक्त, हनुमान चालीसा, तुलसी रामायण ह्याचे गायन करतात.

**ज्ञानयज्ञ व आध्यात्मिक शिबीरे :-**

वेदांत गिता तत्वज्ञान हे सर्वसामान्यांपर्यंत पोहोचावे ह्यासाठी प. प. गुरुदेवांनी गीताज्ञान यज्ञाची संकल्पना मांडली. हे ज्ञानयज्ञ मोबाईल पध्दतीने घेण्यांत येतात. ज्ञानयज्ञाचा उद्देश हा प्रामुख्याने "To create the awareness of the ancient culture heritage of India" असा आहे.

आध्यात्मिक शिबिरे ही निवासी आध्यात्मक, धार्मीक ग्रंथांचे अध्ययन, सत्संग, ध्यान इ. चा अंतर्भाव ह्या शिबीरामध्ये करण्यांत येतो. चिन्मय मिशनचे वेदांत प्रशिक्षण स्वामीजी, स्वामीनी व ब्रम्हचारी ह्या शिबीराचे आचार्यपद स्विकारतात.

वरिलप्रमाणे चिन्मय मिशनच्या कार्याचा परिचय अगदी थोडक्यात देण्याचा प्रयत्न ह्या ठिकाणी केला आहे.

# स्वामी तेजोमयानंद

स्वामी तेजोमयानंद हे सध्या चिन्मय मिशनचे सर्वोच्च प्रमुख आहेत. त्यांचा जन्म मध्य प्रदेशातील (भारत) एका महाराष्ट्रीय कुटुंबात ३० जून १९५० रोजी झाला. त्यावेळी त्यांना सुधाकर कैतवडे म्हणून ओळखत असत. त्यांच्या वयाच्या २० व्या वर्षी पदार्थविज्ञान शास्त्रातील एम.एस.सी.चा अभ्यासक्रम करीत असतांनाच त्यांची व स्वामी चिन्मयानंदांची भेट झाली. सुधाकर त्यामुळे इतका प्रभावीत झाला की त्याने आपल्या मातोश्रींची परवानगी घेतली आणि मुंबईत चालणाऱ्या वेदांताच्या अभ्यासक्रमाच्या वर्गाचा एक सदस्य झाला.

१९७५ मध्ये वेदांताचा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर त्यांना चिन्मय मिशनच्या खालील केंद्रांवर अनुक्रमे कार्य बघण्यास सांगितले. त्यामध्ये भोपाळ, कानपूर व सिध्दबारी ही केंद्रे होती. ते सिध्दबारी सांदिपनी हिमालय आश्रमाचे प्रथम आचार्य झाले आणि तिथे हिंदीतून चालणाऱ्या वेदांत अभ्यासक्रमाचे प्रमुख होते.

२१ ऑक्टोंबर १९८३ ला स्वामी चिन्मयानंदांनी त्यांना सन्यास दिक्षा दिली आणि त्यांचे नाव स्वामी तेजोमयानंद असे ठेवण्यांत आले. त्यांना सांदिपनी साधनालय या नावाने चालणाऱ्या मुंबईतील आश्रमाचे आचार्यपद देण्यांत आले. तेथे त्यांनी इंग्रजी भाषेत चालणादा वेदांताचा अभ्यासक्रम दोन गटात शिकविला. त्यांचे बरेच शिष्य उत्कृष्ट वेदांत शिक्षक म्हणून प्रसिध्द आहेत. १९८१ मध्ये स्वामी तेजोमयानंदांना अमेरिकेतील सनजोन्स येथे चालणाऱ्या केंद्रावर पाठविण्यांत आले आणि त्याचवेळी ते चिन्मय मिशन वेरूरचे आचार्य बनले. त्यामुळे साहजिकच नॉर्थ अमेरिकेत चालणाऱ्या चिन्मय मिशनच्या विविध उपक्रमाचे प्रमुख म्हणून काम पाहू लागले.

ऑगस्ट १९९३ मध्ये स्वामी चिन्मयानंदांच्या महासमाधीनंतर, स्वामी तेजोमयानंद भारतात परत आले आणि चिन्मय मिशनच्या प्रमुखपदाची सूत्रे स्वीकारली व अत्यंत विनयशीलपणे या नव्या भूमिकेत अगदी सहजतेने व चपखलपणे बसले. तेव्हापासून स्वामी तेजोमयानंद यांनी हे त्यांच्या गुरुंना अपेक्षित असलेल्या अंतिम ध्येयाचा जोमदारपणे पाठपुरावा सुरू ठेवला आहे. ते प्रगतिक्षम विचारांचे आहेत आणि निर्णयक्षमताही त्वरीत व काळाचा अपव्यय टाळणारी आहे.

त्यांच्या कुशल मार्गदर्शनाखाली पुढे दिलेल्या अनेक महत्वाच्या योजना कार्यान्वित झालेल्या आहेत.

१) कोइंबतूरचे चिन्मय इंटरनॅशनल रेसिडेन्शीयल स्कूल

२) चिन्मय सेंटर ऑफ वर्ल्ड अंडरस्टॅडींग, नवी दिल्ली

३) चिन्मय इंटरनॅशनल फौंडेशन, कोचीन

४) चिन्मय हेरिटेज सेंटर, चेन्नई

५) चिन्मय मिशन हॉस्पीटलमध्ये अधिक सोयी उपलब्ध व्हाव्यात म्हणून विस्तारीकरण

चिन्मय मिशनच्या विविध कार्यावर लक्ष ठेऊन सुध्दा स्वामी तेजोमयानंद हे जगतामध्ये फिरून विविध ठिकाणी प्रत्येक आठवड्याला ज्ञानयज्ञ घेत असतात. ते हिंदी, मराठी आणि इंग्रजी भाषेतून वेदांतज्ञानाचा प्रचार करतात. त्यांचा सौम्य स्वभाव आणि हजरजबाबीपणा त्यामुळे त्यांच्या सहवासात येणाऱ्या व्यक्तिंना ते अत्यंत प्रिय वाटतात. त्यांनी गायलेली भजने अत्यंत लोकप्रिय तर आहेतच व हृदयस्पशी सुध्दा आहेत. अनेक मूळ संस्कृत ग्रंथावर स्वामी तेजोमयानंद यांनी लेखन केले आहे. त्यात भक्तीसुधा, ज्ञानसागर, मन:शोधनम आणि ध्यानस्वरूपम हे ग्रंथ येतात. त्यांनी पुरातन शास्त्रग्रंथावरही आपली टीकाभाष्य लिहीली आहेत. त्यात कपिलगीता, योगवसिष्ठ, उपदेशसार, दृग-दृश्य-विवेक आणि सद्दर्शन हे ग्रंथ येतात. त्यांनी स्वामी चिन्मयानंदांच्या भगवद्गीता आणि उपनिषदे यावरील इंग्रजी भाषेतील भाष्यांचे हिंदी भाषेत अनुवाद केले आहेत.

स्वामी तेजोमयानंद आज जगतात वेदांतावर प्रवचने देणाऱ्यांपैकी ते एक अग्रगण्य आहेत. त्यांची अलौकीक बुध्दिमत्ता, वेदांताचे ज्ञान, कुशलतेने भक्तीच्या आदर्श गुणांमध्ये सहजतेने गुंफण्यात दिसून येते. अत्यंत महत्वाचे म्हणजे भक्ती आणि ज्ञान यांचा मधूर समन्वय साधणारे एक जीवंत उदाहरण होय.